रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, १० डिसेंबर २०२३



# नेहरूंची 'जम्मू काश्मीर'बाबत घोडचूक ?

आधुनिक केसरी

**काँग्रेसच्या नीतीमुळे देशाचे विभाजन झाले व पाकिस्तान राष्ट्राची निर्मीती झाली. पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी 'जम्मू -काश्मिर'साठी स्वंतत्र घटना तयार केली. देशात दोन घटना, दोन ध्वज, दोन पंतप्रधान झाले. भारताचे नंदनवन असलेला 'काश्मीर'' राज्य सत्तर वर्षे जळत राहिले, हजारोंचा बळी गेला, लाखो कुटुंब निर्वासित झाले. तरी काँग्रेसने त्याची चिंता केली नाही. काँग्रस सरकारला 'काश्मिर'चा प्रश्न सोडवावा, असे कधीच वाटलेले नाही. पं. नेहरूंनी जम्मू-काश्मिर' बाबत घोडचूक केली, त्याचा परिणाम होता. काँग्रेस पक्ष चूक मानावयास तयार नाही. काँग्रेस पक्षाच्या नाकारत्मक राजकारणामुळे त्यांचा 'ढोंगी 'राष्ट्रवादा'चा चेहरा समोर येत आहे.**





कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850


गृहमंत्री अमितशहा यांनी जम्मू - काश्मीरबाबतचे दोन दुरुस्ती विधेयक दि.५ डिसेबर रोजी लोकसभेत आणले. यावर २९ सदस्यांनी चर्चेत भाग घेतला. काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी यांनी विधेयकाच्या त्रुटीवर भाष्य करण्याऐवजी काश्मीर प्रश्नावर राग आवळला. त्यांनी मोदी सरकारने काश्मिरबाबतचे ३७० कलम हटवून काय दिवे लावले ?असा प्रश्न केला! पण आजही तेथे अतिरेकी घटना घडत आहेत, सैनिक व सामान्य नागरीक मारले जात आहेत. काश्मिरमध्ये काहीच बदल झालेला नाही. मोदी सरकार खोटा दावा करत आहेत,इतकेच नव्हे, भाजपा नेते पं. नेहरू जबाबदार असल्याचे आरोप करत असतात.काश्मीर विषयावर चर्चा करण्यास तयारी आहे काय? .चर्चेतून दुध का दूध, पाणी का पाणी होईल, असे म्हणत भाजपाला आव्हान दिले. हे काँग्रेसच्या अंगलट आले. गृहमंत्री शहा यांनी काँग्रेसचे आव्हान लगेच स्विकारले व आताच चर्चा करण्याची तयारी दर्शवली.काँग्रेसने काश्मिर प्रश्नावरुन वाद उकरुन काढण्याची गरज नव्हती. इतिहास चूका झाल्या आहेत, त्या मान्य करणे तो काँग्रेस पक्ष कसला? जम्मू- काश्मिरचा इतिहास वाचला तर काश्मिर प्रश्नावरुन काँग्रेसची फजिती होईल. काँग्रेसने काश्मिरचा खरा इतिहास नवीन पिढीसमोर येवू दिलेला नाही. केंद्रात मोदी सरकार आल्यापासून काँग्रेसचा लोकशाही घटना. धर्मनिरपेक्ष आणि राष्ट्रवाद ढोंगी व बेगडी आहे,हे दिसत आहे. तेव्हा 'जम्मू- काश्मिर'बाबत का घडले!याची माहिती घेवू या! भारतात स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी ५६५ संस्थानिक (राजे) होते. या संस्थानचे भारतात विलीनकरणाची जबाबदारी तत्कालिन गृहमंत्री स.सरदार वल्लभाई पटेल यांचेवर सोपविण्यात आली होती. स.पटेल यांनी साम, दंड, भेद या नीतीने ५५४ संस्थांनचे विलीनकरण केले. तेव्हा भारत सरकारला ५६० संस्थान सामील केले. उर्वरित पाच संस्थानांचे विलीनीकरण का झाले नाहीत, हा स्वंतत्र अभ्यासाचा विषय आहे. तीन संस्थाममधील हैद्राबाद,ॉजुनागड व जम्मू काश्मीर प्रश्न सुटलेला नव्हता. तेंव्हा स. पटेल यांनी हैद्राबादच्या निजामाला भारतात सामील होण्यास भा पाडले. जुनागड संस्थानचा प्रश्न सार्वमताव्दारे सोडविला गेला. यात काश्मिर संस्थान सामील करुन घेण्याची जबाबदारी ही स्वत: पंडित नेहरू यांनी स्वत:कडे घेतली. काश्मीरचा राजा हरिसिंग हिंदू,तर बहुसंख्य प्रजा मुस्लिम होती.हे संस्थान भारतात सामील होण्यास इच्छूक नव्हते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर दोन महिन्यात म्हणजे २० ऑक्टोबर १९४७ रोजी पाकच्या कबाली टोळीने काश्मीरवर हल्ला केला. या टोळीने लुटालूट व जाळपोळआणि महिलांवर बलात्कार करू लागले. टोळीचा हैदोस घालला. तेव्हा राजा हरिसिंग हतबल झाले. त्यांनी दिल्ली गाठली आणि भारताच्या विलीनीकरणाच्या फार्मुल्यावर स्वाक्षरी केली. त्यांनी भारत सरकारला सैन्य पाठवाण्याची विनंती केली. भारतीय लष्करामुळे पाक टोळी शेपूट घालून पळाले तरीही पाकने भारतावर हल्ला केला. या युध्दात भारतीय लष्कर विजयाकडे आगेकूच करत होता भारतीय हे लष्कर युध्द जिंकणार इतक्यात पं.नेहरूंनी १ जानेवारी १९४९ मध्ये अचानकपणे युध्दबंदी जाहीर केली. त्यामुळे दोन राष्ट्राची युध्दबंदी रेषा निश्चित झाली.आज काँग्रेस म्हणते,नेहरुंची लष्कराच्या सूचनेनुसार युध्धबंदीची घोषणा केली. पण स्वत: नेहरुंनी शेख यांना पाठविलेल्या पत्रात चूक झाल्याचे कबूल आहे.त्याचा परिणाम असा की,काश्मीरचा १३ हजार २९७ वर्ग किमी.चा भाग पाकिस्तानात गेला. त्यालाच पाक व्याप्त कश्मीर म्हंटले जाते. तो भारताला अजूनही घेता आलेला नाही. दुसरी चूक पं.नेहरुंनी काश्मिरचा प्रश्न संयुक्त राष्ट्राकडे नेला, त्यामुळे हा प्रश्न आंतरराष्ट्रीय प्रश्न होऊन बसला आहे. पं. नेहरुंच्या दोन घोडचूकीमुळे जम्मू -काश्मीर सत्तर वर्षे जळत राहिला.

काश्मीर प्रश्न गुंतागुंतीचा आणि डोकेदुखी होऊन बसला होता.
भारतात घटना तयार करण्याची प्रक्रिया चालू होती. यावेळी काश्मिर 'मुस्लिम कॉन्फरस'चे नेते शेख अब्दुला यांचा उदय झालेला होता. त्यांनी 'आझाद काश्मिर' चा नारा दिला होता, त्यासाठी त्यांनी आंदोलन उभारले होते. पं. नेहरू त्यांना शेख अब्दुलांना 'भाई' म्हणत असत. शेख अब्दुला यांनी काश्मीरसाठी स्वतंत्र घटना असावी, असा आग्रह नेहरूंकडे धरला. पं. नेहरू यांनी शेख यांना कायदामंत्री डॉ. बाबाबाहेब आंबेडकरांकडे पाठविले, पण डॉ. आबेडकरांनी 'मी देशविघातक तरतूद करणार नाही', अश्या शब्दात शेख यांना सुनावले. नंतर नेहरूंनी बंधूप्रेमापोटी मंत्री एन.गोपालस्वामी अय्यंगार यांनी काश्मीरसाठी स्वतंत्र घटना तयार करण्याची सूचना केली. या स्वंतत्र घटनेत भारतीय घटनेतील कोणतेही कलम काश्मिरसाठी लागू होणार नाही, ते म्हणजे ३७० हे कलम आहे. यात काश्मिर हे वेगळे राज्य असल्याचे नमुद करण्यात आले. तसेच भारतीय संसदेचे कायदे, सर्वोच्च न्यायालयाचे निकाल या राज्यात लागू होणार नाहीत. तसेच काश्मिरला मुख्यमंत्री नव्हे पंतप्रधान असे संबोधले गेले. राष्ट्रीय ध्वजाऐवजी तेथे काश्मिरचा स्वंतत्र ध्वज फडकवला जाऊ लागला. जगात कोणत्याही राष्ट्रात दोन घटना, दोन पंतप्रधान, दोन राष्ट्रीय ध्वज नाहीत. हे सर्व नेहरूंच्या घोडचुकीमुळे घडले. याचा घटनेचा फायदा स्थानिक पाक समर्थकांनी घेतला व त्यांच्या मदतीने पाक अतिरेक्यांनी काश्मिरमध्ये धुमाकूळ घालू घातला. हिंदू पंडितांना लक्ष्य केले. घरावर हल्ले, जळापोळ, लूट तसेच महिलांवर अत्याचार केले. काश्मिर पंडित कुटुंबाना हाकलून लावले. ३०७ कलमामुळे ४५ हजार लोकांचा बळी गेला. सुमारे दीड लाख कुटुंब भारतात निर्वासित झाले.तेंव्हा जनसंघाचे अध्यक्ष श्यामाप्रसाद मुखर्जीनी काश्मिरच्या स्वंतत्र घटना निर्मितीला तीव्र विरोध केला होता.त्यांनी एक निशान,एक विधान,एक प्रधान ची मागणी केली होती.काश्मीरमध्ये बाहेरच्या (भारतीयांना ) जाण्यास बंदी होती. तरीही ते बंदी आदेश मोडून तेथे गेले.तेंव्हा त्यांना अटक केली गेली. त्यांना तुरुंगात टाकले.पण नंतर संशयास्पद अवस्थेत त्यांच्या मृतदेह आढळून आला. या घटनेची नेहरू सरकारने चौकशी केली नाही. देशाच्या एकतेसाठी शहीद झालेले मुखर्जी हे पहिले नेते आहेत. जम्मू-काश्मिर मध्ये खुलेआम पाकिस्तानचे घोषणा व झेंडे फडकविले जाऊ लागले. भारतीय सैन्यावर दगडफेक व मारहाण केली जाऊ लागली. सैनिक पोलिस, सामान्य माणसाला गोळ्या घातल्या जात होता. पाक अतिरेकी व पाक धार्जिण्या नेत्यांमुळे हे घडत होते. त्यामुळे राज्य भारताच्या हातातून गेले अशी परिस्थिती निर्माण केली गेली होतीअशीच परिस्थिती निर्माण केली होती.काश्मिरची घटना तात्पुरत्या स्वरुपाची आहे, असा उल्लेख आहे. पण काँग्रेस सरकारने ७० वर्षात हे कलम रद्द करण्याचे धाडस दाखविले नाही. पण केंद्रात मोदी सरकार ५ ऑगस्ट २०१९ रोजी काश्मिरचे ३७० व ३५(ए) कलम रद्द केले.तेंव्हा काश्मिर नेत्यांनी हे कलम रद्द केले तर रक्ताचे पाट वाहतील, हातात तिरंगा ध्वज घेणारा कोणी राहणार नाही,अशी धमकी दिली. पण मोदी सरकार या धमकीला भीक घातली नाही.३७० कलम रद्द झाल्यानंतर काश्मीरमध्ये मोठा बदल झाला आहे. अतिरेक्याच्या कारवाईत ७० टक्के घट झाली.दगडफेकीच्या घटना बंद झाल्या. लाल चौकात तिरंगा फडकविला जात नव्हता. आज तेथे तिरंगा ध्वज फडकतोय.पर्यटकांची संख्या वाढते आहे. काश्मिरमध्ये विकास योजना राबविल्या जात आहेत. केंद्राचे ८९० कायदे लागू झाले आहेत.काश्मिरमध्ये ३८ हजार कोटीची गुंतवणूक होत आहे. तेथे तीस हजार लोकांना नोकरीत संधी मिळाली. काँग्रेसला काश्मिरमध्ये शांतता व विकास नको आहे का? नसेल मग ३७० कलम रद्द करण्यास विरोध का केला जातोय? काश्मिरचे ३७० कलम रद्द केले केल्यानंतर सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले. त्यामुळे संसदेत या राज्याबाबत विधेयक आणता येणार नाही,असा आक्षेप घेतला गेला. जे.के.एन.सी.चे सदस्य हसनैन मसुदी विधेयकाला विरोध करण्यात आघाडीवर होते.हे मसुदी हे काश्मीर उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश आहेत.त्यांनी २०१५ मध्ये ३७० विरोधात निकाल दिलेला आहे.आज ते संसदेत बसलेले आहेत. संसदेच्या दोन्ही सभागृहानी ३७० कलम रद्द केल्यानंतर मुसदी व लोण यांनी सर्वोच्च याचिका दाखल केली. तेव्हा न्यायायधीपदावर असलेल्या व्यक्तीची मानसिकता लक्षात घेतली पाहिजे.आज पाकव्याप्त काश्मीर जनता पाक सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरली आहे इकडे मसुदींनी सारखे नेते संसदेच्या निर्णयाला आव्हान दिले आहेत. तरी काँग्रेस पक्षाचे नेते मौन का पाळून आहेत?

लोकसभेत जम्मू-काश्मीर आरक्षण दुरुस्ती २०२३ विधेयकानुसार राज्यातील अनुसूचित जाती, अनूसूचित जमाती व आर्थिक मागलेल्यांना आरक्षण देण्याची तरतूद आहे. जम्मू-काश्मिर पुर्ररचना दुरुस्ती विधेयक २०२३ असे आहे. जम्मु काश्मीरमध्ये १०७ जागा होत्या. त्यातवाढ होवून ११४ जागा होतील. यात पाकव्याप्त कश्मिरभागासाठी २४ जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. यात महिलांसाठी एक व काश्मिर पंडितासाठी दोन जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. हे दोन्ही विधेयक मंजूर झाली आहेत. पण या निमित्ताने काश्मीरच्या प्रश्नावरन काँग्रेस विरुध्द भाजपा नेत्यात खंडाजंगी झाली. पण काही असो! मोदी सरकारमुळे ७० वर्षानंतर काश्मिरच्या लोकांना न्याय मिळाला, हे तितकेच सत्य आहे.

मांडणी व सजावट
अतुल खंडगावकर



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

अर्थात माझे हे विचार आहेत. सगळ्यांनाच आवडतील असेही नाही याची जाणीव मला आहे. प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहेच !


पण जाता जाता आणखी एक सुदंर सुभाषित सांगून समारोप करू या. या सुभाषितात सुभाषितकार म्हणतो

**विद्या ददाति विनयं, विनयाद याति पात्रतां ।**
**पात्रत्वात धनमाप्नोति, धनात धर्मं ततः सुखम ।।**

ज्या व्यक्तीला खरोखरीच ज्ञानप्राप्ती झाली आहे, अशी व्यक्ती विनयशील म्हणजे नम्र असते. कुठे कसे वागावे हे अशा व्यक्तीला सांगावे लागत नाही. विनम्रतेतून योग्यता किंवा पात्रता अंगी येते. त्यातूनच मग धनाची प्राप्ती करण्यायोग्य व्यक्ती होत असते. धनाचा उपयोग करून मनुष्य धार्मिक कार्य संपन्न करू शकतो आणि त्यातूनच त्याला आनंद प्राप्त असतो. या सगळ्या गोष्टी एकमेकांशी संबंधित आहेत. यात अर्थातच ज्ञानप्राप्तीचे आणि त्या खऱ्या ज्ञानप्राप्तीतून अंगी येणाऱ्या गुणांचे महत्व अधोरेखित केले आहे.

आजकाल संगणक, मोबाईल यांच्या जाळ्यात आपण सारेच अडकलो आहोत. या गोष्टी आता प्रत्येकाच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग झाल्या आहेत असे म्हटले तरी वावगे होणार नाही. पण यावरील माणसे, जग या सगळ्या गोष्टींना आपण आभासी जग म्हणत असतो. काही लोक कायम याच विश्वात वावरतात. त्यांना आभासी जगात वावरणारे असे आपण म्हणतो. आभासी म्हणजे जे प्रत्यक्षात अस्तित्वात नाही पण मोबाईल, संगणकावर दिसतात अशा गोष्टी. या अशा आभासी जगात वावरणाऱ्यांना आपण बऱ्याचदा नावेही ठेवत असतो. कारण यात बऱ्याचदा फसवणूकही होते. पण अशा या आभासी जगातही हिरवळीची काही बेटं आढळून येतात. सगळ्याच गोष्टी पूर्णपणे वाईट किंवा टाकाऊ नसतात. आपण त्यांचा वापर कसा करतो यावर बरेच काही अवलंबून असते. ही अशीच काही या वाळवंटातील हिरवळीची उदाहरणे.



## आनंदी पहाट

## सोशल मीडियाच्या व्यसनाचे बळी ठरू नये

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655


सोशल मीडिया पहिल्यांदा मित्र आणि कुटुंबाशी जोडण्याचा एक मार्ग म्हणून सुरू झाला, तेव्हापासून सर्व वयोगटांनी वापरल्या जाणाऱ्या प्रतिष्ठित छंदात सोशल मीडिया विकसित झाला आहे. तुम्ही सोशल मीडियाचा आनंद घेऊ शकता आणि त्याचा दररोज वापर करू शकता, परंतु तुम्हाला त्याचे व्यसन आहे का? सोशल मीडिया व्यसनाचे अधिकृत निदान असे काहीही नाही. परंतु सोशल मीडियाचा अतिवापर आज मोठ्या प्रमाणात होत आहे; त्याचा तुमच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर खूप गंभीर परिणाम होऊ शकतो. समस्याग्रस्त सोशल मीडियाचा वापर कसा ओळखायचा आणि त्याबद्दल तुम्ही काय करू शकता ते जाणून घेणे प्रत्येकासाठी अत्यंत आवश्यक आहे. तुम्ही मित्र आणि प्रियजनांशी कनेक्ट होण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करत असाल व्हिडिओ पाहत असाल किंवा फक्त स्वतःची करमणूक करत असाल; पण त्यासाठी किती वेळ खर्ची घालायचा ह्याचे भान राखणे आवश्यक आहे. या मनोरंजनाची लोकप्रियता गेल्या दशकभरात लक्षणीय वाढली आहे; विशेषतः लहान मुले आणि किशोरवयीन मुलांमध्ये तसेच तरुण ते मध्यमवयीन प्रौढांमध्ये देखील सोशल मिडीयाचा वापर खूपच वाढला आहे. निरुपद्रवी दिसणारा हा छंद व्यसनमध्ये कसा बदलतो? इतर प्रकारच्या वर्तणुकीशी संबंधित व्यसनांप्रमाणे, सोशल मीडियाचा वापर केल्याने तुमच्या मेंदूवर हानिकारक प्रभाव पडतो ह्याची जाणीव असणे आवश्यक आहे. तुम्ही सोशल मीडियाचा सातत्याने आणि जास्त वापर करत असल्याचे स्वतःलाच जाणवणे आवश्यक आहे. तुम्हाला पोस्ट, प्रतिमा आणि व्हिडिओ स्क्रोल करण्याची इतकी सवय होऊ शकते, की त्यामुळे तुमच्या जीवनातील इतर क्षेत्रांमध्ये ती हस्तक्षेप करू लागते, घातक ठरू शकते. सोशल मीडियाचा वापर किती इतका अधिक आहे, कि त्यामुळे सोशल मीडियाचे व्यसन असणाऱ्यांची संख्या अधिक आहे.

## आई....

आधुनिक केसरी

आई तुझ्यापुढे अजून मी तान्हा, हळूच शब्दात सोड माझ्या पान्हा... किती सुंदर ओळी आहेत या. ८० वर्ष वय झालं तरी ते आई पुढे लहानच असतं .वयाने, मानाने कितीही मोठे झालो तरी आईसमोर लहानच .कारण आपण पृथ्वीवर आलोच मुळी तिच्यामुळे. आणि तिने आपल्या लेकरासाठी ज्या खस्ता खाल्लेल्या असतात त्या कोणीही खाऊ शकत नाही. नऊ महिने पोटात वाढवणे, खूप महाभयंकर प्रसूती वेदना सहन करणे ,नंतर सुद्धा आजारपणात कितीतरी रात्री जागून काढणे, सुखदुःखात सतत सोबत राहणे, लग्न होईपर्यंतच नाही तर नंतर सुद्धा दुधावरच्या सायी साठी काळजी घेणे ती करतच राहते. लेकरांसाठी ती कुठलीही दुःख आनंदाने सहन करते. आजारी कधी पडतच नाही. पडली तरी मुलांसाठी स्वयंपाक करतेच. जगातली प्रत्येक चांगली गोष्ट ती मुलांसाठी घेत असते. स्वतः ठीगळाचे कपडे वापरून चपलेला खिळे मारून घेईल पण मुलांसाठी सारं नवीन घेत असते. फळांमधला गर मुलांना देईल साल ती खाईल. निरसे दूध मुलांना, पाणी टाकून चहा तिला. सगळ्यात आधी पती ,मुलांचे जेवण, उरलंसुरलं ती खाणार. कमी उरलं तर मला आज भूकच नाही असं म्हणणार. अनंत उपकार असतात आईचे मुलांवर. मुलं कृतघ्न निघायला नको. कारण आई जगाशी भांडेल आणि त्यासाठी ती समर्थ असेल. पण मुलांशी भांडण व अबोला ती कधीच सहन करू शकत नाही. खूप दुखते ती अशावेळी. खचून जाते .तिच्या जगण्याची उमेद मुलं असतात. त्यांच्याशिवाय ती अपंग असते. वय झाल्यावर तिच्या काळजीचा, मनाचा विचार करावा. कारण ती सर्वांगाने थकलेली असते ........

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग.27

## परोपकार

आधुनिक केसरी


**एका गावात एक निर्धन मनुष्य राहत होता. परिस्थिती गरीबीची असूनही तो मनाने उदार होता. आपल्या घासातील घास देण्यासही तो कमी पडत नसे. एकदा एका शेठजीकडे तो जेवावयास गेला असताना त्या शेठजीने त्याला पंचपक्वान्नाचे ताट वाढून दिले. ती भरगच्च पदार्थांनी भरलेली थाळी बघून त्या गरीबाला वाटले की यातून किमान तीन माणसांची भूक भागू शकेल. त्याने शेठजीची परवानगी मागितली व त्यातील अन्न त्याने बरोबर घेतले व घराकडे जाण्यास निघाला. रस्त्यात त्याला एक भिकारी भेटला त्याला त्याने खायला दिले. त्यातून उरलेले अन्न घेऊन तो घरी आला, तो जेवायला बसणार इतक्यात एक भिक्षुक या माणसाच्या घरी आला व त्याने त्याला अन्नदान करण्याची विनंती केली. गरीबाने त्याच्यासमोरील ताट त्या भिक्षुकाच्या स्वाधीन केले. त्यानंतर अजून एक अपंग व्यक्ती दाराशी आली त्यानेही या गरीबाकडे अन्न मागितले त्यालाही याने आपल्या थाळीतील अन्न खायला दिले. आता याच्याकडे देण्यासारखे काहीच शिल्लक राहिले नाही तेव्हा याने स्वतःची भूक भागविण्यासाठी एक भांडेभर पाणी घेतले तर समोरून एक वृद्ध व्यक्ती आली व तिने ते पाणी पिण्यासाठी मागितले. याला आता खाण्यापिण्यासारखे काहीच उरले नाही तरीही ही व्यक्ती समाधानात होती आजचा दिवस आपल्यामुळे किमान चार लोकांना तरी खाण्यापिण्यास मिळाले. तो ह्याच विचारात असताना तेथे देव प्रगटले व म्हणाले,'मी तुझी परीक्षा घेण्यासाठीच भिकारी, भिक्षुक, अपंग आणि वृद्ध व्यक्तिचे रूप घेतले होते व तुझ्याकडून काही ना काही मिळते का नाही हे पाहिले आणि तु स्वतःचा विचार न करता दुस-याचा जीव जाणून घेतलास व देत राहिलास. आता या पुढे तुला काहीच कमी पडणार नाही असा मी तुला वर देतो." इतके बोलून देव अंतर्धान पावले. तात्पर्य : देण्यातच खरे सुख लपलेले आहे. कुणाचाही घास हिरावून घेण्यापेक्षा कुणाला तरी एखादा घास देता कसा येईल याचा विचार करणे यातच खरे सुख लपलेले आहे.**

## निरुपण

आधुनिक केसरी

हस्तपादादिक झडले ।सर्वांगीं किडे पडिले ।
देखोन थुंकों लागले ।लाहानथोर ॥२२॥
जाली विष्टेची सारणी ।भोवती उठली वर्ढाणी ।
अत्यंत खंगला प्राणी ।जीव न वचे ॥२३॥
आतां मरण दे गा देवा ।बहुत कष्ट जाले जीवा ।
जाला नाहीं नेणों ठेवा ।पातकाचा ॥२४॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

उपदेशक विद्वान वन, सहल है वाचक ज्ञान ।
अमली जीवन प्रेम रत, सेवक दुर्लभ जान ।।०९।।(स्वर्वेद पंचम मण्डल पंचम अध्याय) ०५/०५/०९

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
उपदेशक तसेच विद्वान होऊन वाचक ज्ञान सांगणे सुगम आहे, परंतू कर्तव्यपरायण होऊन क्रियात्मक अमली-जीवन बनवून सत्य मार्गावर दृढ राहाणारे सेवक जगात दुर्लभ आहेत. अर्थात कोणी विरळाच या कर्तव्यपथावर आरुढ होऊन चालणारा असतो.

........................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## रामदास स्वामी

आधुनिक केसरी




श्रीचे मुखावलोकन केले । परम समाधान झाले । याउपरी आले । राहणे न घडे ।। अवकाश पांच दिवस । उरला आहे आम्हास । कोण पुजील त्यास । यश घडो ।। करणाऱ्याच्या करविल्या । आणि त्याच्या श्रमाचा । प्रसाद झाला सर्वांचा । मनोरथ ।। अर्थात हे बोलणे बहुतेक स्वगतच झाले. दुसरे दिवशी सकाळी मूर्ती पाहण्यासाठी खोलीत मंडळी आली असता समर्थांच्या मुखातून एक श्लोकार्ध निघाला - रविकुळटिळकाचा वेळ संनिध आला । तदुपरी भजनाशी पाहिजे संग केला ।।समर्थांचे मनोगत जाणून - अनुदिनी नवमी हे मानसी आठवावी । बहुत लगबगीने कार्यसिद्धी करावी ।। हे दोन चरण उद्धवांनी म्हणून समर्थांचा श्लोक पूर्ण केला. ते पाहून समर्थ फार संतुष्ट होऊन म्हणाले 'उद्धवा शाबास भले शाबास!' आणि नंतर श्रीरामापुढे अखंड नामघोष सुरू केला.

## भगवंतास स्मरून प्रपंच केल्यास तो नीटनेटका होईल

आधुनिक केसरी

नारदांनी एकदा श्रीकृष्णांना विचारले, "तुम्ही कुठे सापडाल ?" त्यावर श्रीकृष्ण म्हणाले, "नारदा, मी वैकुंठात नाही, रखुमाईपाशी सापडेन असेही नाही, तर मी माझ्या भक्तांपाशी सापडेन." भक्त नाही तरी देवाशिवाय कसे राहणार ? देवाला देवपण तरी कुणी आणले ? भक्त जर नाहीत तर देव तरी कुठचे आले ? देव आहे असे जे मानतात त्यांनाच देवाचे अस्तित्व समजते. नास्तिकाला देव कुठला ? त्याला विचारले, "तुझे कोण आहे या जगात ?" तर तो सांगेल, "हे जे सर्व काही आहे आपले भाऊ, बहीण, बायको, मुले वगैरे नातेवाईक, तसेच प्रपंचात ज्या काही गोष्टी लागतात, त्या सर्व माझ्या आहेत." परंतु मग देवाघरची वाट काय ? ज्याने जग निर्माण केले त्याला विसरायचे, आणि जे उत्पन्न केले ते माझे म्हणायचे, हा परमार्थ होईल काय ? तेव्हा 'देव आहे' अशी भावना धरा आणि देवाला दार उघडा म्हणजे तो सदासर्वकाळ तुमच्या जवळच आहे. भावनेने देव आपलासा केला पाहिजे. आपण कुठेही गेलो तरी आपल्या रामाला बरोबर घेऊन जात



जा, म्हणजे तुम्हाला काही भीती नाही. 'रामाला बरोबर नेणे' हे बोलणे लोकांना चमत्कारिक वाटेल, पण ज्यांना देवच नाही असे वाटते त्यांच्याशी आपल्याला काही कर्तव्य नाही. जो देवाच्या नादी लागला त्याचा प्रपंच बिघडला असे काहीजण म्हणतात. परंतु ज्याने प्रपंच निर्माण केला, त्याला विसरून तो प्रपंच नीट होईल का ? कधीही होणे शक्य नाही; तर त्याला स्मरूनच प्रपंच केल्याने तो नीटनेटका होईल. प्रपंच सोडून परमार्थ होणार नाही. प्रपंच करा, पण त्यातली आसक्ती सोडा म्हणजे झाले. तुम्हां सर्वांना जडभरताची गोष्ट माहीत आहेच. भरत जरी सर्व घरदार सोडून वनात गेला तरी तिथे हरिणाची आसक्ती धरलीच ! तर हरीण काय आणि माणसे काय, आसक्तीच्या दृष्टीने दोन्ही सारखीच. जोपर्यंत आसक्ती सुटली नाही तोपर्यंत परमार्थ करणे व्यर्थ होय. तरी आसक्ती सोडण्याचा प्रयत्न करा आणि माझा राम सदासर्वकाळ माझ्या मागेपुढे आहे ही भावना धरा. एकाने विचारले, "तुम्ही सर्वांना मानसपूजा करायला सांगता, पण एकटा राम सर्वांच्या जवळ कसा जाणार ?" मी त्याला सांगितले, "तू मानसपूजा कर म्हणजे तुझ्याजवळ तो राहील." तो जर सर्व ठिकाणी भरलेला आहे, तर त्याला जाणे-येणे नाहीच ! आपण मात्र त्याला पाहणे जरूर आहे. भगवंताचे नामस्मरण हा उंबरठ्यावरचा दिवा आहे. त्याने भगवंत आणि प्रपंच दोन्हीकडे उजेड पडेल.

८२. देवावर सर्व सोपवून निश्चिंत होणे हेच अनुसंधान समजावे.

## गुणरूप

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आत्मा कसा आहे इंद्रिय --आत्मा इंद्रियांना दिसत नाही. अस्पर्श -- आपण आत्म्याला स्पर्श करू शकत नाही. अरूप -- तुम्ही विचारले की आत्मा कसा आहे म्हणजे तो काळा आहे की गोरा आहे. तो सरळ आहे का ओबडधोबड आहे,तो सुंदर आहे का कुरूप आहे हे सांगता येत नाही. म्हणजेच आत्म्याला रूप नाही तो अरूप आहे.
अरस -- आत्मा बेचव आहे त्याला गोड तिखट,आंबट अशी कोणत्याही, प्रकारची चव नाही, म्हणून तो अरस आहे. अगंध-- आत्म्याला कोणत्याही प्रकारची वास नाही. अव्यय आत्मा हा अव्यय अविनाशी असा आहे.तो स्थिर आहे. अनादि---आत्म्याचा प्रवास कुठून सुरू झाला व तो केव्हा संपणार

रविवार, १० डिसेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १२०
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक


●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 10 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-120 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-05

## चर्चेतली बातमी

# जावेद अख्तर यांना पद्मपाणी जीवनगौरव

आधुनिक केसरी न्यूज

**हैदराबाद :** जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट



मराठवाड्यातील रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या नवव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची घोषणा करण्यात आली आहे. बुधवार, दि. 03 ते रविवार, 07 जानेवारी 2024 या दरम्यान हा महोत्सव छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील कलावंताच्या मांदियाळीत संपन्न होणार आहे.

या महोत्सवात भारतीय सिनेसृष्टीतील अतुलनीय योगदानाबद्दल दिला जाणारा पद्मपाणी जीवनगौरव पुरस्कार सुप्रसिध्द गीतकार आणि लेखक जावेद अख्तर यांना जाहीर करण्यात येणार आहे. अशी घोषणा महोत्सवाचे संस्थापक आणि संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल आणि प्रमुख मार्गदर्शक अंकुशराव कदम यांनी केली आहे. पद्मपाणी पुरस्कार निवड समितीने जावेद अख्तर यांच्या नावाची निवड केली असून या समितीत प्रसिध्द चित्रपट दिग्दर्शक गिरीश कासारवल्ली, बेंगळुरू, ज्येष्ठ समीक्षक लतिका पाडगांवकर (मुंबई), प्रसिद्ध हिंदी कवी अशोक बाजपेयी (दिल्ली), फेस्टीव्हल डायरेक्टर अशोक राणे, प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी यांचा समावेश होता. पुरस्काराचे स्वरूप पद्मपाणी सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि दोन लाख रुपये असे आहे.

# ओबीसींना दाखल्यासाठी ताटकळावे लागते

## आ. गोपीचंद पडळकर : इंदापुरात ओबीसी एल्गार सभा

आधुनिक केसरी न्यूज

**इंदापूर : मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याविरोधात ओबीसी समाज आक्रमक झाला आहे. शनिवारी इंदापूर येथे ओबीसी एल्गार सभा झाली. या सभेत आ. गोपीचंद पडळकर यांनी भाषण केले. यावेळी त्यांनी मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र मिळत असून ओबीसी समाजातील पोरांना दाखल्यासाठी ताटकळत राहावे लागत असल्याचा आरोप केला.**

गोपीचंद पडळकर म्हणाले, अंबडमध्ये एकत्रित आलो म्हणून सरकारही तुमच्या बाजूने निर्णय घ्यायला तयार झालं आहे. अजून काही योजनांचे निर्णय यायचे आहेत. मी भुजबळांना विनंती करतो की नागपूरच्या अधिवेशात त्याही सर्व विषयांना न्याय मिळावा असा प्रयत्न आपल्या माध्यमातून झाला पाहिजे. ओबीसीच्या सगळ्या नेत्यांना माझी हात जोडून विनंती आहे की वज्रमूठ सैल करू नका. राजकारण, जात-पात-धर्म बाजूला ठेवा. सगळे ओबीसी नेते एक व्हा आणि भुजबळांच्या पाठिमागे ठामपणे उभे राहा. एखादा नेता इकडे तिकडे गेला तर काही फरक नाही. मी हात जोडून विनंती करतो सर्वांनी ताकदीने उभे राहा. गावगाड्यातील सर्व लोक एकत्र आले आहेत. आम्हाला अजून जाळायला स्मशानभूमी नाही. जाळायला कोणाच्या स्मशानभूमीत प्रेत नेले तर तुमच्या स्मशानभूमीत जाळा सांगतात. ज्याच्या नोंदी सापडल्या त्या मराठा समाजातील मुलांना सरसकट दाखले द्यायला सुरूवात केली आहे. पण अजून आमच्या हेडव्याच्या पोराला, तेल्याच्या पोराला, कोळ्या, साळ्या, माळ्याच्या पोराला हातखर, धनगर, रामोजी, मुस्लमान, लिंगायतच्या पोराला अजून दाखले मिळत नाहीत. आमच्या नावावर जमीन नाही, सातबारा नाही. कोणताही कागदपत्र नाही. आम्हाला काही मिळत नाही, अन् इकडे एका बाजूला एका दिवसांत दाखले देताय आणि तिथे चार चार महिने झाले तरी लोक तिथे अर्ज करत आहेत तर त्यांच्याकडे वेगवेगळे पुराव मागत आहेत. हा दुजाभाव कशासाठी? हा दुजाभाव का करताय? म्हणून गावातल्या सर्व ओबीसींनी एकत्र या, असे गोपीचंद पडळकर म्हणाले.

**भुजबळांच्या केसालाही धक्का लागणार नाही :** अंबडची सभा झाल्यानंतर भुजबळांना अनेक धमक्या आल्या.



पण भुजबळ साहेबांना कोणी काही करणार नाही. त्यांच्या डोक्याच्या केसालाही धक्का लागणार नाही. महाराष्ट्रातील पाच कोटी धनगर समाजाच्या वतीने भुजबळ साहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, हा शब्द सर्वांच्या वतीने देतो. आता पाडापाडीची भाषा सुरू झाली. पाडापाडीच्या भाषेवर हेच सांगायचं की, हुकुमत तो वो करते है जिनका लोगोंके दिले मैं राज होता है, वरना मुर्गों के सर पे भी ताज होता है, असा शेरही त्यांनी ऐकवला. गावातले छोटे छोटे समाज काय काय क्रांती करू शकतात बघतात. तुम्ही हिणवता, गावात नाभिक, गुरव, लोहार समाजाची घरे किती, सोनार, सुताराची घरे किती. आज तुम्ही गावात कुणबीचा दाखला दिला तर सरपंचाचं आरक्षण गेलं, असेही ते म्हणाले. म्हणून ओबीसी समाजाने एक व्हावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

**ओबीसी समाजाला दिली शपथ :** मी अशी शपथ घेतो की, आम्ही ओबीसी भटके, विमुक्त आदिवासी दलित लोक संविधान साक्षी ठेवून शपथ घेतो की उपेक्षितांच्या न्याय हक्कांसाठी शेवटच्या श्वासापर्यंत संघर्ष करू. महाराष्ट्राला समता, समानता बंधुतेच्या वाटेवर पुढे नेऊ", अशी शपथही त्यांनी ओबीसी समाजाला दिली.

**तर लाठीचार्जनंतर मनोज जरांगेंना सहानुभूती :** मी मनोज जरांगेंना १५ दिवसांनी उत्तर दिले तरीही लगेच आरोप केले जातात छगन भुजबळांमुळे अशांतता वाढते आहे. मी मनोज जरांगेंन १५ दिवसांनी उत्तर देतो कारण सौ सुनार की एक लोहार की! अशांतता कोण निर्माण करत आहे त्याचा विचार सगळ्यांनी करायला हवा. असे इंदापूरमधून छगन भुजबळ म्हणाले आहेत. एवढेच नाही तर देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत जे उत्तर दिले ते वाचून दाखवत बीडमध्ये पोलिसांना मारहाण झाली हेदेखील छगन भुजबळांनी वाचून दाखवलं. हे सत्य वेळीच समोर आलं असतं तर मनोज जरांगे पाटील यांना सहानुभूती मिळालीच नसती असंही ते म्हणाले आहेत.

**राज्यात कायदा सुव्यवस्था आहे की नाही? :** "राहत्याला पिंपरीत दोन दलित कुटुंबे आहेत त्यांनी कुणीतरी घोरपडे म्हणून आहेत त्यांना मतदान केलं नाही म्हणून त्यांचं घर उद्ध्वस्त केले. ५०० लोक चाल करुन आले होते. यामध्ये कालपर्यंत कुणालाही अटक झाली नव्हती. मगाशी डॉ. यादव म्हणून भेटले त्यांच्या रुग्णालयाची तोडफोड झाली. हे काय चालले आहे? राज्यात कायदा सुव्यवस्था आहे की नाही? ते सांभाळण्याची जबाबदारी कुणाची?" असे प्रश्नही भुजबळ यांनी उपस्थित केले. बीडमध्ये महिला पोलिसांवरही हल्ला झाला. कुणीही बोलायला तयार नाही. बीडमध्ये घरे जाळली गेली.

# माउलींच्या विष्णुरूप मुखकमलावर पहिल्या दिवशी सूर्यदर्शन

## आपेगावात भाविकांची मांदियाळी

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** संत ज्ञानेश्वर महाराज यांची जन्मभूमी असलेल्या पैठण तालुक्यातील श्रीक्षेत्र आपेगाव येथे माऊलीचा संजीवन समाधी सोहळा सुरू आहे.या सोहळ्याप्रसंगी तीन दिवस सुर्य दर्शन प्रसंगी माऊलीच्या मुर्तीवर किरणोत्सव बघायला मिळाल्यावर वारकरी तथा भाविकांनी माऊली गजर केला. विशेष म्हणजे या वर्षी माऊली श्रीविष्णुच्या रुपात गरुडावर विराजमान ,हातात शंख,चक्र अशा स्वरूपाची पुजा बांधण्यात आली आसुन याचे भाविकांना दर्शन होत आहे. पैठण तालुक्यातील श्रीक्षेत्र आपेगाव येथे संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात गेल्या तीन वर्षांपासून माऊलीच्या मुर्तीवर समाधी सोहळ्यात सूर्यकिरणे मंदिरात प्रवेश करतात. हा किरणोत्सव तीन दिवस दुपारी १२:४५ ते १२:५२ या वेळेस किरणे संत ज्ञानेश्वराच्या मूर्तीला उजवी



कडुन डावीकडे जात मुखकमला स्पर्श करतात, दुसऱ्यादिवशी व तिसऱ्या दिवशी किरणे चेहऱ्यावर येऊन किरणोत्सव पूर्ण होतो. यंदा हा किरणोत्सव पहिल्या दिवशीच पाहायला मिळाले आहेत. ज्ञानेश्वर मंदिर संस्थान आपेगाव यांनी दिलेल्या माहितीनुसार पहिल्या दिवशी सूर्याची किरणे मुर्तीवर मुखकमलावर पडले आहेत. हा सोहळा अनुभवण्यासाठी मोठ्या संख्येने वारकरी भाविक जमले आहेत. संस्थानातर्फे गर्दीचे पूर्वनियोजन केले आहे. त्यामुळे किरणोत्सवाचा सोहळा सर्व भाविकांना पाहता येत आहे.

"गेल्या तीन वर्षापूर्वी ज्ञानेश्वर महाराज जन्मभूमी आसलेल्या मंदिरातील माऊलीच्या मुर्तीवर ढगाळ वातावरण आसतानाही ठरलेल्या वेळेत सुर्य दर्शन झाले आणि महाराष्ट्रातील असंख्य वारकरी भाविकांनी किरणोत्सव याची देही याची डोळा वास्तुशास्त्र आणि आध्यात्माचा सुंदर असा आविष्कार पाहायला मिळाला होता. याही वर्षी ढगाळ वातावरणामुळे किरणोत्सव होईल का नाही ही शंका भाविकांच्या मनामध्ये होती पण माऊली भक्तांना सुर्य दर्शन झाले आहे. हा किरणोत्सव पाहवयास अपेगाव येथे मोठी गर्दी एकवटली आहे.

# काँग्रेसचा विधानभवनावर 'हल्लाबोल' मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राज्यातील शेतकरी प्रचंड अडचणीत आहे, शेतमालाला भाव नाही, सरकार मदतीच्या कोरड्या घोषणा करत आहे, तरुणांना नोकऱ्या नाहीत, आरक्षणावर निर्णय घेतला जात नाही. ड्रग माफियांचा सुळसुळाट झाला आहे पण भाजपाप्रणित शिंदे सरकार जनतेच्या या मुलभूत प्रश्नांकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. जनतेला वा-यावर सोडून विदर्भात फक्त पर्यटनाला आलेल्या बेजबाबदार महाराष्ट्रविरोधी भाजपा व फुटीरांच्या सरकारला जाब विचारण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचा भव्य 'हल्लाबोल' मोर्चा सोमवारी दिनांक ११ डिसेंबर रोजी विधानभवनावर धडकणार आहे, विदर्भातील नागरिकांनी या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केले आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वाखालील या मोर्चात विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, सतेज बंटी पाटील, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, बसवराज पाटील, आ. प्रणिती शिंदे, आ. कुणाल पाटील, माजी मंत्री, आमदार, खासदार, महिला काँग्रेस, युवक काँग्रेस, एनएसयुआय, विविध सेल व विभागाचे हजारो पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. राज्य विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात दोन दिवसांच्या कामकाजात सरकारने शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चाही केली नाही. केवळ शेतकऱ्यांना भरपूर दिले आहे अशा पोकळ घोषणा मुख्यमंत्री व त्यांचे मंत्री देत आहे.




# जुन्या पेन्शनसाठी जनआक्रोश



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रातील गोरगरिबांची मुले पोटाला चिमटा देऊन, प्रसंगी उपाशीपोटी राहून, मिळेल ते काम करून शिकली. बहुजन समाजातील उच्च शिक्षण घेणारी ही पहिलीच पिढी, काही ठिकाणी दुसरी पिढी. उद्याची रम्य स्वप्न पाहत, मित्रांचे शर्ट घालून, उधार-उसनवारी करून मुलाखती देत कोणत्याही वशिल्याशिवाय कशीतरी नोकरीच्या प्रवाहात आली. शेतकरी, शेतमजूर, कामगार यांच्या घरातून आलेल्या या नोकरदारांना आता आपले आलबेल झाले असे वाटत असतानाच पहिला आघात बसला तो डीसीपीएसच्या रूपाने.**



## क्षितिजापल्याड

डीसीपीएस, इन्कम टॅक्स, विविध पॉलिसीज, घराचे हप्ते, वैयक्तिक कर्ज, कुटुंबाची जबाबदारी आणि नोकरीवाला नवरा मिळाला म्हणून पत्नीच्या वाढलेल्या अपेक्षा या ओझ्याखाली आजच्या नोकरी करणाऱ्या कोणत्याही सूज्ञ माणसास कशाला या नोकरीच्या भानगडीत पडलो, असे वाटणे साहजिक आहे. बरे समाजाची धारणा अशी की, या नोकरदार वर्गाकडे खूप पैसा आहे. पहिली दहा वर्षे तर अनेक छिद्र बुजवण्यातच निघून जातात. एकतर संधी नाही म्हणून वयाच्या पस्तीस-चाळीशीत नोकरीला लागलेला कर्मचारी आपल्या पंधरा-वीस वर्षाच्या कार्यकाळात काय खाणार आणि किती मागे टाकणार. काम सरो-वैद्य मरो अशी पॉलिसी जर शासन राबवत असेल तर ओशाळलेल्या चेहऱ्याने कर्मचाऱ्यांनी कोणाकडे पहायचे? कोणत्याही कर्मचाऱ्याने आपल्या घरात माझ्याकडे पैसे नाहीत असे म्हणणे म्हणजे स्वतःच स्वतःच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवून घेण्याचा प्रकार ठरतो आहे. कारण समाजाला दिसतो तो फक्त त्याचा आकडा. पण त्या आकड्याच्या नादात कर्मचारी किती आतल्या आत वेडावाकडा होत असेल याची कल्पना देखील कोणी करू शकत नाही. आपल्या नोकरीच्या ठिकाणी त्याला अनेक दिव्यातून जावे लागते, वारंवार स्वतःस सिद्ध करावे लागते. सामान्य माणसासारखे मनातील दुःख तो दुसऱ्यास सांगू शकत नाही. दुसऱ्याचे सोडाच स्वतःच्या बायकोला देखील मन उलगडून दाखवता येत नाही, हे वास्तव आहे. कारण नोकरीवाला म्हणून चांगल्या सुखवस्तू घरातील ती त्याची बायको ऐकून घेत नाही. म्हणून इतरांपेक्षा कर्मचाऱ्यांच्या घरात जास्त कौटुंबिक कलह

होताना आपण पाहतो. आपल्या आई वडिलांच्या म्हातारपणाची काठी असलेला हा कर्मचारी इतरांच्या अपेक्षेचे ओझे बाळगत कधी म्हातारा होतो, हेच त्याला समजत नाही. ज्याच्यासाठी अट्टहास करून शिक्षण घेतले, पालकांनी स्वतः ढोर मेहनत करून आपल्या मुलाच्या शिक्षणाची काळजी वाहिली ती कशासाठी? ह्या प्रश्नाचे उत्तर ना त्याच्याकडे आहे ना शासनाकडे आहे. शासकीय कर्मचाऱ्यांतील काही महाभाग लाचलुचपत घेऊन गब्बर होतात. अशा गबरुकडे समाजाचे लवकर लक्ष जाते. मग समाजही तेच एकक गृहीत धरून इतर कर्मचाऱ्यांचे मूल्यमापन करतो. म्हणून आज कर्मचारी आणि समाज यांच्यात एकप्रकारची दुरी निर्माण झाल्याचे चित्र दिसते. शिक्षित समाज म्हणून याच कर्मचारी वर्गाने आपल्याच समाजबांधवांच्या प्रश्नाला घेऊन त्यांची साथ दिली असती तर महाराष्ट्रातील संपूर्ण समाज कर्मचाऱ्यांच्या जुन्या पेन्शनच्या मागणीत सहभागी झाला असता. परंतु हे कर्मचारी आपले नाहीत असे वाटण्यापर्यंत त्यांच्या मनाची धारणा होण्यामागे आपले समाजपासूनचे तुटलेपण कारणीभूत आहे, हेही कर्मचाऱ्यांनी लक्षात घ्यायला हवे. आज जे कर्मचारी आपोआपवादी झाले आहेत म्हणजेच लढणारे लढत राहतात, मोर्चे काढतात, चळवळी करतात, आपण कशाला जायचे हे आत्मघातकी धोरण आहे. आपले भले करून घ्यायचे तर आपल्यालाच कष्ट घ्यावे लागतील. बाहेर बसून चुका काढणे आणि मार्गदर्शन करणे सोपे असते. जी माणसे काही करत नाहीत अथवा ज्यांची क्षमता नसते अशी माणसे दुसऱ्याबद्दल बोलण्यात आपली ऊर्जा खर्च करतात. महाराष्ट्रातील संपूर्ण कर्मचाऱ्यांची ऊर्जा या आंदोलनाच्या रूपाने सत्कारणी लागली तर जुन्या पेन्शन योजनेचा प्रश्न फार काही मोठा नाही. ह्या १२ डिसेंबर २०२३ च्या नागपूर अधिवेशनावरील जनआक्रोश मोर्चाने अनेक बाबी अधोरेखित होतील. मागच्या अधिवेशनाच्या काळातील मोर्चाने दोन गोष्टी मिळविल्या. ग्रॅच्युएटी आणि मयत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाला जुनी पेन्शन योजना. चळवळीचे, आंदोलनाचे हे फलित आहे. हे असे असले तरी चळवळीचे महत्त्व अजूनही कर्मचाऱ्यांना समजले नाही, अशीच अवस्था आहे. ज्या दिवशी ही फक्त कर्मचाऱ्यांची चळवळ नसून संपूर्ण समाजाची आहे असे चित्र निर्माण होईल तो दिवस कर्मचाऱ्यांच्या मागणीच्या विजयाचा असेल. आजचा महाराष्ट्रातील कर्मचारी हा काही फार धनदांडग्यांच्या घरातून आलेला नाही. अगदी सामान्य माणसांच्या पोटी जन्म घेतलेली ही मंडळी, ज्यांच्या बापाला गावात त्यांच्यापेक्षा लहान असणारी माणसेही अरेतुरेची भाषा वापरतात. अशा सामाजिक पार्श्वभूमी लाभलेल्या कर्मचाऱ्यांनी आपल्या समाजबांधवांना विश्वासात




घेऊन चळवळ व्यापक करणे गरजेचे आहे. कामगार, शेतमजूर, शेतकरी यांच्या प्रश्नाला घेऊन कर्मचाऱ्यांनी लढा उभारावा, नाहीच जमले तर किमान त्यात सहभागी व्हावे. समाज आपल्याकडे शहाणा म्हणून पाहत असेल तर आपणही फुगीरपणाचा कोणताच आव न आणता शहाणपणानेच वागले पाहिजे. आम्ही बोलताना आमचे पूर्वज पुण्याच्या बाहेर कधी फिरकलेच नाहीत अशा भाषेत संवाद साधतो. आपले बोलणे, वागणे, वर्तनव्यवहार, देहबोली यातून आपले आपल्याच माणसापासूनचे तुटलेपण वारंवार सिद्ध करतो. जुन्या पेन्शनचा हा लढा फक्त कर्मचाऱ्यांपुरताच मर्यादित नसून तो संपूर्ण समाजाचा लढा आहे हे कर्मचारी आणि समाजानेही लक्षात घेणे फार गरजेचे आहे. या सर्व गदारोळात सावलीत काम करून दोन वेळेच्या भाकरीची तजवीज झाली, पण निवृत्तीनंतर काय? उमेदीच्या काळात नोकरी केल्याने शारीरिक कष्टाची सवय मोडली आणि सुस्ती चढली. साठीनंतर कष्टही सहन होत नाहीत. निवृत्तीनंतर गावगाड्यात कर्मचाऱ्यांची अशी अवस्था असते की अक्षरशः त्यांना बोलायला देखील कोणी येत नाही. कारण आयुष्यभर हे समाजापासून फटकून वागलेले असतात. कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना मिळणारच आहे, ती संघर्ष करून आपण मिळवूच. कारण ती आपली न्याय्य मागणी आहे. या आपल्या मागणीला समाजाचाही भक्कम पाठिंबा असणे अनिवार्य आहे. मूळ उखडलेले झाड वाळायला वेळ लागत नाही. आपली मुळे ज्या समाजात खोलवर रुजलेली आहेत त्याच जोरावर आपण अधिकाधिक बहरू शकतो हे लक्षात घ्या. जुनी पेन्शन आणि सामाजिक अभिसरण याच तत्त्वाच्या जपवणुकीसाठी सर्वांनी १२ डिसेंबरच्या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हायचे आहे. **(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# नोबेल पारितोषिक : पात्र व अपात्र कोण ?



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**मृत्युपत्रामध्ये कोणकोणत्या कार्यक्षेत्रात व कोणकोणत्या निकषांवर पारखून पारितोषिके द्यावीत, याचे आल्फ्रेड नोबेल यांनी विवेचन करून ठेवले होते. त्यासाठी आवश्यक ते स्पष्टीकरण करणारे नियम व प्रशासकीय तपशील हे मृत्युपत्राचे विश्वस्त, पारितोषिके देणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी व त्यांचे कुटुंबीय यांनी चर्चा करून तयार केले आणि स्वीडनच्या राजाने याला इ.स.१९०० साली मान्यता दिली. नोबेल पारितोषिक हा जगातील अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार आहे. रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, साहित्य, जागतिक शांतता, वैद्यकशास्त्र वा जीवशास्त्र आणि अर्थशास्त्र या पाच क्षेत्रांतील अतुलनीय कामगिरी किंवा संशोधन यासाठी प्रतिवर्षी हा पुरस्कार दिला जातो.**

स्वीडिश वैज्ञानिक आल्फ्रेड नोबेल यांनी आपल्या मृत्युपत्रात या पुरस्कारांची तरतूद केली होती. त्याच्या मृत्यूनंतर पाच वर्षांनी इ.स.१९०१मध्ये पहिल्यांदा हा पुरस्कार देण्यात आला. दरवर्षी १० डिसेंबर रोजी हा पुरस्कार दिला जातो. सन १९४०-४२पर्यंत दुसऱ्या महायुद्धामुळे हा पुरस्कार खंडित करण्यात आला होता. डिसेंबर २०२०पर्यंत एकूण ९२९ व्यक्तींना आणि २५ संस्थांना एकूण ९५४ नोबेल पारितोषिके देण्यात आली आहेत. इ.स.१९६९पासून आल्फ्रेड नोबेल यांच्या स्मरणार्थ स्वीडनच्या मध्यवर्ती रिक्स बँकेने अर्थशास्त्रातील मौलिक कार्यासाठी सहावे नोबेल पारितोषिक देण्यास सुरुवात केली. आल्फ्रेड नोबेलच्या मृत्यूनंतर इ.स.१८९७ साली त्यांचे मृत्युपत्र उघडून पाहण्यात आले व चार वर्षांनंतर ते कायदेशीर असल्याचे सिद्ध झाले. या मृत्युपत्रानुसार त्याने कमावलेल्या अमाप संपत्तीचा मोठा हिस्सा- ३.१ कोटी स्वीडिश क्रोनार नोबेल निधीसाठी ठेवलेला होता. हा निधी सुरक्षित ठेवींत गुंतवा आणि मिळणाऱ्या उत्पन्नाच्या ६०-७० टक्के रकमेचे पाच सारखे भाग करून प्रत्येक क्षेत्रातील पारितोषिकासाठी द्या, असे त्यांनी आपल्या मृत्युपत्रात सुचविले होते.

कायदेशीरपणे नमूद केलेल्या व पारितोषिके देणाऱ्या संस्थांनी नेमून दिलेल्या व्यक्तीच पारितोषिकांसाठी उमेदवारांची नावे सुचवू शकतात. स्वतःच आपले नाव सुचविल्यास ती व्यक्ती आपोआपच पारितोषिकासाठी अपात्र ठरते. उमेदवारांची नावे सुचविण्यासाठी पुढील व्यक्ती पात्र असतात- आधीचे नोबेल पारितोषिक विजेते. पारितोषिके देणाऱ्या संस्थांचे सभासद. काही विशिष्ट विद्यापीठांचे आणि महाविद्यालयांचे तसेच पारितोषिके देणाऱ्या संस्थांनी खास निमंत्रित केलेले त्या त्या क्षेत्रातील प्राध्यापक. साहित्याच्या पारितोषिकासाठी लेखकांच्या काही प्रातिनिधिक संघटनांचे सभासद. दि स्वीडिश अकॅडमीशी तुल्य अशा संस्थांचे सभासद. शांततेच्या पारितोषिकासाठी आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या काही संसदीय व इतर संस्थांचे सभासद उमेदवारांची शिफारस करू शकतात.

उमेदवारांच्या नावाची शिफारस केवळ व्यक्तीलाच करता येते, संस्थेला नाही. मात्र अनेक पात्र व्यक्ती संयुक्तपणे शिफारस करू शकतात. पारितोषिके देणाऱ्या संस्थांकडून पात्र व्यक्तींना नावे सुचविण्याविषयी विनंतीपत्रे पाठविली जातात. त्यांनी संबंधित कागदपत्रांसह आपल्या शिफारशी १ फेब्रुवारीच्या आत पाठवायच्या असतात. १ फेब्रुवारीपासून नोबेल समित्यांचे काम सुरू होते व सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये समित्या आपल्या शिफारशी पारितोषिके देणाऱ्या संस्थांकडे पाठवितात. या संस्था १५ नोव्हेंबरपर्यंत अंतिम निर्णय जाहीर करतात. नावे सुचविली जाण्यापासून ते अंतिम निर्णयापर्यंत होणारे वादविवाद, चर्चा, मतदान आदी बाबतीत गुप्तता राखली जाते. नोबेल पारितोषिकांच्या निर्णयाविरुद्ध दाद मागता येत नाही. साधारणतः ३००० लोक पुरस्कारासाठी नामांकने




पाठवतात. त्यापैकी नोबेल समिती फक्त ठरावीक नामांकनेच निवडते. आल्फ्रेड नोबेलच्या मृत्युपत्रान्वये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व अर्थशास्त्र यांतील पारितोषिके दि रॉयल स्वीडिश ॲकॅडमी ऑफ सायन्सेसकडे, वैद्यकशास्त्राचे दि रॉयल कॅरोलिन मेडिको-सर्जिकल इन्स्टिट्यूटकडे, साहित्याचे दि स्वीडिश ॲकॅडमीकडे आणि शांततेसाठी नॉर्वेच्या संसदेने- स्टोर्टिंगने नेमलेली दि नॉर्वेजियन नोबेल कमिटी या चार संस्थांकडे ही पारितोषिके देण्याचे अधिकार आहेत. पारितोषिकासंबंधीचा निर्णय घेण्याचे व जाहीर करण्याचे काम या संस्था करतात. पारितोषिके देण्याचा निर्णय घेण्यास प्रत्येक संस्थेच्या मदतीसाठी तीन ते पाच सदस्यांची समिती असते. या समित्या गरज भासल्यास इतर तज्ज्ञांनाही चर्चेसाठी बोलावू शकतात. पारितोषिकासाठी सुचविण्यात आलेल्या उमेदवाराच्या कार्याचे मूल्यमापन करून या समित्या आपला निर्णय देतात, पण हा निर्णय मानणे संस्थांवर बंधनकारक नसते. मृत्युपत्रातील तरतुदीनुसार नोबेल प्रतिष्ठान स्थापण्यात आले असून ही संस्था नोबेल निधीची कायदेशीर मालक आहे. वरील चार संस्थांच्या सहकार्याने ही संस्था सर्व प्रशासकीय कामे संयुक्तपणे पाहते. इतर सर्व नोबेल संस्था प्रतिष्ठानच्या नियंत्रणाखाली आहेत. मात्र पारितोषिकांच्या निवाड्याशी आणि त्यासंबंधीच्या कार्याशी प्रतिष्ठानचा काहीही संबंध नसतो.

त्यांच्या सरकारतर्फे हा पुरस्कार नाकारण्याचे आवाहन करण्यात आल्यामुळे चार व्यक्तींनी हा पुरस्कार नाकारला होता. यापैकी तीन जर्मन हिटलरमुळे, तर चौथी व्यक्ती रशियन लेखक बोरीस पास्तेर्नाक यांनी साहित्यातील नोबेलमुळे आपले सरकार सूड उगवेल या भीतीपोटी हा पुरस्कार नाकारला. उत्तर व्हियेतनामच्या लु डक थो याने शांततेचा नोबेल हा शांतता प्रस्थापित न झाल्यामुळे नाकारला होता, हे येथे उल्लेखनीय!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पहावे ते नवलच... गावरान बकरीने दिली चक्क पाच पिल्ले

आधुनिक केसरी न्यूज



**किरणकुमार आवारे**

**निफाड :** निसर्ग अनेक चमत्कारिक गोष्टीनी भरला आहे, त्यात अनेक असामान्य गोष्टी बघायला मिळतात. शिरवाडे वाकद ता.निफाड येथे अशीच एक चमत्कारिक गोष्ट बघायला मिळाली ती म्हणजे गावरान शेळीने चक्क पाच पिल्लांना जन्म दिला आहे. कधी अत्यल्प पर्जन्यमान तर कधी अतिवृष्टी मुळे दिवसेंदिवस शेतीच्या उत्पन्नात घट होत असल्याने पर्यायी जोडधंदा म्हणून पाळलेल्या एका बकरीने चक्क पाच पिल्ले दिल्याची घटना शिरवाडे वाकद येथे घडल्याने या शेतकऱ्याच्या घरी आनंदाची दिवाळी उजळल्याचे चित्र आहे. येथील शेती व्यावसायिक किरण आवारे हे बऱ्याच दिवसांपासून वडिलोपार्जित शेती करतात. त्यांना वडगाव पंगू ता.चांदवड येथील नातेवाईकांनी एक बकरी भेट दिली. या बकरीच्या विस्ताराने पाच वर्षात तब्बल एक लाखाच्या वर आर्थिक कमाई दिली. निसर्गाच्या अवकृपेमुळे दिवसेंदिवस शेतीचे उत्पन्न घटत असल्याने शेतीला जोडधंदा म्हणून शेळी पालन व्यवसाय कुटुंबाला चांगलाच आर्थिक आधार झाला आहे. त्यातच गावरान बकरीला 'निसर्गाची किमया न्यारी' झाली अन् या बकरीने दुसऱ्या वेतात चक्क पाच पिल्ले दिल्याने कुटुंबियाच्या घरी आनंदाचे वातावरण पसरले आहे. ही सर्व पिल्ले सुस्थितीत असून या बकरीला पहिल्या वेतात तीन पिल्ले झाली होती. शेतकऱ्यांना कमी चाऱ्यात व कमी जागेत शेळी पालन व्यवसाय करणे फायदेशीर आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीपूरक जोडधंदा म्हणून शेळीपालन व्यवसायाकडे वळणे गरजेचे आहे. यातून शेतकऱ्यास चांगला आर्थिक लाभ मिळू शकतो, परंतु पिलांची योग्य वाढ होण्यासाठी, शेळीचे दुध वाढण्यासाठी, या शेळीला दररोज २०० ते ३०० किलोग्रॅम खुराक देणे गरजेचे आहे. अशा बकरी पासून झालेली पैदास ही जातिवंत निघू शकते. म्हणून शेळी पालकांनी अशा बकरीचे मोठ्या प्रमाणात पालन करावे असे आवारे यांनी सांगितले.

> उस्मानाबादी, संगमनेरी, जाफराबादी या जातीच्या बकऱ्या नियमितपणे दोन ते तीन पिलांना जन्म देतात. इतर विविध जातीच्या बकऱ्यांपैकी उस्मानाबादी सारखी एखादीच जातिवंत बकरी पहिल्याच वेतात चार, ते पाच पिल्ले देऊ शकते. मात्र गावरान बकरीने चक्क पाच पिल्लांना जन्म देणे ही असामान्य बाब आहे. **डॉ.संतोष भवर, पशुवैद्यक, मुखेड**




# मोघन येथे अण्णासाहेब द.वा. पाटील प्रतिष्ठानच्या माध्यमातून शिलाई मशीन वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**संकेत बागरेचा**

**नेर :** संपूर्ण धुळे तालुक्यात प्रतिष्ठानच्या माध्यमातून शिलाई मशीनचे वाटप करण्यात येत आहे. महिलांना स्वतःच्या पायावर उभ करण्यासाठी व रोजगार निर्मितीसाठी एक प्रामाणिक प्रयत्न प्रतिष्ठानच्या माध्यमातून केला जात आहे. यावेळी माझ्यासोबत छोटू तात्या, भिकन पैलवान, गोरख राजपूत, प्रदीप पाटील, दिनेश माळी, संजय नवसारे, नंदू पाखले, किरण पाटील, सुशील गवळी आदी उपस्थित होते.

# संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज


**फुलंब्री :** शहरामध्ये संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांची 399 वी जयंती तेली समाज मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सर्वप्रथम संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे भाजपचे जिल्हाध्यक्ष सुहासभाऊ शिरसाठ, तेली समाज संघटनेचे शहराध्यक्ष सुरेश मिसाळ, युवकचे शहराध्यक्ष अक्षय पाडळकर, भाजप शहराध्यक्ष योगेश मिसाळ, अंबादास तावडे, संतोष दुतोंडे, संतोष मिसाळ, उत्तम आढाव यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी संत जगनाडे महाराज यांच्या ३९९ व्या जयंती निमित्त राधा मिसाळ, शोता मिसाळ यांनी संताजी जगनाडे महाराज यांची प्रतिमा रांगोळीच्या माध्यमातून तेली समाज सभागृहात रेखाटली. त्यामुळे सुहास शिरसाठ व योगेश मिसाळ यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मधुकर दुतोंडे, रमेश राऊत, संतोष मिसाळ, कांता आढाव, सोमीनाथ दुतोंडे, जगन तावडे, प्रमोद मिसाळ, अशोक राऊत, गंगाधर तावडे, प्रकाश लोखंडे, बाळू तावडे, रमेश तावडे, भाऊसाहेब आढाव, राजू वाळके,गणेश मिसाळ, रमेश मिसाळ, गणेश तावडे, काशिनाथ दुतोंडे, विलास वाडेकर, रवी आढाव, संभाजी शिंदे, सतिश मिसाळ, सुरेश गायकवाड, कृष्णा तावडे, रामेश्वर तावडे, मनोज मिसाळ, विकास मिसाळ, कृष्णा दुतोंडे ,अमोल आढाव, सागर माठे, सतीश मिसाळ, मनोज राऊत, मुरलीधर राऊत, गोपाळ पंडित, ज्ञानेश्वर दुतोंडे, दिनेश मिसाळ, अक्षय आढाव, नितीन मिसाळ, ओम मिसाळ यांच्यासह आदी समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# राया स्पोर्ट्स क्लबचे कृतिका शिंदे व चिन्मय शिंदेची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**येवला :** स्पोर्ट्स डेव्हलपमेंट व प्रोमोशन फेडरेशन ऑफ इंडिया आणि नेपाळ युथ स्पोर्ट्स फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने 6 वी इंडिया-नेपाळ आंतरराष्ट्रीय ज्युनिअर स्पर्धा येत्या 7 जानेवारी ते 10 जानेवारी 2024 दरम्यान रंगशाला स्टेडीयम, पोखरा (नेपाळ) येथे संपन्न होणार आहे, या स्पर्धेसाठी नाशिक येथील राया स्पोर्ट्स क्लबचे दोन खेळाडूंची निवड झाली असून यात हॉकीसाठी कृतिका शिंदे व बॅडमिंटनसाठी





चिन्मय शिंदे या दोघांची निवड झाली आहे, निवडीबद्दल त्यांचे महाराष्ट्र संघटन राज्यमंत्री डॉ.निलेश राणे यांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिले.

# इंदोर व बंगळुरूकडे जाणारी गाडी दोन महिने रद्द

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** दक्षिण पश्चिम रेल्वे, बंगळुरू विभागातील बसमपल्ली रेल्वेस्थानक आणि श्री सत्यसाई प्रशांती निलयम दरम्यान तांत्रिक दुरुस्तीच्या कामासाठी प्रस्तावित 'ब्लॉक'मुळे अकोला मार्गे धावणाऱ्या दोन गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांना चांगलाच मनस्तापाचा सामना करावा लागणार आहे. १० डिसेंबर ते ४ फेब्रुवारी डॉ. आंबेडकर नगर येथून सुटणारी १९३०१ डॉ. आंबेडकर नगर-यशवंतपूर साप्ताहिक एक्सप्रेसच्या ९ फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. ही गाडी उज्जैन, इटारसी, न्यू अमरावती, अकोला, पूर्णा, काचीगुडा मार्गे धावते. १२ डिसेंबर ते ६ फेब्रुवारी यशवंतपूर येथून सुटणारी १९३०२ यशवंतपूर- डॉ. आंबेडकर नगर साप्ताहिक एक्सप्रेसच्या नऊ फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. अकोला मार्गे इंदोर, बंगळुरूसाठी एकमेव रेल्वेगाडी दोन महिन्यांपर्यंत रद्द झाल्याने प्रवाशांना त्रास सहन करावा लागणार आहे.





महाराष्ट्र Business Katta












# जगण्यातील सूत्रे विशद करणारी स्मरणिका



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**रोजच्या जगण्यातले प्रत्येक क्षण आपण जगत असतो. भिन्न - भिन्न अनुभव आपल्याला येत असतात. प्रत्यक्ष ते क्षण जगताना आपण त्या क्षणांचा बारकाईने विचार करतो का ? नाही. जेव्हा जीवनाच्या विशिष्ट टप्प्यावर आपण येतो, तेव्हा आपण सिंहावलोकन करतो. जीवनात घड़लेल्या घटनांचा आणि त्यावेळी आपण दिलेल्या प्रतिसादाचा काय परिणाम झाला , आपण असे न वागता तसे वागलो असतो तर , अशी मनाशी बेरीज - वजाबाक़ी करत असतो. निघून गेलेले क्षण पुन्हा आणता येत नाहीत आणि घडून गेलेली घटना किंवा चूक सुधारता येत नाही. या घटनांमधून , अनुभवांतून चुका सुधारण्याची शिकवण मिळते.**

निवृत्त न्यायाधीश लेखक श्रीराम कार्यकर्ते यांनी आपल्या जीवनातील महत्वपूर्ण कालखंडातील आठवणींचे सिंहावलोकन करताना अनेकांगी बारीकसारिक घटना, आठवणीं 'पाहता वळूनी मागे' या पुस्तकाद्वारे शब्दबद्ध केल्या आहेत. एक वकील ते न्यायाधीश असा प्रवास करताना ते कशा प्रकारे घडत गेले, या प्रक्रियेत आलेले अनुभव, केलेला संघर्ष , कामावरची निष्ठा, सोबतीचे सहकारी, मित्रपरिवार, ज्येष्ठ सहकारी, जजेस यांच्याकडून मिळालेले ज्ञान तसेच या क्षेत्रातील विविध खाचखळगे अशा न्यायव्यवस्थेशी निगडित आठवणींची ही जंत्री आहे. सामान्य माणसासाठी अपरिचित असलेले शब्द, प्रसंग, अशा क्षेत्रातील एकंदरीत वेगळा अनुभव या पुस्तकाद्वारे घेता येईल. 'पाहता वळूनी मागे' हे पुस्तक आत्मचरित्र नसून एका ठरावीक काळातील एकूण आठवणींची केलेली आखणी आहे, एकूणच अनुभवजन्य आठवणींचा लेखक कार्यकर्ते यांनी आढावा घेतला आहे. प्रथमपुरुषी निवेदनशैली, मनोवेधक भाषाशैली आणि विषयातील वैविध्यता यामुळे पुस्तक वाचण्याची उर्मी मनात निर्माण होते. वकील ते न्यायाशीध असे घड़ताना कार्यकर्ते यांच्या व्यक्तित्वात कसे सकारात्मक बदल घडत गेले, जबाबदारीचं काम करताना आलेल्या अडचणी, अटीतटीचे प्रसंग, केस घेऊन आलेले फिर्यादी, गुन्हेगार अशा गंभीर वातावरणात त्यांनी कशाप्रकारे सदसद्विवेकबुद्बीने न्यायदानाचे कार्य केले, असे अनेक प्रसंग वाचताना वाचक अंतर्मुख होतो.

सामान्य माणसाचं दैनंदिन जीवनात मी आणि माझे काम भले एवढ़ीच चौकट आखलेली असते. पोलीस स्टेशन आणि कोर्ट- कचेरी यांच्या पायऱ्या चढायला लागू नये, अशीच सामान्य माणसाची इच्छा असते. कधीकधी भांडणतंटे इतके विकोपाला जातात, की कोर्टाची पायरी चढावी लागते.कुठेही न्याय मिळाला नाही तरी इथे योग्य न्याय मिळेल, हा विश्वास आजही जनमानसात आहे.

भारतीय न्यायसंस्था आणि न्यायदानाच्या प्रकियेसंबंधीची समाजात असणारी उदासिनता दूर सारण्याचे कार्य या पुस्तकाच्या माध्यमातून केलेले आहे. बरेचदा ही प्रक्रिया वेळखाऊ, खर्चिक असते म्हणून सामान्य लोक यात पडत नाहीत. न्यायसंस्थेबाबत असलेली नकारात्मकता आणि गैरसमज या पुस्तकाद्वारे दूर होतील.

लेखकाचे मूळ गाव माढ़ा तालुक्यातील कुर्डू गाव असले तरी





शिक्षणासाठी नाशिक, पुणे अशी पायपीट करावी लागली. एस.एस. सीपासून ते स्वतंत्र राहू लागले त्यामुळे संपर्क साधण्यासाठी ते पत्रलेखन करु लागले आणि ते पत्रलेखन कलेच्या रूपात परावर्तित झाले, हे पुस्तक वाचताना जाणवते. सोलापूर, सांगोला, माळशिरस, मंगळवेढा, करमाळा या ठिकाणी लेखक कामासाठी जाऊ लागले. वकिली व्यवसाय त्यानी पंढरपुरात सुरु केला. या क्षेत्रामुळे अनेक स्नेही जोडले गेले. वकिली व्यवसाय करताना ज्या केसेस त्यांनी हाताळल्या, जे फिर्यादी भेटले , त्यांच्यासोबतचे किस्सेसुद्धा यात समाविष्ट केले आहेत.लेखक हे निवृत्त न्यायाधीश असले तरी ते उत्तम वाचक, रसिक आणि साहित्याची जाण असणारे आहेत. पुस्तकात एखादा प्रसंग वर्णन करताना त्यांनी दिलेली उदाहरणं, सुविचार, श्लोक रचना यांचा उल्लेख आणि त्यातील भावार्थ त्यांनी नेमकेपणाने सांगितला आहे.

लेखक कार्यकर्ते यांच्या स्वभावातील ऋजुता, संवेदनशील भाव सोबतच हजरजबाबीपणा , मिश्किलपणा त्यांच्या लेखणीत उतरला आहे. त्यामुळे पुस्तक वाचताना कंटाळवाणे वाटत नाही तर वाचनाची ओढ वाढते. एक खास वैशिष्टय म्हणजे, लेखक न्यायदान करताना जरी तटस्थपणे विचार करत असले तरी मुळात त्यांच्या विचारांना आध्यत्मिक बैठक आहे. कधी एखादा विचार मांडताना लेखक महाभारतातील प्रसंग सांगतात , बर्बरिकाचा उल्लेख करतात.तसेच तत्त्वज्ञ रूसो यांचे विचारही मांडतात. अध्यात्मातील नेमके सार उदाहरणासहित या पुस्तकात विशद केले आहे. अमळनेरला आलेला अनुभव हे आध्यात्मिक भावनेचे आणि साक्षात्काराचे उत्तम उदाहरण आहे. शारदा प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या पुस्तकाला श्री. भ. पानसे ( निवृत्त प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश , अध्यक्ष - सेवानिवृत्त न्यायिक अधिकारी संघ महाराष्ट्र ) यांनी प्रस्तावना लिहिली आहे. गीतांजली प्रधान यांनी समर्पक मुखपृष्ठ साकारले आहे. तसेच निवृत्त न्यायाधीश जी. डी. पारेख यांनी पुस्तकाची पाठराखण केली आहे. या पुस्तकातून वकिली क्षेत्रातील व्यक्तिंना या क्षेत्रातील अनेक बाबी समजतील तसेच या अनुभवातून शिकवण मिळेल तसेच सामान्य वाचकाला जीवनाची सूत्रे तसेच सकारात्मक जीवनाची व्याख्या उमगेल. जीवनात येणाऱ्या प्रत्येक प्रसंगाला कसे सामोरे जावे, याची वैचारिक पार्श्वभूमीची प्रचिती येईल. **(पाहता वळूनी मागे / लेखक : श्रीराम कार्यकर्ते / प्रकाशक : शारदा प्रकाशन / मूल्य : १५० रुपये )**

# इतिहास हा आपल्या सामाजिक संस्कृतीचा पाया



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आपला इतिहास हा आपल्या सामाजिक संस्कृतीचा पाया असतो.म्हणून इतिहासा बाबत खुप सज्जग आणि दक्ष असल पाहिजे.सामाजिक संस्कृती हि इतिहासाच्या आजुबाजूला फिरत असते. त्या त्या कालखंडातील इतिहास हा भविष्यातील पिढीसाठी प्रेरणादायी असतो. म्हणून इतिहासाच वास्तव चित्रणच समोर आलं पाहिजे. अर्धवट अथवा छेडछाड केलेला इतिहास समोर आला तर त्याचे भविष्यातील अनेक पिढ्यांवर दुष्परिणाम होतात म्हणून कोणाताही इतिहास हा लिहणारांनी दुरद्दष्टी ठेवून वास्तव चित्रण केलं पाहिजे.जसा आपला वास्तविक इतिहास असतो त्या दिशेने आपली सामाजिक संस्कृती मार्गक्रमण करत असते पण बहुतांश वेळा इतिहासा सोबत छेडछाड होते.**

वास्तव चित्र रेखाटलं जात नाही मग त्याचे अनेक दुष्परिणाम सामाजिक सांस्कृतिक वर होतात. वास्तव चित्रण हे कधीही उपयुक्त लाभकारी ठरत तर अवास्तव चित्रण हे दिशाहीन असतं. आपला इतिहास हा आपला आरसा असतो. जसा आरसा तसं प्रतिबिंब हे निश्चित असतं. त्यामुळे जसा इतिहास असतो तशी भविष्यातील भावी पिढी घडत असते. आपला इतिहास दैदिप्यमान, सुसंस्कृत,चैतन्यशिल असेल तर नक्कीच याचा परिणाम आपल्या दैनंदिन जीवनावर होत असतो. जीवनातील आर्थिक प्रगती हि जरी तंत्रज्ञान युगाच्या भोवती व आजुबाजूला फिरत असली तरी सुद्धा सामाजिक स्तरावर जर सामाजिक मुल्यमापन, राहणीमान, बोली भाषा, लेहजा, या सर्व सामाजिक प्रगतीच्या बाबी पाहिल्या तर ह्या बाबी आपल्या इतिहासाच्या आजु बाजूलाच फिरत असतात . म्हणून ज्यांचा इतिहास गौरवशाली तो देश तो समाज समुह आपोआप गौरवशाली अनुकरणीय दिशेने मार्गक्रमण करत असतो.म्हणून इतिहासाचं महत्व हे प्रत्येक व्यक्ती च्या जीवनात अनन्य साधारण असच असत. काही परकिय शक्ति ह्या त्या त्या युगानुसार वेगवेगळ्या हेतुने प्रेरीत होऊन एक विशिष्ट उद्देशाने दैदिप्यमान इतिहासा सोबत वारंवार छेडछाड करून एखादया मुळ संस्कृती वर हेतुपुरस्सकृत अघात करत असतात.आणि याच वेळी समजातील काही स्वयंघोषित ज्ञानी मंडळी देखील या षडयंत्रयाला बळी पडते.आणि आपण किती हुशार आहेत हे इतरांना दखविण्याच्या आविर्भावात चुकीच्या महितीला खतपाणी घातले जाते.आणि मग याचे दुरगामी परिणाम हे त्या त्या समाज व्यवस्थेवर देशावर होत असतात.मुळात हा प्रकार दुर्दैव आहे आणि हे आजचं नाही तर प्रत्येक युगातील त्या त्या वेळीच्या इतिहासा सोबत छेडछाड करत असतात आणि त्या मध्ये क्षणिक प्रसिद्धी साठी काही आप्तस्वकीय सुद्धा सहभागी होत असतात. हेच त्या त्या देशाच, समाज घटकांच दुर्दैव महणव लागेल. तसं पाहिलं तर इतिहास हा सामाजिक उत्थानाचा पाया आहे. इतिहास जेवढा भव्य दिव्य तितकाच तो देश प्रांत, तो विभाग किंवा सामाजिक समुह तेवढा दिशादर्शक, प्रगतशिल आणि प्रेरणादायी म्हणून आपल्या भविष्यातील पिढीला योग्य घडविण्यासाठी प्रथम आपला इतिहास दिशादर्शक आणि भव्य दिव्य दिसला पाहिजे आणि त्यामुळे इतिहासा सोबत छेडछाड किंवा चुकीची माहिती प्रसारित होण हे हजारो पिढयांच प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या नुकसान केल्यासारखच आहे. महणुन कोणीही आपल्या इतिहासा सोबत छेडछाड करणार नाही याची काळजी दक्षता विद्वान लोकांनी घेतली पाहिजे.जसा आपला इतिहास असतो तसाच आपला सामाजिक भुगोल घडत असतो.आपल्या जीवनावर आपल्या इतिहासाचा खुप मोठा प्रभाव हा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रित्या पडत असतोच.मग तो मान्य केला तरी असतोच आणि नाही केला तरी असतोच .म्हणून प्रत्येकाने आपला सत्य, वस्तुनिष्ठ,आणि वास्तविक इतिहास हा जाणला पाहिजे. मागे पाहुणच पुढं मार्गक्रमण करण हा मानवी स्वभावाचा भाग आहे. आपण आपलं जीवन घडवताना आपला ईतिहास हाच आपला मार्गदर्शक असतो.मग त्याच चित्रण ज्या पद्धतीने झालं आहे त्या पद्धतीने आपण प्रभावित होऊन मार्गक्रमण करत असतो. वास्तव चित्रण झालं असेल तर ते दिशा दर्शक प्रेरणादायी असतो आणि अवास्तव चित्रण झालं तर ते दिशाहिन ठरत असतो .मग तो इतिहास गावाचा असो कि विभागाचा अथवा राज्याचा देशाचा,किंवा मानवी समुदायातील वेगवेगळ्या कुटुंबाचा,कुळाचा ,समाजाचा, किंवा धर्माचा तो जर योग्य पद्धतीने लोकांच्या समोर आला तर तो फायदेशीर आणि प्रभावीच ठरतो.आणि जर छेडछाड होऊन चुकीच्या पद्धतीने समोर आला तर मग मात्र अनेक पिढयाचं अतोनात नुकसान होत.म्हणून समाजातील सुशिक्षित,ज्ञानी , हुशार लोकांनी आप आपल्या इतिहासाचं संवर्धन करून जतन केले पाहिजे.जेणेकरून आपला इतिहास हा आपल्या येणार्या भविष्यातील पिढीसाठी प्रेरणादायी मार्गदर्शक प्रेरणास्रोत ठरेल.याची काळजी दक्षता घेतली गेली पाहिजे तर आपण आपल्या सामाजिक संस्कृतीचा पाया मजबूत करण्यासाठी सहयभुत ठरतो अन्यथा आपण देखिल आपल्या सामाजिक संस्कृतीच नुकसान होण्यासाठी सहकार्य करतो.आपली निर्णायक भूमिका महत्त्वाची असते.



# तेवढा तिरस्कार कशासाठी करता ?



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**आजकाल 'तिरस्कार' हा शब्द अतिशय लोकप्रिय बनला आहे. कोण कसा कशासाठी कोणाचा तिरस्कार करेल याचा काही नेम नाही. श्रीमंत लोक गरीबांचा, व्यसनी लोक निर्व्यसनी लोकांचा,आळशी व्यक्ती कष्टाळू लोकांचा, चरित्रहीन लोक चारित्र्यवान माणसांचा आणि स्वतःला उच्च जातीचे मानणारे लोक मागासवर्गीय व्यक्तिंचा तिरस्कार करतात! हा तिरस्कार जाणूनबुजून,मुद्दाम आणि ठरवून केला जातो. तिरस्कार करण्याची ही वाईट प्रवृत्ती दिवसेंदिवस बळावत चालली आहे!तिरस्काराची ही हिणकस प्रवृत्ती फार पूर्वीपासून चालत आलेली आहे.**

भारतात जातीयतेची आणि विषमतेची बीजे पेरणाऱ्या मनुस्मृती पुस्तकाचे जाहीर दहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले.भारतीय राज्यघटना लिहून भारतातील विषमता व जातीयता बाबासाहेबांनी मोडीत काढली. हिंदू धर्माचा त्याग करुन लाखो अनुयायांसह बाबासाहेबांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला.बाबासाहेब जागतिक कीर्तीचे महान समाजसुधारक आहेत.तरीपण काही जातीवादी लोकांना बाबासाहेबांचे हे कार्य आवडत नाही. त्यामुळे असे जातीवादी वाईट लोक बाबासाहेबांचा तिरस्कार करत असतात.या तिरस्कारापोटी भारतीय राज्यघटना बदलण्याची भाषा करणाऱ्यांची संख्या वाढत आहे.एकीकडे भारतात जातीयता आता कोठे राहिली आहे ?असे भाषणात सांगणारे लोक आपल्या घरा शेजारी कोणता मागासवर्गीय व्यक्ती प्लॉट किंवा फ्लॅट विकत घेणार नाही याची खबरदारी घेतात. कोणी व्यक्ती भाड्याने रुम मागायला आला की त्याला त्याची जात विचारण्याची परंपरा व जात विचारुन भाड्याने रुम देण्याची प्रथा आजही अबाधित आहे. आरक्षणाचा तिरस्कार करणारे लोक भारतात समान नागरी कायदा आणण्याची भाषा करतात परंतु आपल्या ठायी ठासून भरलेले मनुवादी विचार सोडून द्यायला तयार नाहीत!

बाजारात इतर कोणत्याही वस्तू महागल्या तरी त्या महाग वस्तू गुपचूप खरेदी करणारे बिनडोक लोक शेतकऱ्यांनी घाम गाळून पिकवलेल्या शेतमालाचे भाव चुकून कधी वाढले की शेतमालाचा व शेतकरी बांधवांचा तिरस्कार करतात आणि बोलतात कसे,'गरीबांनी आता जगावे की मरावे. अबब!केवढी ही महागाई ?'असे म्हणणारे लोक मुळात गरीब नसतात.तसेच आळशी,कामचुकार व कर्तव्यशून्य नोकरदार हे प्रामाणिक व कार्यक्षम नोकरदार लोकांचा तिरस्कार करतात,अनादर करतात.गावातील कोणी तरुण मोठ्या पदावर नोकरीला लागला की भावकीतले आणि गावकीतले काही लोक उगाच जळफळाट करतात. कोणी उच्च शिक्षण शिकत असेल तर शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडलेले त्याचा तिरस्कार करतात. 'तेवढं शिकून काय फायदा ?' असे वाक्य बोलून मोकळे होतात. म्हणजे शिकणाऱ्याचे आपोआप खच्चीकरण होते. कोण कुठला महेंद्रसिंग धोनी क्रिकेट खेळात आला आणि आपल्या वेगळ्या शैलीने लोकप्रिय बनला. शांत, संयमी आणि उत्कृष्ट खेळाडू व कप्तान म्हणून त्याने नाव कमावले. पण त्याचे काही समवयस्क व सहकारी खेळाडू आजही त्याचा तिरस्कार करतात, त्याला नावे ठेवतात. माझे बंधू प्रा. राजेंद्र गुळवे हे आमच्या गावातील समाजशील राजकारणी म्हणून ओळखले जातात. ते दोनवेळा उपसरपंच झाले होते. परंतु जेव्हा सरपंच पदासाठी ते निवडणुकीत उतरले तेव्हा केवळ तिरस्कारापोटी बंधूच्या विरोधात भावकीतले दोघे जण उभे राहिले. परिणामी बंधूचा पराजय झाला. तात्पर्य हेच की आजकाल माणसांमध्ये तिरस्कार करण्याची वृत्ती वाढली आहे. चांगल्या, कष्टाळू इमानदार, कर्तव्यदक्ष, चारित्र्यवान व सामाजिक कार्य करणाऱ्या लोकांचा तिरस्कार करणे, त्यांना अपशब्द वापरणे आणि त्यांचे वाईट चिंतणे जोरात चालू आहे. तिरस्कार करणाऱ्या लोकांना इतकेच सांगावे वाटते की तुम्ही अगोदर चांगले बना,चांगले वागा आणि चांगले कर्म करा. मग तुमचाही आपोआप सत्कार होईल. आणि हे होऊ द्यायचे असेल, सन्मानाने जगायचे असेल तर विनाकारण दुसऱ्यांचा तिरस्कार करणे बंद करा. दुसऱ्यांचा तिरस्कार केला तर आपण सुखी होणार नाही, उलट आपलाच मनःस्ताप होत राहील.

# चीन - अमेरिका संबंध : आलेखाचा नवा बिंदू



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**मागील महिन्यात सॅनफ्रासिन्स्को येथे झालेल्या अमेरिका चीन संबंधाचा एक नवा बिंदू समोर आला आहे. आम्हाला अमेरिकेबरोबर कुठलेही शित किंवा गरम युद्ध करावयाचे नाही आम्हाला सुसंवाद हवा आहे हे शि-जिंग-पिंग यांचे उद् गार सुचक व अर्थपूर्ण आहेत. 1949 साली माओ-त्से-तुंग यांच्या अध्यक्षतेखाली चीनमध्ये साम्यवादी प्रजासत्ताकाची स्थापना झाली. तेव्हापासून अमेरिकेने लाल चीन ऐवजी तैवान चीनशी मैत्री ठेवली होती. अमेरिकेने 1971 साली माओच्या नेतृत्वाखालील साम्यवादी चीनला अधिकृत राष्ट्र म्हणून मान्यता दिली आणि अमेरिकचे चीनबरोबर राजकीय संबंध प्रस्थापित झाले. 1975 साली अमेरिकचे अध्यक्ष रिर्चड मिक्सन यांनी चीनला पहिली अधिकृत भेट दिली तेव्हापासून अमेरिका चीन संबंधाला सुरूवात झाली.**

सोएट रशिया आणि चीनमधील साम्यवादाला विरोध करणे अमेरिकेचे धोरण असल्यामूळे शित युद्धाच्या काळात साम्यवाद भांडवलशाही राष्ट्रामध्ये दीर्घकाळ तणाव निर्माण झाला होता. कोरिया आणि व्हियतनाम मधील संघर्षामूळे दोन्ही राष्ट्रांची फाळणी झाली. एकाची बाजू रशियाने घेताच दुसरी बाजू अमेरिकेने घेण्यास सुरूवात केली. 1979 साली अमेरिका व चीन यांच्या दरम्यान विज्ञान तंत्राज्ञान विषय सहकार्य करार झाला. दोन्ही देशांनी उभय देशामध्ये वकिलाती स्थापन केल्या. अमेरिका चीन संबंधात अनेक चढ उतार नोंदविण्यात आले आहेत. नविन सहस्त्रकामध्ये बराक ओबामा यांच्या काळात अमेरिका चीन संबंध सुधारले होते परंतू डोनाल्ड ट्रम्प यांच्या काळात ते अधिक बिघडले परंतू चीनचे अध्यक्ष शि-जिंग-पिंग यांच्या अमेरिका भेटीमुळे उभय देशातील संबंध सुधारण्यास सुरूवात झाली आहे.

**शित वा उष्ण युद्ध नको :** अमेरिकन अध्यक्षाच्या भेटीनंतर शि-जिंग-पिंग यांनी म्हटल्या प्रमाणे चीनला शित उद्ध किंवा उष्ण युद्ध नको आहे. चीनला अमेरिकेशी उबदार व स्नेहयुक्त संबंध ठेवायचे आहेत. परस्पर सहकार्य, आत्मिक संबंध आणि दोघांचाही फायदा या तीन तत्त्वावर आधारित संबंधाची फेरजूळणी करावयाची आहे. असे मत शि-जिंग-पिंग यांनी व्यक्त केले ते या नव्या संबंधाचे खरे गमक आहे. ट्रंप यांच्या काळात बिघडलेले संबंध सुरळीत करून चीनला अमेरिकेबरोबर व्यापार वाढवयाचा आहे. तसेच चीनी अर्थव्यवस्थेमध्ये जी मर्गळ आली आहे ती दूर करण्यासाठी चीनचा प्रयत्न आहे. कारण अमेरिकेशी व्यापारामुळे चीनी अर्थव्यवस्थेला नवी संजीवनी लाभणार आहे. चीनमधील रियल इस्टेट उद्योगातील पड-झड काही बँकाचे बुडणे बेकारीचे वाढते प्रमाण हे सर्व निराशाजनक चित्र पहाता चीनला अमेरिकेबरोबर जुळवून घेण्याशिवाय दूसरा पर्याय नव्हता.

**शैक्षणिक सहकार्य :** अमेरिका चीन दरम्यान असलेले फुल ब्राईट ही शिष्यवृत्ती योजना बऱ्याच काळापासून बंद होती. चीनमधील उच्च मध्यम वर्गीयांना अमेरिकेत शिकण्यासाठी जाण्यात मोठा रस आहे. अमेरिकन वकालतीनी आयोजित केलेल्या शैक्षणिक परिषदांना मोठी गर्दी उसळत आहे. हा कल पाहून शि-जिंन-पिंग यांनी चीनी तरूणांना खुश करण्यासाठी शैक्षणिक सहकार्याचे दरवाजे पुन्हा उघडण्याचा प्रयत्न केला आहे. अमेरिकेतील काही तरूणांना चीनमध्ये विज्ञान तंत्रज्ञानाचे शिक्षण घेण्यास रस आहे हे लक्षात घेऊन दोन्ही देश शिक्षण व संशोधन या क्षेत्रात जवळ येण्याचा प्रयत्न करत आहेत. तसेच ट्रंप यांनी ज्या चुका केल्या, त्या दुरूस्त करण्याचा जो-बिडेन यांचा प्रयत्न असल्यामुळे त्याचाही फायदा शि-जिंन-पिंग यांना झाला आहे.



**नवी समिकरणे :** शि-जिंन-पिंग यांचा हा अमेरिका दौरा त्यांचा 6 वर्षाच्या कारकीर्दितील पहिला दौरा होता. व्यापार, मानवाधिकार आणि साथीच्या रोगाबाबतचे धोरण अशा अनेक मुद्यावर दोन्ही नेत्यांनी चर्चा केली. शि-जिंन-पिंग यांचा अजिंडा अनेक मुद्यांनी युक्त होता परंतु चीनला अमेरिकेबरोबर निरोगी आर्थिक संबंधाची गरज आहे. या अपरिहार्यतेतून ही भेट झाली आहे. चीनची 'वन बेल्ट वन रोड' ही योजना आलिकडे काहीशी अडचणीत आली आहे. शिवाय चिनी अर्थकारणातील मंदीचे पावले भिती दाखवत आहेत, हे लक्षात घेऊन चीन अमेरिकेकडे अधिक सकारात्मक दृष्टीने पाहत आहे. द्विपक्षीय संबंध सुधारणे ही दोन्ही देशांची गरज होती संबंध अधिक चांगले होण्यासाठी जगातील दोनही महासत्तांनी वस्तुनिष्ठ विचार केला, ही बाब स्वागतार्ह आहे. चीनला पहिल्यांदा भेट देणारे माजी अध्यक्ष रिचर्ड मिक्सन असे म्हणत असत की, महासत्ता या जागतिक शांततेचे स्तंभ असतात त्यांनी एकमेकांना समजून घेऊन वागल्यास संघर्ष टाळता येतो. या समिकरणावर आधारून अमेरिका चीन बरोबर मैत्रीचा हात पुढे करत आहे. चीनी अध्यक्षाच्या अमेरिका दौऱ्यामुळे तैवान प्रश्नावरचा तणाव कमी झाला आहे, तसेच दक्षिण चीन समुद्रातील संघर्ष व तणाव सुद्धा कमी होणार आहे. सखोल संवाद हा जागतिक शांततेस पुरक ठरतो. अमेरिकेचे अध्यक्ष बिडेन आणि चीनी राष्ट्रध्यक्ष शि-जिंन-पिंग यांच्या सॅनफ्रासिन्स्को येथे झालेल्या शिखर परिषदेचे सार म्हणजे उभय देशातील गुंतवणूकीत होणारी वाढ होय. अमेरिकेत चीन समर्थक व चीन विरोधक असे दोन गट आहेत. परंतु बाईडन यांनी त्यामध्ये समन्वय साधून ही परिषद विधायक असल्याचे नमूद केले. अमेरिकेचे सुरक्षा प्रवृक्ते जॉर्न किर्नी यांच्या मते दोन्ही नेते इस्राइल व युक्रेनवर चर्चा करतांना वास्तव समोर ठेवून बोलत होते. चीनला हिंद प्रशांत क्षेत्रात सबुरीने वागण्याचा सल्लाही बिडेन यांनी दिला.

**दूरगामी परिणाम :** चीन आणि अमेरिका यांच्यातील संघर्षाची तिव्रता कमी होणे हे जगातील शांततेच्या दृष्टीने फायदेशीर ठरले आहे. मानवी कल्याणासाठी सायबर सुरक्षा अन्विक सुरक्षा महत्त्वाची असून कोविड- 19 सारख्या साथीच्या रोगाशी सामना करतांना सुद्धा महासत्तामधील समन्वय फायदेशीर ठरू शकतो. स्वच्छ ऊर्जा आणि हवामान बदला नंतरचे प्रश्न सोडविण्यासाठी दोन्ही देशांनी मानवी कल्याणासाठी योग्य धोरणे आखली पाहिजेत. मागील चूका टाळून पुढील मार्ग चोखाळतांना दोन्ही देशांना शहाणपणाचा पथ अनुसरणे आवश्यक होते. भविष्य काळात दोन्ही देशांनी प्रादेशिक प्रभावासाठी स्पर्धा टाळली पाहिजे. आणि मानवी कल्याणाच्या दृष्टीने पावले टाकली पाहिजेत. तैवान प्रश्नावर अमेरिका व चीन दोघांनही संमजस पणा दाखविला पाहिजे त्यामुळे लष्करी खर्च कमी होऊ शकले. चीनमधील देशांतर्गत आर्थिक प्रश्नांची गुंतागुंत वाढल्यामुळे चीनला अमेरिकेबरोबर नमते घेणे आवश्यक झाले होते. कारण दोन्ही देश व्यापारी भागीदार आहेत. यापुढे संबंध गोठविणे फायद्याचे नाही हे ओळखून संमन्वय व सुसंवाद या धोरणावर शि-जिंन-पिंग यांचा भर दिसून येत आहे. नव्या जगामध्ये आत्मविश्वासाने वावरण्यासाठी संबंध सुरळीत होणे आवश्यक आहे. हे चीनच्या लक्षात आले. त्यामुळे मागील इतिहाची पुर्नरावृत्ती न करता कटू आठवणी विसरून जाऊन चांगल्या परंपराचा प्रवाह मजबूत करण्यावर दोन्ही देशांनी भर दिला आहे. त्यामुळे आर्थिक शैक्षणिक तसेच विज्ञान तंत्राज्ञान या क्षेत्रात परस्पर देवाण घेणाव करण्यावर भर दिला जात आहे. चीन बरोबरचे संबंध सुधारण्यात अमेरिकेने धाडसी पाऊल टाकले आहे.

**समारोप :** या सर्व चर्चेचे सार असे आहे की, बिडेन प्रशासन चीन बरोबर संबंध सुधारतांना सावध पाऊले टाकत आहे. अमेरिकेपेक्षा चीनला आर्थिक संबंध सुधारण्यावर भर द्यावयाचा आहे. 15 नोव्हेंबर रोजी झालेल्या शिखर परिषेचे सार असे की, चीनला जूनी कात टाकून अमेरिकेशी आर्थिक संबंध सुधारावयाचे आहेत तर अमेरिकेचे अध्यक्ष बिडेन यांना पुढील अध्यक्षीय निवडणूकीत आपण चीनशी मैत्री केली असा, डांगोरा पिटावयाचा आहे. तसेच शि-जिंन-पिंग यांची लोकप्रियता कमी होत असून त्यांना अमेरिकन तरूणासाठी आपण काही करत आहोत हे दाखवायचे आहे, तसेच चीनी तरूणांना उच्च शिक्षणासाठी अमेरिकेचे दरवाजे पुन्हा उघडले जाणार आहेत. त्यामुळे बेकार चीनी तरूणांना शि-जिंन-पिंग नवा दिलासा देत आहेत. पंतप्रधान नरेद्र मोदी यांच्या यशस्वी अमेरिका दौऱ्यानंतर हवालदिल झालेल्या चीनी नेत्याला अमेरिकेपुढे नांग्या टाकण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. हा भारताच्या मुस्तद्देगिरीचा विजय होय. 2022 च्या उत्तरार्धात प्रे. बिडेन असे म्हणाले होते की, आता चीन बरोबर नवीन शितयुद्धाची गरज नाही. शि-जिंन-पिंग यांनी ही आम्हाला अमेरिकेबरोबर शित किंवा गरम युद्ध करावयाची गरज नाही असे सूचक उद्गार काढले. दोन्ही नेत्यांच्या विधानाचा अर्थ असा की, अमेरिका व चीनमधील शित युद्ध संपले आहे. त्यांना सकारात्मक, रचनात्मक संबंधाचे नवे युग सुरू करावयाचे आहे. याचा अर्थ असा की, शि-जिंन-पिंग यांचा अमेरिका दौरा म्हणजे दोन्ही देशांच्या संबंधातील आलेखाचा नवा बिंदू होय. ''कभी खुशी कभी गम'' असे पूर्वीचे संबंध होते पण यापुढे ''गम कमी आणि खुशी जास्त'' असे चित्र खरेच पहावयाला मिळेल काय ? ''तुझे माझे जमेना आणि तुझ्या वाचून करमेना'' अशी या दोन्ही देशांची गत झाली आहे. एवढे मात्र खरे !

# चला डॉ. बाबासाहेबांच्या विचारांची पेरणी करु




विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे निर्माते, समतावादी व्यवस्था प्रस्थापित करणारे समतेचे शिल्पकार, हजारो जातींना एकत्र सुखा समाधानाने नांदायला लाऊन जाती धर्माच्या पलिकडे माणसाला माणसाचा दर्जा, सन्मान देऊन भारतीय ओळख देणारे मानवतेचे व समतेचे कैवारी, स्त्रियांना सर्व प्रकारचे हक्क अधिकार बहाल करून स्त्रियांना पुरूषांपेक्षा वेगळे न समजता स्त्रीपुरूषांना समान अधिकार, समान दर्जा, समान संधी व समान हक्क अधिकार देणारे व महिलांच्या विकासासाठी हिंदू कोडबिलाला विरोध होतो. म्हणून मंत्रीपदाचा राजीनामा देणारे भारतीय महिलांचे खरे उद्धारक, सर्वच विषयांत ज्ञान मिळवून स्वतः बरोबर देशाचे नाव उंचावून बुद्ध अर्धात बुद्धीचे प्रतिक हेच पुन्हा एकदा साध्य करून जगातील सर्वात विद्वान विद्यार्थांचा बहुमान मिळवून जागतिक ज्ञानाचे प्रतिक ठरलेले सर्व श्रेष्ठ विद्वान, मानसिक गुलामी, अंधविश्वास व विषमतेच्या बेडीतुन मानवाला मुक्त करून मानवी स्वातंत्र्य बहाल करणारे, मानवाचे हक्क अधिकार सुरक्षित करून त्यांना संरक्षण देणारे आणि देशाला सार्वभौम बहाल करणाऱ्या संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर आजही बहुसंख्य लोकांना समजले नाही हि शोकांतिका आहे.**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल दोन मोठे गट मोठ्या प्रमाणावर आज दिसून येतात पहिला गट डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना स्वतः ची मालकी समजून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल भावनिक होऊन जयजयकार करतो तर दुसरा गट आजही डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान घरात आणत नाही आणि वाचत नाही. दोन्ही विरुद्ध विचारसरणीचे लोक डॉ बाबासाहेब आंबेडकर व त्यांची चळवळ मागे ओढत आहेत. कारण एक समुह निव्वळ डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर घेऊन नाचत आहे तर दुसरा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार मानायला तयार नाहीत दोन्ही प्रकारचे लोक देशासाठी व देशातील मानसासाठी घातक आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खरे अनुयायी हे वैचारिक असतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी जाती धर्मापलिकडे जाऊन विचाराचा स्विकार करून त्याचा प्रचार आणि प्रसार करतात. परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर घेतलेल्या लोकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पाहिजे तसे स्विकारले नाही. आणि काहिंनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार वाचले नाही म्हणजे वैचारिक पातळीवर दोन्ही गट मागासलेले च आहेत. परंतु या दोन्ही गटाच्या मध्ये एक गट आहे जो सतत डॉ बाबासाहेब आंबेडकर, भारतीय संविधान, जनकल्याण, राष्ट्रहित व नागरिकांचे हक्क अधिकार याबाबद जागृती करत असतो. आणि हाच गट खऱ्या अर्थाने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा अनुयायी आहे असे माझे मत आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर जातीचे आहेत म्हणून माणणारा गट आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर जातीचे नाहीत म्हणून त्यांच्या विचारापासून दुर गेलेला गट हा भारतीय संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार अर्थातच फुले शाहु आंबेडकरवादी चळवळीच्या फायद्याचे नाहीत. कारण या दोन्ही गटाला डॉ बाबासाहेब आंबेडकर समजले नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर समजून घेण्यासाठी अगोदर आपल्याला डोक्यातील विषमता, उच्च निच्चता व भेदभाव बाजूला सारून माणसाचा माणूस म्हणून स्विकार करता आला पाहिजे. जो व्यक्ती माणसाला माणूस म्हणून स्विकारत नसेल तो माणूस राष्ट्रहीतासाठी घातक असतो मग कोणत्याही जाती धर्माचा असो. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जाती अंताची लढाई लढून माणसाचे अस्तित्व निर्माण करून सर्वांना भारतीय केले आणि आजही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा उल्लेख करून जातीचा गर्व व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव न घेता स्वतः ला वरच्या जातीमधील समजने म्हणजे आपल्या डोक्यातील वरचा मजला रिकामा असल्याचे सिद्ध करणे होय. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रत्येक विचार व कार्य हे कधीच एका जातीला, धर्माला उद्देशून नव्हते तर समस्त मानवाच्या कल्याणासाठी होते. परंतु त्यांचे विचार समजून न घेतल्याने देशाचे लोकांचे खुप मोठे नुकसान झाले आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला मताधिकार देऊन देशाचा राजा होण्याची व राजा निवडण्याची संधी निर्माण करून देखील आजही आम्ही आमचे खरे प्रतिनिधी निवडू शकत नाही याचा अर्थ मताधिकार आणि त्याचे गांभीर्य लोकांना आजही कळाले नाही. आणि याचेच दुष्परिणाम आज बघत आहोत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर घेऊन मिरवणारा बौद्ध, दरवर्षी करोडो रुपयांची पुस्तके खरेदी करणारा बौद्ध यांना आजही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार कळाले नाही. जर कळाले असते तर शेकडो करोडो रुपयाच्या पुस्तकातुन खरे विचार बाहेर पडून किमान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे काही तरी आमदार खासदार असायला पाहिजे होते पण तसे काही दिसत नाही. ज्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर व विचार वाचले नाही त्यांनी जाती धर्माच्या व नातेसंबंधावरून लोक निवडून दिले त्या लोकांनीही समाजाकडे न बघता स्वतः ची घरे भरायला सुरवात केली. यातून जनता त्रस्त आणि लोकप्रतिनिधी मस्त झाले. परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या मताधिकाराची जाणीव असती आणि त्यांचे विचार स्विकारले असते आणि जात धर्म नाते संबध न बघता त्या व्यक्तीची काम करण्याची क्षमता व प्रामाणिक पणा बघुन निवडून दिले असते तर आज समस्या सुटल्या असत्या. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला महत्वपूर्ण संदेश म्हणजे शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा. हा संदेश कोणासाठी होता ? हेच लोक विसरून गेले. शिक्षण तत्कालीन महार आणि आजच्या बौद्धांनाच आवश्यक आहे का ? संघटन फक्त बौद्धांनाच पाहिजे का ? आणि संघर्ष केवळ बौद्धच करतात का ? समान समस्येसाठी जाती धर्माचा विचार न करता शिकलेल्या लोकांनी अर्थात जागृत लोकांनी संघटीत होऊन संघर्ष केला तर जनकल्याण साध्य होते पण परंतु आजही बरेच शिकलेले लोक अडाणी व स्वार्थी नेत्यांच्या मागे फिरतात तेव्हा त्यांच्या शिक्षणाची किव येते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अजून एक संदेश दिलेला होता तो म्हणजे जा आणि आपल्या



घराच्या भिंतीवर लिहून ठेवा आपल्याला शासनकर्ती जमात बनायचे आहे. हा संदेश थोडा फार फक्त बौद्ध लोकांनी मनावर घेतला पण इतरांना शासनकर्ते बनायचे नाही का ? इतरांना शासनकर्ते यांचा अर्थ कधी कळणार ? सध्याचे उदाहरण घ्यायचे तर मराठा समाजाचे आमदार खासदार मंत्री मुख्यमंत्री असुनही मराठा समाजा कडून एकही नेता बोलत नाही तर याला मराठ्यांची सत्ता म्हणायची का ? मराठ्यांच्या खांद्यावर बंदुक ठेवून कोण सत्ता चालवत आहे हे ओळखता आले पाहिजे तरच आपण जागृत झालो असे सिद्ध होईल. शासनकर्ती जमात झाल्यावर त्या जमातीचे प्रश्न सुटलेले असतात. म्हणजे आपल्या शिक्षण, आरक्षण, हक्क अधिकार, व देशाचा कारभार समजून घ्यायचा असेल तर अगोदर आपल्याला संविधान वाचुन समजून घेणे, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे जनकल्याणाचे विचार समजून घेणे आवश्यक आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे मी प्रथम भारतीय आणि शेवटी ही भारतीयच आहे.हेच बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार प्रत्येकाच्या मनात रूजले तर देशात कधीच जाती धर्माच्या नावावर दंगल होऊन कधीच जाती धर्माचा गर्व करण्याची वेळ येणार नाही कारण सार्वजनिक ठिकाणी आमची ओळख जाती धर्मावरून नाही तर कर्मावरून भारतीय ठरते. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे कोणत्याही धर्माचे विरोधक नव्हते. उलट दोन भाऊ ज्या घरात सुखाने राहु शकत नाहीत त्या देशात हजारो जाती, भाषा, वेशभूषा, खाणपान, संस्कृती वेगवेगळे असणाऱ्या लोकांना भारतीय नावाखाली एकत्र केले पण त्यांच्या धर्मावर कोणतेही बंधने न लादता प्रत्येकाला आपल्या वैयक्तिक जिवनात धर्माचे पालन करणे, उपासना करणे याचे स्वातंत्र्य दिले. परंतु धर्म हा सार्वजनिक ठिकाणी इतरांवर थोपवू नये म्हणजे भारत व भारतीय ओळख कायम राहील असे सर्वश्रेष्ठ संविधान आहे. अनेक लोक डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतर केले त्यांना हिंदु विरोधी ठरवण्याचा प्रयत्न करतात. परंतु तेच बाबासाहेब आंबेडकर मनुस्मृती चे दहण रायगडाच्या पायथ्याशी का करतात, संत तुकाराम महाराज यांचे अभंग वृतपत्राच्या मुख्य भागावर का छापतात, यावर कोणी बोलत नाही. उलट तुकाराम महाराज, तुकडोजी महाराज, गाडगेबाबा यांनी तर धर्मांतर केले नाही मग त्यांचे तरी विचार मानतात का ? थोडक्यात काय तर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराची खरी पेरणी होणे आवश्यक आहे. आणि हि पेरणी करण्यासाठी सर्व वैचारिक लोकांनी एकत्र येऊन, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर घेणारे कोणाबद्दल काय बोलतात किंवा डॉ बाबासाहेब आंबेडकर ज्यांनी वाचलेच नाही ते काय बोलतात याचा विचार न करता आपण दोघांमध्येही जागृती निर्माण व्हावी म्हणून विचाराची पेरणी एकत्र येऊन करून तरच देश व देशातील जनता समृद्ध होईल. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला मताधिकार आज शुन्य झाला आहे. म्हणून समस्या वाढत आहेत. ईव्हिएम ला विरोध करून लोकशाही जतन करण्यासाठी व विचाराची पेरणी करण्यासाठी वैचारिक लोकांनी एकत्र यावे. तरच देश टिकेल.

# निवडणूक आश्वासनांची पूर्तता कितपत शक्य ?



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**नुकत्याच पार पडलेल्या मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड आणि तेलंगणा या चार राज्यांमधल्या निवडणूकीत प्रचारादरम्यान मोफत योजना जाहीर करण्यात आल्या. तीन राज्यात भाजप तर एका राज्यात काँग्रेस सत्तेवर आली आहे. आता या निवडणुकीतीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता कशी केली जाईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. असे सांगितले जाते कि, छत्तीसगड आणि तेलंगणा ही निवडणूक आश्वासने पूर्ण करण्यासाठी चांगल्या स्थितीत आहेत पण ही आश्वासने पूर्ण करण्याचा मार्ग राजस्थानसाठी सोपा नाही. महसुलाच्या बाबतीत मध्य प्रदेश चांगल्या स्थितीत आहे पण येथील कर्जाची पातळी बरीच अधिक आहे.**

भारतीय जनता पक्ष (भाजप) निवडणुकीत राजस्थानमध्ये काँग्रेसला धूळ चारून सत्तेत आला आहे. उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना 450 रुपयांना एलपीजी सिलिंडर उपलब्ध करून देण्याचे, पीएम किसान सन्मान निधी अंतर्गत आर्थिक मदतीची रक्कम वार्षिक 12,000 रुपये करण्याचे, 2,7000 रुपये प्रति क्विंटल गहू खरेदी करण्याचे आश्वासन दिले. वृद्धापकाळ निवृत्ती वेतनात वाढ करण्याचे आश्वासन दिले आहे.

राज्य आधीच आर्थिक अनिश्चिततेशी सामना करत आहे, त्यामुळे साहजिकच या योजनांची अंमलबजावणी केल्यास आर्थिक ताण आणखी वाढणार आहे. वसुंधरा राजे यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारचे पहिले वर्ष (2014-15) वगळता गेल्या 10 वर्षांत राज्याचे कर्ज सकल राज्य देशांतर्गत उत्पादनाच्या (GSDP) 30 टक्क्यांपेक्षा कमी कधीच नव्हते. मात्र, भाजप सरकारच्या काळात हे प्रमाण 35 टक्क्यांहून कमी होते आणि सध्याच्या काँग्रेसच्या काळात (वर्ष 2018-23) याने 35 टक्क्यांची पातळी ओलांडली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) गेल्या वर्षी केलेल्या अभ्यासात, राजस्थानला उच्च आर्थिक ताण असलेले राज्य म्हणून वर्गीकृत करण्यात आले होते.

राजस्थानच्या महसुली खर्चापैकी निम्मा पगार, निवृत्तीवेतन आणि व्याज देयके यासारख्या निश्चित बाबींवर जातो. महसुली खर्चाच्या इतर श्रेणींप्रमाणे, यामुळे संपत्ती निर्मितीमध्ये गुंतवणुकीला फारसा वाव मिळत नाही. गेल्या दशकात भांडवली खर्च एकूण खर्चाच्या 15 टक्क्यांपेक्षा कमी राहिला आहे.

मध्यप्रदेशमध्ये सत्ताविरोधी ट्रेंडनंतरही भाजपच्या सत्तेत पुनरागमनाचे श्रेय लाडली बहना योजनेला दिले जाते, हा एक महिला-केंद्रित कार्यक्रम असून पक्षाने इतर अनेक कल्याणकारी योजनांचेही आश्वासन दिले आहे. राज्य सरकारने 2023-24 या वर्षाच्या अर्थसंकल्पात या योजनेसाठी 8,000 कोटी रुपयांची तरतूद केली. तथापि, ऑक्टोबरपासून, किमान 23 वर्षे वयाच्या महिलांना 1,200 रुपये दिले जातील, जे सध्या 1,000 रुपये आहे. कोविड महामारीने प्रभावित 2020-21 या वर्षासह काही वर्षे वगळता, राज्याचा अतिरिक्त महसूल उपलब्ध आहे. अशा परिस्थितीत, ते या विनामूल्य योजनांना सहजपणे निधी देऊ शकतात.

तथापि, चालू आर्थिक वर्षात त्याचे कर्ज सकल राज्य देशांतर्गत उत्पादनाच्या (GSDP) 30 टक्क्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. राज्य भांडवली खर्चासाठी कर्ज घेऊ शकते आणि त्यातील बहुतांश भाग संपत्ती निर्मितीसाठी (भांडवली खर्च) वापरला जाऊ शकतो. तथापि सरकारने जाहीर केलेल्या लोकाकर्षक योजनांचा सरकारच्या महसुलावर परिणाम होऊ शकतो आणि राज्याचे कर्ज आणखी वाढू शकते. छत्तीसगडमध्ये भाजपने दोन वर्षांत 100,000 सरकारी जागा भरण्याचे, गरीब महिलांना 500 रुपये प्रति सिलिंडर दराने एलपीजी




सिलिंडर, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मासिक प्रवास भत्ता, 18 लाख घरे बांधणे, भूमिहीन शेतमजुरांना एका वर्षाला 1,000 रुपये देण्याचे, विवाहित महिलांना वर्षाला 12,000 रुपये भत्ता आणि 3,100 रुपये प्रति क्विंटल दराने प्रति एकर 21 क्विंटल धान खरेदी करण्याचे आश्वासन दिले आहे. भूपेश बघेल सरकारची काही वर्षे, विशेषतः आर्थिक मंदीची वर्ष 2019-20 आणि 2020-21 आणि रमण सिंग सरकारचे एक वर्ष (2014-15) वगळता या योजना पूर्ण करण्यासाठी राज्याकडे पुरेशी संसाधने आहेत. राज्याने महसुली अधिशेषाची पातळी राखण्यात यश मिळवले आहे.छत्तीसगडचे कर्ज त्याच्या सकल राज्य देशांतर्गत उत्पादनाच्या (GSDP) 24 टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे, जे आटोपशीर आहे. राजस्थानप्रमाणेच राज्यानेही जुनी पेन्शन प्रणाली निवडली आहे. तथापि, 2004 मध्ये भरती करण्यात आलेले कर्मचारी निवृत्त होण्यास सुरुवात झाल्यावर म्हणजे 2034 च्या आसपास सरकारी तिजोरीचे दायित्व काय असणार आहे हे स्पष्ट होईल.

तेलंगणा आर्थिकदृष्ट्या मजबूत आहे. काँग्रेसने आपल्या सहा हमींमध्ये प्रत्येक महिलेला 2500 रुपये प्रति महिना आर्थिक मदत, 500 रुपयांना एलपीजी सिलेंडर, सर्व घरांसाठी 200 युनिट मोफत वीज, शेतकऱ्यांना प्रति एकर 15,000 रुपये वार्षिक मदत देण्याचे आश्वासन दिले आहे. याशिवाय, शेतमजुरांना वर्षाला 12,000 रुपये बोनस, भातपिकांसाठी प्रति वर्ष 500 रुपये आणि ज्येष्ठ नागरिकांना 4,000 रुपये मासिक पेन्शन देण्याचे आश्वासन दिले आहे.

कर महसुलाच्या बाबतीत राज्य आर्थिकदृष्ट्या मजबूत आहे, त्यामुळे मोफत योजनांना निधी देण्यास कोणतीही अडचण येणार नाही. राज्याच्या कर महसुलाचा गेल्या सात वर्षात महसूल प्राप्तीपैकी 60 टक्क्यांहून अधिक वाटा आहे. असे असूनही, के चंद्रशेखर राव यांच्या सरकारच्या दुसऱ्या डावाच्या पहिल्या तीन वर्षांत तेलंगणाला महसुली तूट जाणवली. तथापि, तेलंगणा राष्ट्र समिती (आता भारत राष्ट्र समिती) शासनाच्या सुरुवातीच्या कार्यकाळात, राज्याने सातत्याने महसूल अधिशेष राखला. यामुळे आश्वासन दिलेलया मोफत सेवा आणि योजनांमुळे राज्याचे महसुली नुकसान होईल की नाही हे पाहावे लागेल.

# गुरु शिष्यपण हे तो अधम लक्षण




हेमंत टाले
संपर्क क्र. 9975807632

आधुनिक केसरी

**गुरु हे बहुजन समाजावर प्रभुत्व गाजवण्यासाठी उच्चवर्णीयांनी वापरलेलं सर्वश्रेष्ठ हत्यार होय. गुरु शिष्य परंपरेतून बहुजन समाजाचं जितकं शोषण आजपर्यंत झालं तेवढं अन्यत्र कुठल्याही परंपरेने केलं नसेल. गुरु ही फक्त उच्चवर्णयांची मक्तेदारी होती. वैदिक परंपरेनुसार गुरूंचा महिमा अपरंपार आहे. आणि म्हणून रामदास म्हणतात. "गुरु तो सकळाशी ब्राह्मण| जरी तो झाला क्रियाहीन| तरी तयाशीच शरण| अनन्यभावे असावे||"**

पुढे रामदासाचा शिष्य भीमस्वामी लिहितो "सद्गुरुचा कधी न यावा वीट| जरी झाला भ्रष्ट सर्वतोपरी||" गुरु जरी वेभीचारी असला तरी त्याला कृष्ण रूप मानलं पाहिजे. अशा नवीन नीती मूल्यांची रुजवन वैदीकांनी जनसामान्यांमध्ये केली. गुरु पदाला अनन्य साधारण महत्व दिल्यामुळे गुरूला सर्वस्व समर्पित केलं पाहिजे हा विचार अनपढ लोकांमध्येच नव्हे तर शिकल्या सवरलेल्या सुशिक्षित लोकांच्या मेंदूमध्ये पण कोरल्या गेला. त्याचं जिवंत उदाहरण म्हणजे अलीकडेच एका हायकोर्टच्या जज ने आपली बायको गाडी बंगल्यासहित एका कानफुक्या गुरुला समर्पित केल्याची घटना सर्वश्रुत आहे. कृष्णाचं सोंग घेऊन असंख्य मुलींचे लैंगिक शोषण करणारा शुकदास ही वैदिक परंपरेचीचं देन होय. भारतीय संस्कृतीचा विषमता मुलक असणारा हा प्रवाह जनसामान्यांचं आर्थिक, शारीरिक, मानसिक, विशेष म्हणजे किती लैंगिक शोषण करत होता आणि आजही करत आहे हे वरील उदाहरणावरून स्पष्ट होते. याचं गुरु शिष्य परंपरेचा फायदा घेऊन आसाराम बापू आपल्या पुस्तकामध्ये लिहितो. गुरुने बायको मागतली तरी दिली पाहिजे. असं लिहिण्याची हिम्मत त्याला कुठून आणि कशी आली तर गुरु शिष्य परंपरेतून.त्यांने लिहिलेल्या पुस्तकाला एका विशिष्ट धर्माशी जोडुण ते धार्मिक पुस्तक म्हणून वाचन केल्या गेलं असे अनैतिक कृत्य करणारा आणि ते पुस्तकामध्ये नोंदवणारा व्यक्ती आम्ही भारताचा सगळ्यात मोठा आध्यात्मिक गुरु म्हणून जगाच्या पटलावर नेऊन पोहोचवतो. संस्कृतीचा यापेक्षा निकृष्टपणा दुसरा असू शकतो का? आज तो जेलमध्ये आहे. आजच्या या विज्ञान युगामध्ये भारतीयांकडे परकीयांचा पाहण्याचा दृष्टिकोन कुठला असेल त्याची कल्पना आपण केली पाहिजे. अशा गुरुने केलेल्या उपद्वापामुळे आणि आपण त्याला दिलेल्या फिजूल महत्त्वा मुळे आपल्या देशाची मान किती उंचावली असेल असा प्रश्न आपल्याला पडायला हवा एरवी धर्माचा उदो उदो करणारे तथाकथित धर्म रक्षक याविषयी कधी बोलताना दिसले का? भारतीय संस्कृतीचा दुसरा प्रवाह जो समता मुलक आहे. या प्रवाहातील संत आणि महापुरुषांनी या गुरु शिष्य परंपरेवर मात्र जोरदार कोरडे ओढलेले आहे. जनसामान्यांना फसवणाऱ्या लुबाडणाऱ्या या लुटारू गुरूंना राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ते कुत्र्यापेक्षाही नीच असल्याचे म्हटले आहे. "कई जादुगर होते गुरु| फु फा किया करते सदा|| ठाणे ठुणे बतलायके|दुनिया किया करते फिदा|| पर याद रखना भाईयो| ये गुरु नही गुरगुर है|| कुत्ते तभी कुछ ठीक है| पर ये लुबाडे शूर है||" राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी म्हटल्याप्रमाणे गुरु हाडामासाचा नव्हे अर्थात कुठलीही एक व्यक्ती माणसाचा गुरु नसतो. आपण अनेक व्यक्तीकडून ज्ञान घेत असतो. अनुभव घेत असतो. त्यामुळे अनुभवातून मिळालेल्या ज्ञानाला त्यांनी गुरु म्हटलेलं आहे. खऱ्या अर्थाने आपणच आपले गुरु असतो. याविषयी संत नामदेवांचे संशोधन पुढील प्रमाणे



"तुझा तुझी गुरु| तुझा तुझी शिष्य|| तुझा तुझी उपदेश| घेई नामा||" ज्ञानदेवा विषयी पूर्ण आदर राखून आपल्याला म्हणावंच लागतं की संत नामदेव महाराजांनीच वारकरी संप्रदायाचा खऱ्या अर्थाने पाया रचला. त्याच नामदेवाला इथल्या वैदिक परंपरेने कच्च मडकं म्हणून हिणवलेलं आहे. अर्थात कितीही उच्च प्रतीची प्रतिभा तुमच्याकडे असेल तरी उच्च वर्णीयांशिवाय कोणीही गुरु पदाला प्राप्त होऊ शकत नाही. कारण "ब्राह्मण वेद मूर्तीमंत| ब्राह्मण तोची भगवंत||" "ब्राह्मण जरी मूडमती तरी तो जगद्वंद्य" रामदासाच्या वरील ओळी नुसार उच्चवर्णीय सोडून कुणालाही गुरुत्वाचा अधिकार नाही. परंतु संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी मात्र याचा जोरदार विरोध केला. आणि "सकळासी येथे आहे अधिकार" अशी जोरदार गर्जना केली. शिष्याला आज्ञेत ठेवून त्याची सेवा करून घेणाऱ्या आणि गुरुत्व गाजवणाऱ्या दांभिकांना तुकोबांनी चांगले झोडपून काढले. "गुरु शिष्यपण हे तो अधम लक्षण" गुरु शिष्य पण हे समाजाला अधोगतीकडे नेणारे आहे असं संत तुकाराम म्हणतात. जर एकच ईश्वर दोघांमध्ये व्यापलेला आहे तर कोणी एक श्रेष्ठ असं का बरं म्हणावं. गाडगे महाराज म्हणायचे "माह्या कोणी गुरु न्हाई अण माह्या कोणी चेला न्हाई" आणि म्हणून गुरु मंत्र देऊन शोषणाच तंत्र वापरणाऱ्या तथाकथित दाभिकांचा आमच्या वारकरी संप्रदायाच्या सगळ्या संतांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आधुनिक कर्मयोगी गाडगेबाबा आणि तमाम महामानवांनी जोरदार विरोध केला. शेवटी कोण्याही एका व्यक्तीला जगातल्या सगळ्या विषयाचं समग्र ज्ञान नसतं हे आपण समजून घेतलं पाहिजे आणि म्हणून दत्तात्रेयांनी अनेक गुरु मानले त्यामध्ये प्राण्यांचाही समावेश होता. शेवटी राष्ट्रसंतांनी गुरु शिष्य परंपरेला छेद देऊन स्वतःची गादी निर्माण केली नाही. आणि अमुक हा माझा शिष्य आहे म्हणून गादीवर बसवले नाही. आणि म्हणून एका काळात ज्ञान व्यक्ती केंद्रित होते. आज ज्ञानाची गंगा ओसंडून वाहत आहे. त्यामुळे गुरु शिष्य परंपरा राहावी असा हा काळ निश्चितच नाही.

# जीवनात माणसे जपायला शिका...



बुद्धभूषण चं. कांबळे
संपर्क क्र. 7498715661

आधुनिक केसरी

**आजच्या अधूनिक युगात माणूस पैसा कमावण्यासाठी वाट्टेल त्या मार्गाचा वापर करत आहे व पैसा मिळवत आहे.कारण आजकाल झटपट श्रीमंत होण्याची जणू स्पर्धाच लागली आहे.त्यासाठी माणूस कोणत्याही थराला जाऊन पैसा कमावत आहे. आलिशान बंगला बांधत आहे. एकापेक्षा एक भारी भारी गाड्या घेत आहे आणि श्रीमंतीचे प्रदर्शन करत आहे. परंतु या नादात आपण आपल्या जवळच्या माणसांपासून व नातेवाईकांपासून दूर दूर जातोय हे त्याला कळत नाही.सांगायचा मुद्दा काय तर हल्लीच्या लोकांना पैसा हेच सर्वस्व वाटत आहे. पैसा फेकला की आपली सर्व कामे झटपट होतात. कोणत्या कामात अडकून पडायची गरज नाही. असे आजकालच्या लोकांना मनोमन वाटत आहे.**

ते खरेही कदाचित पण सगळीच कामे पैशाने होतात असे म्हणणे साफ चूकीचे आहे.पैशापेक्षा व धनदौलतीपेक्षा जीवनात कमावलेली माणसेच जास्त कामाला येतात हे अगोदर लक्षात घ्यायला शिका.कारण आपल्या कठीण काळात पैसा नाही तर माणसेच जास्त कामाला येणार आहेत.त्यासाठी जीवनात नेक, इमानदार व चारित्र्यवान माणसेच जोडायला हवेत.ही जोडलेली मंडळीच आपल्या संकटकाळात व अडी-अडचणीत मदतीला चटकन धावून येईल.फक्त त्यासाठी आपल्याला गरज आहे ती जिभेवर साखर आणि डोक्यावर बर्फ ठेवण्याची. म्हणजे आपल्या जीवनात आपोआप मित्रपरिवार वाढत जाईल.तेव्हा आपल्यालाही कळून चुकेल की, जीवनात पैशापेक्षा कमावलेली माणसेच जास्त महत्वाची ठरतात.कारण आपल्याला जन्मही माणसानेच दिलाय आणि शेवटही माणसेच करणार आहेत.कारण जी कामे पैशाने होतात, त्यापेक्षाही अधिक कामे ही माणसाने होतात.हे अगोदर आपण लक्षात घेतले पाहिजे.दुसरा एक महत्वाचा मुद्दा म्हणजे माणसाला दोनच गोष्टी हुशार बनवतात एक तर वाचलेली पुस्तके नाहीतर भेटलेली माणसे. म्हणून जोडतानाच अशी माणसे जोडा की,त्यांच्या परिस्पर्शाने आपल्या जीवनाचे सोने होऊन जाईल व आपल्यालाही त्यांच्यापासून काहीतरी चांगले विचार व ज्ञान घेता येईल.त्यासाठी नुसते माणसेच जोडून चालणार नाही तर ते आपल्याला जीवनभर सांभाळता व जपता आली पाहिजेत. जाता जाता आणखीन एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सध्या व्यसनी, दुराचारी व व्याभिचारी लोकांचा सुळसूळाट वाढला आहे.अशा लोकांपासून चार हात लांबच राहिलेले बरे.त्यासाठी नेक इमानदार व चारित्र्यवान लोकांची संगत ठेवून ती माणसे जपायला शिका तरच आपले भविष्य उज्वल आहे. नाहीतर आपले जीवन कोरडे पाषाण आहे.एवढे मात्र नक्की...

# लोकसंवादी साहित्य पुरुष : अनुरत्न वाघमारे

आधुनिक केसरी

**आंबेडकरी चळवळीतील माणूस जात्याच संवादी असतो. विविध माध्यमांतून तो लोकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करतो. माणूस जोडण्याचीच ती प्रक्रिया असते. आंबेडकरी चळवळ रस्त्यावरची आंदोलने राजकीय सहभाग, साहित्य, जलसे यातून प्रामुख्याने मार्गोत्क्रमण करीत जाते. आंबेडकरी विचारांचा जागर, प्रबोधनाचे कार्यक्रम हे आंबेडकरी भूमिका पेरण्याचेच काम करतात. यातून लोकांसोबत होणारी चर्चा, संवाद चळवळीची दिशा ठरवत असतात. चळवळ पुढे नेण्याचे सर्व कार्यक्रम संवादीच असतात. हा संवाद कार्यकर्ता - कार्यकर्ता, कार्यकर्ता-नेता, कार्यकर्ता - नेता, कार्यकर्ता - विचारवंत, साहित्यिक असा असतो. तसेच तो कवी शाहीर आणि जनता यातूनही प्रवासत असतो. म्हणजेच आंबेडकरी चळवळीच्या केंद्रस्थानी 'संवाद' असतो.**

लेखनातून, भाषणांमधून, समुह चर्चांमधून, भेटीगाठींमधून माणूस अधिक संवादी होतो. त्याला भाषा, प्रांत किंवा जात धर्म हे कधीही अडसर ठरू शकत नाहीत. आंबेडकरी विचारधारेने परिवर्तन होऊ शकते. हे या संवादी कार्यकर्त्याला चांगलेच कार्यकर्त्याला चांगलेच ठाऊक असते. त्यासाठी तो काही क्रियाकलाप करीत असतो. अंधारातून उजेडाकडे जाण्याचे आणि समुहभावनेला सोबत नेण्याचे कार्य तो नेटाने करतो. मागील तीन चार दशकांपासून आंबेडकरी चळवळीच्या दुसऱ्या तिसऱ्या पिढीने या भूमिका पोसल्या आणि पेरल्या त्यातील एक साहित्यिक अनुरत्न वाघमारे आहेत हे जाणिवपूर्वक अधोरेखित करावे लागेल.

नांदेड येथील ज्येष्ठ साहित्यिक अनुरत्न वाघमारे यांना यशवंतराव चव्हाण शिक्षण प्रसारक मंडळ करकाळा ता. उमरीच्या वतीने १० डिसेंबर २०२३ रोजी भरवण्यात येणाऱ्या लोकसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनात लोकसंवाद साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या निमित्ताने त्यांचे साहित्य आणि साहित्य चळवळीचे कार्य दुग्गोच्चर होते. त्यांचा जन्म आणि परिवेश भोकरचा असला तरी त्यांचा कार्यवावर जिल्हाभरात होता आणि साहित्याच्या माध्यमातून राज्यभरात होता. भोकर तालुका आणि परिसरात भजनी मंडळाच्या माध्यमातून अनुरत्न वाघमारे यांचा लोकसंवाद सुरू झाला. त्यावेळचे चळवळीचे शिलेदार एल. ए. हिरे, गंगाराम मोरे गुरुजी, आर. एम. डोंगरे, प्रभाकर वाकोडे, डीएलबी केरबाराव यांच्या सान्निध्यात नामांतरापासूनच्या चळवळीचे काही संदर्भ वयाच्या चौदाव्या वर्षी भीमज्योत गीतमालाच्या माध्यमातून पुढे आले आहेत. त्यांच्या या गीतमालेतील बहुतांश गितं ही तत्कालीन गायक गायिका साहेबराव येरेकर, शांताबाई वाघमारे, गंगाधर वाघमारे, गायिका करुणाबाई जमदाडे यांच्या गळ्यातून अवतरली आहेत. ही सगळी गाणी चित्रपटाच्या चालीवर असल्याने ती फार लोकप्रिय ठरली होती.

नामांतराच्या चळवळीचा तरुण अनुरत्न यांच्यावर फार प्रभाव होता. त्यांची वेशभूषा आणि केशभूषा पँथरसारखीच होती. प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या लाँग मार्च मध्ये सहभागी झाल्यानंतर ते स्वतः आणि आंबेडकरी नेते सुरेशदादा गायकवाड माजी नगरसेवक भीमराव दुधारे, विजय कावळे, सुरेश कावळे यांसह ८० जणांची कल्याणच्या सेंट्रल जेलमध्ये रवानगी झाली होती. जेलच्या एका मोठ्या हॉल मध्ये या सगळ्यांना डांबण्यात आले होते. हॉलमध्येच एक चारी बाजूंनी उघडा संडास होता. तिथेच सर्वांसमक्ष प्रातःविधी उरकण्याची परिस्थिती होती. त्यासाठी पाण्याचा जो ड्रम होता, त्यातलेच पाणी पिण्यासाठीही होते. संडास धुण्यासाठी आणि पिण्याच्या पाण्यासाठी एकच मग होता. आंदोलनात पुन्हा भाग घेऊ नये यासाठी ती आम्हाला शिक्षा होती, असे ते सांगतात. यातील ७९ जणांशी त्यांचा असा संवाद सुरू होता. त्यानंतर पुढील काळात यशवंत महाविद्यालयातून बी. ए. झाल्यावर मराठी विभागाचे प्रपाठक तथा समीक्षक उपप्राचार्य भू. द. वाडीकर, प्रा. जगदीश कदम, कवी रविचंद्र हडसनकर, यांचे साहित्य विश्वात मार्गदर्शन लाभले. सोबत ऋषिकेश कांबळे (छत्रपती संभाजीनगर), भुजंग मेश्राम (किनवट), कवी सुरेंद्र नाईक, गाडगे महाराज शिक्षण संस्था मुदखेडचे चेअरमन बालाजी शिंदे यांच्याशी नेहमीच काव्यचर्चा झडायच्या. पीपल्सचे मराठी विभाग प्रमुख प्रा. दत्ता भगत, प्राचार्य नरहर कुरुंदकर यांचेही मार्गदर्शन लाभले. या सगळ्या संकीर्णातून 'चितपट' सहाओळीचा काव्यप्रकार आकाराला आला. त्याकाळी चारोळी हा काव्यप्रकार फार लोकप्रिय होता. विधान आणि उपहास असा वेगळाच काव्यरचना असलेला अनुरत्न वाघमारे यांचा हा काव्यसंग्रह शब्ददान प्रकाशनाचे प्रा. अशोककुमार दवणे यांनी डॉ. ऋषिकेश कांबळे आणि उपप्राचार्य भू. द. वाडीकर यांच्या हस्ते १९९९ मध्ये प्रकाशित केला. या नव्या काव्यप्रकाराची त्यावेळी खूप चर्चा झाली. १९८३ मध्ये वाघमारे यांनी महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागात म्हणजे आजच्या जलसंपदा विभागात ज्यु. क्लार्कची नोकरी पत्करली. १९८६ ला लग्न झाल्यानंतर तब्बल १३ वर्षांनी 'चितपट' आला आणि २००१ साली 'माझ्या नजरेतून बाबासाहेब' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. २००५ पासून पुढे त्रिरत्न बौद्ध महासंघाचे कार्य सुरू झाले. दरम्यान डॉ. विलासराज भद्रे, डॉ. प्रमोद अंबाळकर, प्रा. अशोककुमार दवणे, विद्रोही कवी राजेंद्र कांबळे, इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर, राज गोडबोले, मानव कुंडलवाडीकर यांच्या समवेत गच्चीवरची अनेक कविसंमेलने पार पडलीत. मराठीतील प्रख्यात समीक्षक डॉ. प्रकाश मोगले हेही कधी कधी हजेरी लावीत असत. सहभाग आणि सूत्रसंचालन या



पद्धतीने आत्तापर्यंत शेकडो कविसंमेलने साजरी झाली आहेत. मग २०११ मध्ये १२ कथांचा 'नदर' कथासंग्रह नांदेडच्या निर्मल प्रकाशनने प्रकाशित केला. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण सुरू असतांनाच कवितेसोबत या कथांनी जन्म घेतला होता. १९९९ मध्येच दै. गोदातीर समाचार या मराठी वृत्तपत्राच्या दिवाळी अंकाने आयोजित केलेल्या विभागीय कथास्पर्धेचे द्वितीय पारितोषिक वाघमारेंच्या 'नदर मह्या मायची' या कथेने पटकाविला होता. नदर हा कथासंग्रह सुरेशदादा गायकवाड यांच्या हस्ते प्रकाशित झाला आणि तो दादांनाच समर्पित आहे. यशवंत महाविद्यालयात शिकायला असतांना १९९९ मध्ये प्रा. डॉ. जगदीश कदम यांनी कथालेखन कार्यशाळा आयोजित केली होती. या संवादी कार्यक्रमांमुळेच सुप्रसिद्ध कथाकार विलास सिंदगीकर, राजेंद्र गहाळ आणि दिवाळी अंक कथा स्पर्धेचे सहस्पर्धक स्मृतीशेष विजया वाकोडे, स्मृतीशेष नूरबक्ष तळेगावकर यांच्याशी ओळख झाली आणि पुढे ती वाढत गेली.

त्याकाळीही वैचारिक प्रदुषणाचा प्रादुर्भाव होता. तसेच सांस्कृतिक दहशतवाद आणि दुषित सामाजिक, राजकीय वा धार्मिक वातावरणाच्या पार्श्वभूमीवर २०१२ मध्ये दंगल घडविण्याचा परवाना हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. मधल्या काळात कविसंमेलने आणि धार्मिक कार्यक्रम सुरूच होते. २०१५ मध्ये ते अक्षरोदय साहित्य मंडळाचे संस्थापक उपाध्यक्ष झाले. या मंडळात असताना कालवश दीपक सपकाळे, सदानंद सपकाळे, शरदचंद्र हयातनगरकर, विठ्ठलकाका जोंधळे, नरेंद्र धोंगडे, पांडूरंग कोकुलवार, उषा ठाकूर, पंकज कांबळे, मारोती मुंडे, चंद्रकांत चव्हाण, मोहन बुक्तरे, थोरात बंधू, मोहनराव कुंटुरकर, नागोराव डोंगरे, सूनील राक्षसमारे, सुमेध चौदंते, विनय कैरमकोंडा, अनुराधा हवेलीकर, सावित्री दमकोंडवार, बालिका बरगळ, माया तळणकर, व्यंकटेश कंडारकर, आ. ग. ढवळे, महेंद्र भगत यांच्याशी संवाद होत राहिला. तद्वतच कवी कट्टाचे अशोक कुबडे, ज्योती गायकवाड, वंदना मघाडे, दत्ता वंजे, अशोक मगरे, गोदावरी गायकवाड, शिवाजी होळकर आदी कवी कवयित्री संपर्कात आले. २०१६ साली त्यांचा संपादक मंडळात समावेश होऊन या संपादक मंडळाने 'अक्षरोदय' या प्रातिनिधिक कवितासंग्रहाची निर्मिती केली. २०१९ मध्ये पुन्हा एका कवितासंग्रहाची निर्मिती करीत पाथरी येथील स्व. नितीन महाविद्यालयाचे मराठी विभागाचे प्रपाठक प्रा. डॉ. आनंद इंजेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली, प्रा. डॉ. जे. टी. जाधव यांच्या उपस्थितीत उपप्राचार्य प्रल्हाद इंगोले यांच्या हस्ते 'धुतलेलं मातरं' प्रकाशित झालं. याच प्रकाशनाच्या कार्यक्रमात सप्तरंगी साहित्य मंडळाची मुहुर्तमेढ रोवली गेली. या आधी अक्षरोदय साहित्य मंडळ निर्मित जामुंडा, योजना तसेच पोटजात या लघुपटात त्यांनी काम केले. आयुष्यभर लोकसंवादी राहिलेल्या अनुरत्न वाघमारे यांना अनेक सन्मानाचे पुरस्कार मिळाले आहेत. गोणार ता. कंधारच्या पहिल्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. नागोराव डोंगरे, पांडूरंग कोकुलवार, प्रज्ञाधर ढवळे, मारोती कदम, कैलास धुतराज, शंकर गच्चे, रुपाली वागरे वैद्य, बाबुराव पाईकराव, रणजीत गोणारकर, चंद्रकांत कदम, यशवंत भवरे, प्रकाश ढवळे नागलगांवकर, दत्ताहरी कदम, भैय्यासाहेब गोडबोले, गौतम कांबळे, प्रल्हाद घोरबांड, बी. जी. कळसे आदींनी बनलेल्या सप्तरंगी साहित्य मंडळाचे ते संस्थापक अध्यक्ष आहेत. मंडळाच्या सर्व उपक्रमांमध्ये ते या वयातही हिरीरीने सहभाग नोंदवतात. ते केवळ घरात बसून लिहिणारे लेखक नाहीत; तर ते वेळप्रसंगी रस्त्यावरही उतरताना दिसतात. कोरोना काळातील त्यांचे कार्य वाखाणण्याजोगे होते. त्यांनी या काळात अडल्या नसलेल्यांना मदत केली. त्रिरत्न बौद्ध महासंघाच्या पदाधिकाऱ्यांसोबत त्यांनी निराधारांना शिधा वाटप केला. वीटभट्टी कामगारांना गेल्या तीन वर्षांपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नव्या कपड्यांचे वाटप केले जाते. अशाप्रकारच्या त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना विविध पुरस्कार मिळाले आहेत. २००२ मध्ये शब्दगंध साहित्य परिषद अहमदनगरचा काव्यपुरस्कार, मासिक समाजमार्ग ठाणे चा काव्य पुरस्कार ( २००३), जलसंपदा विभागीय मंडळ नांदेड विभागीय काव्यवाचन पुरस्कार, सत्यशोधक विचार मंच नांदेड कथागौरव पुरस्कार (२०१९), संत गाडगेबाबा प्रतिष्ठान ओतुर जि. पुणे चा क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले काव्यप्रतिभा पुरस्कार (२०२०), मातोश्री भागाबाई डोंगरे प्रतिष्ठान उमरीचा साहित्य गौरव पुरस्कार (२०२१), आदिलाबाद तेलंगणा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पुरस्कार (२०२१), शिवबाबा वाघ प्रतिष्ठान पिंपळगाव (ज) ता. येवला काव्यगौरव पुरस्कार (२०२१) असे अनेक पुरस्कार मिळाले आहेत. यावर्षी मिळालेले दै. वृत्त महानगर, नांदेड आंबेडकरवादी साहित्यिक पुरस्कार, आंबेडकरवादी पँथर आणि लोकसंवाद पुरस्कार हे आयुष्याला नवा आयाम देणारे ठरले आहेत. सलणारी खंत ( ललित), परिवर्तनाचा प्रवाह ( वैचारिक) आणि भूतान प्रवासवर्णन ही आगामी ग्रंथसंपदा आहे. याबरोबरच पुढील काळात अजूनही अनेक पुरस्कारांचे मानकरी ठरतील अशी अपेक्षा ठेवतो आणि थांबतो.

प्रज्ञाधर ढवळे, नांदेड.
९८९०२४७९५३

# भ्रष्टाचार : देशाला लागलेली कीड



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**९ डिसेंबर, आजचा दिवस संपूर्ण जगात भ्रष्टाचार विरोधी दीन म्हणून साजरा केला जातो. भ्रष्टाचार ही आज जगातील सर्वात मोठी समस्या बनली आहे. भारतातच नाही तर जगात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघड होत आहेत. जगात असा एकही देश नाही जिथे भ्रष्टाचार होत नाही. भारतात तर आज भ्रष्टाचार शिष्टाचार बनला आहे. जगातील सर्वात भ्रष्ट देशांच्या यादीत भारताचा क्रमांक लागतो ही खेद जनक बाब आहे. भ्रष्टाचाराची ही किड भारतात खोलवर रुजली आहे. भ्रष्टाचाराची ही किड देश पोखरत चालली आहे. भारतातील भ्रष्टाचार कमी करणार असे सर्वच राजकीय पक्ष सांगतात. देशातील भ्रष्टाचार संपवणार अशी प्रतिज्ञाच काही राजकीय आणि सामाजिक नेत्यांनी केली होती पण देशातील भ्रष्टाचार संपवणे तर दूरच पण दिवसेंदिवस देशातील भ्रष्टाचार वाढत चालला आहे.**

माणसातील स्वार्थीपणा इतका जास्त वाढला आहे की तो स्वतः व्यतिरिक्त कोणाचा विचार करीत नाही आणि हे सुद्धा समजत नाही की आपल्या छोट्याशा फायद्यासाठी समाजाला किती मोठा धोखा पत्करावा लागतो. भ्रष्टाचारामुळे समाजातील श्रीमंत-दारिद्र यांच्यातील अंतर हे वाढतच चालले आहे. गरीब आणखी गरीब व श्रीमंत आणखी श्रीमंत होत चालले आहेत. भ्रष्टाचार म्हणजे लाचलुचपतपणा अर्थात की जेव्हा कधी कोणी व्यक्ती कायद्याचा विरूद्ध जावून आपल्या स्वार्थापोटी वाईट मार्गाचे आचरण करतो तेव्हा त्याला भ्रष्टाचार म्हणतात.

भ्रष्टाचार समाजातील खुपच गंभीर समस्या आहे. ही समस्या पुर्ण समाजाला पोकळ करीत आहे. प्रत्येक क्षेत्र कमी-जास्त प्रमाणात भ्रष्टाचारामध्ये गुंतल्याचे आढळून येते आहे. आजकाल आपण वर्तमानपत्रे, सोशल मिडीया व इतर मार्गाने भ्रष्टाचारबद्दल नवनवीन घोटाळे ऐकतो, वाचतो. भ्रष्टाचार हे गुणवत्तापुर्ण शिक्षण, संस्कार, कायदा, प्रामाणिकपणा, नितीनियम, कर्तव्य, निस्वार्थ सेवाभाव, अशा गोष्टींना संपवित आहे.

देशात पुर्वीपासुनच बँक घोटाळे, सुशिक्षीत बेरोजगारी, गरीबी, अशिक्षा, जातीवाद, आतंकवाद, नक्षलवाद, शेतकरी आत्महत्या, प्रदूषण, भेसळखोरी, जमाखोरी, नोकरी व्यवसायाचा नावाखाली आर्थिक व्यवहार अशा सारख्या गंभीर समस्या आहेत. भ्रष्टाचार अशाच समस्यांना वाढविण्यास मदत करते. जेव्हापर्यंत अशा समस्यांना संपवणार नाही तो पर्यंत समाजातील सर्वांगीण विकास शक्य नाही. संपुर्ण जगात ही समस्या पसरली आहे. या भ्रष्टाचाराच्या समस्यात पुर्ण समाज भागीदार असतो. कारण लाच घेणे व लाच देणे यात दोघे ही बरोबरीचे आरोपी असतात.

सोबतच अन्यायाला शांतपणे सहन करणारा व्यक्तीही तेवढाच दोषी असतो. प्रत्येक कामात पारदर्शता आणणे खूप गरजेचे आहे. मागील काही वर्षात १५ पत्रकारांना मारण्यात आले जे भ्रष्ट्राचारा विरूद्ध काम करीत होते. इतर देशांपेक्षा भारतात पत्रकारांवर जास्त हल्ले करण्यात येतात असे निदर्शनास आले. महाराष्ट्र राज्यात मागील काही वर्षात पुष्कळ आरटीआई कार्यकत्यांची हत्या करण्यात आली आहे. काही सामाजीक कार्यकत्यांना अन्याया विरूद्ध बंड पुकारल्यामुळे जीव सुद्धा गमवावा लागला. इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्रात भ्रष्टाचारा विरूद्ध काम करणाऱ्या व्यक्तींसोबत घटना घडून आल्याचे दिसून येते.अमेरिकेतील वॉशिंग्टन येथील ग्लोबल फायनांशियल इंटिग्रेटी या भ्रष्टाचारावर सर्व्हे करणाऱ्या संस्थेने मागील वर्षी एक अहवाल सादर केला होता. या अहवालानुसार गेल्या सत्तर वर्षात लाचखोरीमुळे देशाचे ४५०अब्ज डॉलरचे नुकसान झाले आहे. ४५० अब्ज डॉलर ही काही छोटी रक्कम नाही. भ्रष्टाचारी लोकांनी देशाची ४५० अब्ज डॉलर पचवले. हे ४५० अब्ज डॉलर गोरगरिबांच्या मेहनतीचे होते मात्र भ्रष्टाचाऱ्यांनी खुर्ची आणि पदाचा गैरवापर करून गोरगरिबांना फसवले आणि त्यांच्या मेहनतीचे पैसे लाटले.

देशाला लागलेली ही भ्रष्टाचाराची किड आता लागलेली नाही. देशाच्या स्वातंत्र्यापासून हा भ्रष्टाचार सुरू आहे. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहलाल नेहरू एकदा उद्विग्न होऊन म्हणाले होते की भ्रष्टाचाऱ्यांना सुळावर लटकवले पाहिजे. मात्र आजवर एकाही भ्रष्ट अधिकाऱ्याला सुळावर लटकवणे तर दूरच मात्र शिक्षा झाल्याचेही ऐकवात नाही. त्यामुळेच भ्रष्टाचार वाढत चालला आहे. दररोजचे वर्तमानपत्र वाचा त्यात तुम्हाला एक तरी भ्रष्टाचाराची किंवा




लाचखोरीची बातमी वाचायला मिळेल. एका एका भ्रष्ट अधिकाऱ्याकडे कैक कोटींची अवैध मालमत्ता आढळत आहे. असा कोणताही विभाग नाही ज्यात भ्रष्टाचार होत नाही. महसूल आणि पोलीस विभाग भ्रष्टाचारात अव्वल असेल तरी सर्वच विभागात भ्रष्टाचार सर्रास चालू आहे. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्राला देखील भ्रष्टाचाराने घेरले आहे. जो विभाग समाजाला नैतिकतेचे धडे देतो त्याच विभागात भ्रष्टाचारासारखे अनैतिक काम राजरोसपणे सुरू आहे.

देशातील भ्रष्टाचार कमी व्हावा यासाठी जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, योग गुरू रामदेव बाबा यांच्यासह काही सामाजिक कार्यकर्ते दिल्लीच्या जंतरमंतर वर उपोषणाला बसले होते. त्यांच्या आंदोलनाला जनतेतूनही मोठा पाठिंबा मिळाला होता. आता सत्तेत असलेल्या भाजपच्या नेत्यांनीही या आंदोलनाला पाठिंबा दिला होता. देशभर भ्रष्टाचार विरुद्ध वातावरण निर्माण झाले होते. त्यावेळी देशातून भ्रष्टचार नष्ट होईल असे वाटले होते. त्या आंदोलनाचा सर्वाधिक फायदा भाजपला झाला. भाजप केंद्रात सत्तेवर आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ना खाऊंगा....... ना खाणे दुंगा..... असा इशारा भ्रष्टाचाऱ्यांना दिला. देशातील भ्रष्टाचार कमी करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोटबंदी केली. देशातील लोकांना वाटले आता तरी भ्रष्टाचार कमी होईल मात्र तसे काही झाले नाही उलट भ्रष्टाचारात वाढच झाली. त्यातही गंमत म्हणजे ज्या भ्रष्टाचाऱ्यांना विरोध करून भाजप सत्तेत आली आज त्याच भ्रष्टाचाऱ्यांना पक्षात घेऊन भाजप पावन करत आहे. ट्रेस मेट्रिक्स २०२१ च्या अहवालात भारत लाचखोरीत इतर देशांच्या तुलनेत खूप पुढे आहे. याचाच अर्थ देशातील भ्रष्टाचार कमी झाला नाही.

आज कोणत्याही सरकारी कार्यालयात चिरीमिरी दिल्याशिवाय काम होत नाही. दररोजचे वर्तमान पत्र उघडले की एक तरी लाचखोरीची बातमी वाचायला मिळतेच. जनताही मजबूर आहे. याच मजबुरीचा फायदा घेऊन लाचखोर त्यांनाच जाळ्यात अडकवत आहे. लाच दिली नाही तर काम होत नाही असाच अनुभव देशातील बहुतांश जनतेला आला आहे. राजस्थानमधील ८० टक्के लोकांनी हे मान्य केले आहे की कोणतेही काम करण्यासाठी लाच द्यावीच लागते. महाराष्ट्रातील ५५ टक्के लोकांचे हेच म्हणणे आहे. याचाच अर्थ लाचखोरी सामान्य होत आहे. पूर्वी भ्रष्ट्राचाऱ्यांकडे द्वेष भावनेने पाहिले जाते होते. आता मात्र त्यांच्या संपत्तीवरून त्यांचा सन्मान होत आहे. आज भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे. एकीकडे शिक्षणाचे होत चालले बाजारीकरण होत चालले आहे. आजच्या वातावरणात व्यावसायीक व उच्च शिक्षण घेणे सामान्य माणसाला परवडण्यासारखे राहिले नाही. लहान मुलांचा नर्सरी ते उच्च शिक्षणा पर्यंत पालकांकडून मोठे शुल्क आकारण्यात येते. सोबतच महागड्या कोचिंग क्लासेसची संख्याही वाढत आहे. शाळा महाविद्यालयांमधे नोकरभर्तीचा नावाखाली लाखो रूपयांची देवाण-घेवाण होते. याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

# हुंडा प्रथा : एक सामाजिक शाप

आधुनिक केसरी

**भारतातील हुंडा प्रथा हा एक असा सामाजिक शाप आहे की त्याची हानी पाहिली, समजून घेतली आणि भोगली तरी हे दुष्कृत्य दूर करण्यासाठी व्यावहारिकदृष्ट्या फार कमी प्रयत्न केले जातात. प्रत्येक धर्मातील आणि समाजातील प्रत्येक वर्गातील लोक या दुष्कृत्याला बळी पडतात आणि ही प्रथा देशाच्या अर्ध्या लोकसंख्येसाठी अनेक वेळा घातक ठरली आहे, तरीही ती प्राचीन काळापासून अव्याहतपणे सुरू आहे.**

बालविवाह आणि हुंडा प्रथा निर्मूलन हा बऱ्याच काळापासून चर्चेचा मुद्दा आहे. त्यांना रोखण्यासाठी कडक कायदे करण्याचीही तरतूद आहे. असे असूनही या गैरप्रकारांना आळा बसलेला नाही. समाजातील या वाईट प्रथांबाबतही आवाज उठवला गेला आहे. पण वेळ आल्यावर आवाज उठवणारेही हुंडा घ्यायला मागेपुढे पाहत नाहीत. प्रशासकीय अधिकारी आणि समाजाचे प्रतिनिधित्व करणारेही यापेक्षा वेगळे नाहीत. समाजाचा हा कुष्ठरोग इतका खोलवर रुजला आहे की तो उपटून टाकणे सोपे काम वाटत नाही. सध्या हुंडा प्रथेने एक प्रथेचे रूप धारण केले आहे, ज्या अंतर्गत मुलीच्या आई-वडिलांचा आणि कुटुंबाचा सन्मान केवळ हुंड्यात दिलेल्या संपत्तीवर अवलंबून असतो.प्राचीन परंपरांच्या नावाखाली मुलीच्या कुटुंबावर दबाव आणला जातो आणि छळ केला जातो. भारतातील दक्षिण भारतात एका उच्च शिक्षण घेतलेल्या तरुण डॉकटर मुलीने २६ वर्षांच्या डॉक्टर तरुणीने लग्नातली हुंड्याची मागणी पूर्ण न करता आल्याने आत्महत्या केली आहे. हुंड्याची मागणी या तरुणीचं कुटुंब पूर्ण करु शकलं नाही म्हणून या डॉक्टर तरुणीने हा टोकाचं पाऊल उचललं आहे. केरळच्या तिरुवनंतपुरम या ठिकाणी ही धक्कादायक घटना घडली श्रीमंत कुटुंबांना हुंडा देणे किंवा घेणे यात काही गैर वाटत नाही, कारण ते फक्त गुंतवणूक म्हणून याकडे बघतात. त्यांचा असा विश्वास आहे की पैसे आणि भेटवस्तू त्यांनी आपल्या मुलीला निरोप दिल्यास, त्यामुळे त्यांचा सन्मान वाढेल आणि मुलीला आनंदी आयुष्यही मिळेल, पण गरीब पालकांना आपल्या मुलीचे लग्न करणे खूप कठीण आहे, त्यांना माहित आहे की जर हुंड्याची व्यवस्था केली नाही तर लग्नानंतर मुलीला लग्न करणे कठीण होईल. हुंडा ही अशी सामाजिक व्यवस्था आहे जी सोडणे अत्यंत आवश्यक आहे, सुशिक्षित आणि श्रीमंत कुटुंबेही हुंडा घेणे हा आपल्या परंपरेचा भाग मानतात, त्यामुळे अशा वेळी कमी शिकलेल्या किंवा अशिक्षित लोकांबद्दल बोलणे. अर्थहीन आहे, ज्या तरुण पिढीला समाजाचे भविष्य मानले जाते, त्यांनी ही प्रथा बंद करण्यासाठी पुढे आले पाहिजे जेणेकरून भविष्यात प्रत्येक मुलीला सन्मानाने जगण्याची संधी मिळेल. जागतिक बँकेच्या अभ्यासात असे आढळून आले आहे की, गेल्या काही दशकांमध्ये भारतातील खेड्यापाड्यात हुंडा देण्याची प्रथा मोठ्या प्रमाणात स्थिर आहे. पण



ही प्रथा अव्याहतपणे सुरू आहे. १९६१पासून भारतात बेकायदेशीर घोषित करण्यात आले असले तरीही ९५% विवाहांमध्ये हुंडा दिला जातो. हुंड्यामुळे महिलांना अनेकदा उपेक्षित केले जाते, कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागते आणि काही वेळा त्यांचा मृत्यूही होतो. हुंडा हे एक सामाजिक वाईट प्रथा आहे यात शंका नाही आणि त्याबाबत समाजात बदल व्हायला हवा. कायदा अस्तित्वात असतानाही हुंड्यासारखे सामाजिक दुष्प्रवृत्ती कायम असताना या कायद्याचा पुनर्विचार करण्याची गरज सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केली होती. विशेष म्हणजे भारतात लग्नाच्या निमित्ताने हुंडा देण्याची आणि घेण्याची प्रथा प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. पूर्वी वधूपक्षाने वराच्या बाजूने स्वेच्छेने दिलेली भेटवस्तू मानली जायची, पण जेव्हा ही स्वेच्छेने मुलीच्या कुटुंबावर दबाव निर्माण झाला, लग्नाचा बाजार तयार होऊन वरावर किंमत ठरवली जाऊ लागली, तेव्हा समाज उघडला. त्याचे डोळे. ते पाहिले देखील नाही. हुंड्याची मागणी पूर्ण न केल्यामुळे मुलींना जाळून ठार मारण्यासारखे जघन्य गुन्हे घडले, मात्र तरीही हुंड्याची प्रथा सुरूच आहे.



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

# आणि काल पुन्हा एकदा

आधुनिक केसरी

**आणि काल सहज पुन्हा एकदा त्या रम्य अशा वेळी, दुपारच्या चार , साडे चारच्या वेळेचे ते ऊन कुठेतरी ओढ्या कडेच्या हिरव्या झाडात तर वाळलेल्या टेकाडावर च्या गवतात ऊन थंडी होऊन विसावले होते.वातावरणात थोडी थंडी ही होती. ओढ्यात उतरून ओढा चढून वर गेल्यावर ओढ्याच्या काठावर असलेले भातरोप्यातील लिंबाचे झाड आज किती दिवसांनी पाने सळसळून जणू स्वागत करत होते का! लिंबाच्या झाडाखालचे सीताफळाचे झाड ही आज इतक्या वर्षांनी ही आहे तसेच होते.**

"मामा, इथे आईने लावलेले ही एक झाड आहे ना रे!" "हो ,आहे की,ते बघ ना त्या ओढ्याच्या बाजूला," "त्या वरच्या टेकडीला काय म्हणतात रे मामा." "भटीचा माळ" आणि या ओढ्याच्या "अलिकडे दुसरे नावं का?" "हो" "याला काय म्हणतात रे ,हे कसले गवत,तिकडे विहीर आहे का?" एक ना अनेक प्रश्न, मामा भाचीच्या संवादात मन आनंदाने जुन्या स्मृती वाटेवर हरवले. चालता चालता,एक नजर पडली ,ती शाळूच्या शेतातील मोरपीसांवर.अरे वा ! "इकडे मोर पण येतात का ग आई!" "बाजूला असलेल्या ऊस आणि ओढ्यातील पाण्यामुळे येत असेल कदाचित." बांधावरून मधल्या रानात चढले. किती दिवसांनी.. (मनातल्या मनात) खाली बसून हलकेच शेतातील माती ओंजळीत घेतली. एक अनामिक ओढ त्यात जाणवली.दूर त्या तिकडे बांधावरची ती बाभळ ही मान उंच करून पाहतेय असे वाटतं होते. शेतातली अगदी तण सुदधा पायात घुटमळत होते. तिथेच बाजूच्या लिंबाच्या झाडावरून ओरडणारी चिमणी चिव चिव करून जणू आनंदाने गीत गात असल्याचं भास झाला. ओढ काय असते.हे इतके प्रकर्षाने जाणवले. का, कोण, कोठे, कसे, यापेक्षा त्यातली ती एक ओढ आज अजूनही....! ती तेव्हाची ती तूर ,तो भुईमुग,ती जोंधल्याची पोती, ती कडब्याच्या पेंढ्या ची खोप सारे कसे आत्ता आत्ताचे तर.. हो ना! माहित नाही, भावनेच्या अत्युच्च शिखरावर असल्याने असेल कदाचित..पण मनाचे आणि आठवणींचे नाते कसे ऊन सावली सारखे की दूध आणि दुधावरच्या त्या साईसारखे म्हणावे. या द्वंद्वात चालणारे पाय वरच्या माळात केव्हा पोहचले कळलेच नाही.

सभोवार एक नजर गेली,कुठे आंबा, जांभळाची, लिंबाची बाभळी ची झाडे,कुठे ऊस कुठे वितभर तर कुठे गुडघाभर आलेलं जोंधल्याच पिकं, मावळी तिला झुकलेला तो सूर्य,घराच्या ओढीने



चालणारे पाय सभोवार वातावरण शांत पण प्रसन्न होते. पक्षी प्राण्यांच्या ती मंद हालचाल वेगळी अर्थात थोडी गाराठ ल्या सारखी भासत होती. अन् एक विलक्षण म्हणजे पाऊलवाटेवर विसावलेला तो निस्तब्ध फोफाटा अन्...

तो फोफाटा पाहून एक आठवण झाली. ते कल्पनेतलं पळणारे हरीण पाहून मन तल्लीन होऊन गेले.

त्या दिवशीचा तो पौर्णिमेचा चंद्र होता. माझे बाबा, ताई यांच्या सोबत मी शेताला पाणी देण्यासाठी आम्ही गेलो होतो. फेब्रुवारी महिना असावा, थंडी थोडी गर्मी वातावरण जरा आल्हादायक होते, अंगात गरम कपडे घालून,हातात छोटया छोटया बॅटऱ्या घेवून निघालो, पाणंदी चा तो रस्ता, तेव्हाचा तो चंद्र आणि त्याचे ते चांदणे पाणांदी च्या दुतर्फा असलेल्या झाडांवर चंदेरी शाल पांघरून बसलेय असे वाटतं होते. आणि त्या शालीवर नुकतीच फुटू लागले ली पालवी पोपटी हिरव्या गार शालिवर हिरवी पोपटी रंगाची पालवी त्यावेळी सहज ओठावर आलेलं सुचलेलं एक काव्य... हा चंद्र हे चांदणे अन् या सावल्या मनात ऊर्जा घेऊन स्फुरल्या.

सुंदर मनमोहक चंदेरी शाल चंदेरी शालीवर हिरवी नक्षी,
दिवसभराच्या कोलहलातून उबीला घरट्यात विसावले होते पक्षी,
दूरवर झाडाच्या सावलीत चमकत होता काजवा, सोबती ही थंड हवा रातकिड्यांक्याची किरकिर अन् नभांगणी फुलला शुभ्र फुलांचा ताटवा. वातावरण अगदी शांत होते.मनावर थोडा ताणही होता,आणि थोडी भीतीही. चालता चालता नजर दूरवर असलेल्या निलगिरीच्या शेताकडे गेली.पानांची सळसळ थांबली होती. पक्षीही झाडांवर विसावले होते,रातकिड्यांची किरकिर मात्र त्या शांत वातावरणाला भेदत होती,पण.... का काय माहीत निलगिरीच्या दूरवर पसरलेल्या सावल्या अगदी जिवंत,आणि त्यांच्यातली ती मूक भाषा मात्र काहीतरी खुणावत असल्याचा भास होत होता,तो एक क्षण मुठीत घट्ट पकडून ठेवावा वाटतं असतानाच,चालत चालत पुढे ,छोटा ओढा वाहत होता,ओढ्यातल्या एका खोलगट ठिकाणी शांत झाले ले पाणी आणि त्या पाण्याच्या तळाशी विसावलेले चंद्र नी चांदण्या मनाच्या एका कोपऱ्यात घर करून बसलेली ती प्रतिमा. ते सुंदर दृश्य पाहत असताना छोट्याशा चाहुलीने पाण्यातल्या त्या छोट्या मासळी ने मारलेली उडी, अन् उडालेले ते पाण्याचे ठिपके आणि तो डबुकररअसा आवाज थोडा वेगळाच विशिष्ठ पण नाजूक आवाज कित्येक दिवसानंतर अगदी जसाची तसा कानाला तृप्त करून गेला... निसर्गाची ही कोणती कलाकृती होती माहित नाही.

वातावरणात शेतात केव्हा पोहचलो याचेही भान राहिले नाही. शेताला पाणी देवून शेताच्या उत्तरेला असलेल्या टेकाडावर म्हणजे याच वरच्या माळत बसलो होतो, अर्धे पाणी होते न होते तोच सहज पश्चिमेला असलेल्या शांत डोंगराने लक्ष वेधले, रात्रीची वेळ असल्याने डोंगरात ली ती झाडे दिवस भराच्या कोलाहलाने शांत स्थिरावली होती. आणि त्यांच्यातले एका उतारावर असलेलं जुनाट आंब्याच झाड आणि त्याची डेरेदार अशी सावली कितीतरी भाऊक ....पण आपलीशी वाटणारी, आज जशी होती तशी नजरेसमोरून गेली.त्या तिथेच पलिकडे कमळाची खोरी, कोणीतरी केव्हातरी उगाच काहीतरी भीती दाखवण्यासाठी घातलेली भीती, अगदी लहान असताना ऐकलेली ती कोल्हेकुई त्या लांब टेकडाच्या मागे घुमू लागली होती. वातावरणाला गंभीर बनवत होती. पण तेवढ्यात पाटाच्या खळखळणाऱ्या पाण्याने ती तंद्री मोडावी. अन् भीतीची जागा उत्सुकतेने घ्यावी. अशातच शांत नि स्थिर राहील ते मन कसले? सहज कुतुहलाने लक्ष पूर्वेला गेले, झाडांच्या पाना पानातून चमकणाऱ्या NH4 वरच्या गाड्यांवरच्या त्या लाईटस झाडातून सर्रकन पळत होत्या. दूरवरच्या डोंगरात कुठेतरी मंदिराच्या कळसावरची लुकलुक नारी लाईट काहीतरी सांगू पहात होती ,स्वच्छ निळे आकाश, जणू चंद्रसवैरा च आणि थंडगार पण आल्हादायक वातावरण..... खरे तर! त्या दिवशी मला तिकडे जायचे नव्हते.पण म्हणतात ना....कितीतरी वर्षापूर्वी ची ती आठवण आज इथे अशी...!

स्मरणे ती स्मरतात, मन तरंग होऊन, आठवणींच्या
झुल्यावरी झुलतात. उसळणाऱ्या लाटांच्या
थेंबाथेंबातूनी मन चिंब चिंब भिजवतात.
अन् हळव्या क्षणांतले ते दोन
थेंब...पुन्हा विश्व सागरी त्या बुडतात.



परमेश्वर घुंगासे
संपर्क क्र. 7499643065

# प्रकल्पाच्या खुट्टीला, उपोषणाची करवत !

आधुनिक केसरी

**सध्या चांगलाच चर्चेचा विषय असलेल्या जायकवाडी धरणातील प्रस्तावित तरंगत्या सौर ऊर्जा प्रकल्पाला विरोध म्हणून तब्बल सत्तर ते ऐंशी जण नेवासा आणि पैठण या ठिकाणी सामूहिक आमरण उपोषणाला बसले आहेत, यामध्ये प्रामुख्याने पर्यावरण प्रेमी आणि स्थानिक मच्छीमार यांचा समावेश आहे ! मागील काही महिन्यांपासून नगर आणि संभाजी नगर जिल्ह्यातील मासेमारी करणाऱ्या कहार भोई आणि निसर्ग प्रेमी यांच्यावर या प्रकल्पाची टांगती तलवार आहे.त्यामुळे हा थेट विरोध आणि जनआक्रोश राज्य शासनाच्या विरोधात असल्याने शासन या आमरण उपोषणाला कदापि हलक्यात घेऊन दुर्लक्षित करणार नाही हे चित्र स्पष्ट आहे.**

या आधी कित्येक दिवसांपासून हे बांधव विविध विभागांना कायदेशीर निवेदन देत आहेत परंतु कोणत्याच विभागाने समाधान कारक प्रतिसाद न दिल्याने या समाजाला न्यायही मिळालेला नाही. स्थानिक जनतेचा या प्रकल्पाला प्रखर विरोध असून, शासन त्याकडे दुर्लक्ष करून प्रकल्प पुढे रेटण्याचा सातत्याने प्रयत्न करत आहे. पण सामाजिक एकजुटीने आपण आपल्या हक्काची लढाई नक्की जिंकू अशी ग्वाही उपोषण स्थळावरील मार्गदर्शक मान्यवरांनी दिली. काल नेवासा येथे उपोषण स्थळाला भेट देण्यासाठी लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता हे आले असता त्यांनी समाजाच्या संपूर्ण मागण्या एका महिन्याच्या आत शासन दरबारी मांडणार असल्याचे लेखी पत्र उपोषण कर्त्यांना देऊन उपोषण थांबवण्याची विनंती केली त्यांच्या या विनंतीला सन्मान देत उपोषण कर्त्यांनी नेवासा येथील उपोषण सोडले,मात्र अद्याप सुद्धा हा लढा पूर्ण टप्प्यात आलेला नसून अजून मोठी लढाई बाकी आहे या नंतर सुद्धा शासन स्तरावर प्रकल्प रद्दीचा शासन निर्णय न झाल्यास या पेक्षा आक्रमक आणि तीव्र स्वरूपाच्या आंदोलनाचा बडगा उगारण्यात येईल असा इशारा देण्यात आला. या सर्व बाबी लक्षात घेता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे अजूनही या प्रकल्पासाठी आग्रही भूमिका घेतलेले केंद्रीय मंत्री भागवत कराड यांनी मात्र शांतता बाळगली आहे,कोणतीच प्रतिक्रिया या संदर्भात त्यांची आलेली नाही. राष्ट्रीय सत्ताकारणात केंद्रीय मंत्री पदाची महत्त्वाची आणि अभ्यासपूर्ण जबाबदारी असताना ज्यावेळी प्रकल्पाच्या पाठपुरव्यासाठी कराडांची दिल्ली वारी चालू होती त्यावेळी जलाशया संदर्भात पुसटश्या अर्थकारणासह इथल्या स्थानिक मच्छीमारांची आणि भविष्यात होणाऱ्या संभाव्य विरोधाची कल्पना त्यांना न्हवती का ? असा प्रश्न आत्ता उपस्थित होतोय! सौर प्रकल्पाला हिरवा कंदील मिळाल्या नंतर स्थानिकात आक्रोशाची भावना तयार झाली होती. हजारो कुटुंबाचा उदरनिर्वाह याच जलाशयावर अवलंबून असून निसर्गाची मानहानी करून प्रकल्प करण्याचा हट्ट सरकारने सोडावा, सरकारचा हा प्रकल्प पूर्णपणे कायद्याची पायमल्ली करणारा आहे,सरकार म्हणून सरकारने रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात ना की गोरगरीब जनतेचा रोजगार हिरावून घ्यावा, प्रकल्प उभारण्याचाच असेल तर याच गोर गरीब कष्टकरी मच्छिमार बांधवांच्या शिक्षणापासून वंचित असणाऱ्या मुख्य प्रवाहाच्या कोसो मैल दूर असलेल्या मुलांच्या शिक्षणासाठी व त्यांच्या आरोग्यासाठी, महिलांच्या सुरक्षिततेसाठी एखादा प्रकल्प राज्य शासनाने राबवावा असे अनेक उद्विग्न करणारे सवाल उपोषणकर्त्यांनी पोटतिडकीने या ठिकाणी उपस्थित केले.सरकारने पर्यावरण प्रेमी आणि स्थानिक मच्छीमारांच्या भावनांची दखल न घेतल्याचा आरोप करीत ‘प्रकल्प हटवा पर्यावरण वाचवा' , 'जायकवाडी प्रकल्प रद्द करा,’ अशा घोषणाही देण्यात आल्या.पैठण तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढल्यानंतर शासनाने हा प्रकल्प रद्द करण्या संदर्भात करण्यात आलेल्या मागणीची हवी तशी दखल घेतली नाही त्यामुळे आत्ता आमरण उपोषणाचा मार्ग समाज बांधवांनी अवलंबला होता सात तारखेपासून तहसील कार्यालय नेवासा आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर पैठण येथे चालू होते.सोबतच राज्यभर पसरलेल्या कहार- भोई समाजामार्फत तीव्र स्वरूपाचे आंदोलन हाती घेणार असल्याचे सांगण्यात आले. हे सर्व मार्ग अवलंबल्या नंतरही शासनाने योग्य ती कार्यवाही करून प्रकल्प स्थगित केला नाही तर संविधानिक आणि न्यायालयीन कायदेशीर लढाई साठी देखील कहार-भोई समाज सज्ज असल्याचे दिसून येत आहे. इथल्या स्थानिक मच्छीमारांच्या हातचे रोजगार हिसकावून घेऊन त्यांना उपासमारीने मारण्याचा सरकारचा डाव असून, प्रकल्प आराखड्याला मंजुरी देताना राज्य सरकारने इथल्या सामान्य जनतेला पूर्णपणे वाऱ्यावर सोडले असल्याची तीव्र आरोप उपोषणकर्त्याने केले आहे.सध्या तरी या उपोषणाला सोडवण्यात प्राधिकरण अधीक्षक अभियंत्यांना यश आलेलं असल तरीही या पुढे देखील राज्य सरकार आणि स्थानिक मच्छीमार करणारा समाज यांच्या मधला संघर्ष टोकाला जाण्याची चिन्हे आहेत,तत्पूर्वी सरकार या जन समुदायाच्या रास्त मागण्यांचा आदर करत दोन पाऊल मागे जाईल का ? हे पाहणं औत्सुकेच ठरेल !

# दूषणाचे मूळ भूषण तुका म्हणे।



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**तुकाराम गाथा हा जीवनाला उत्तम मार्ग दाखवणारा साधा, सरळ, सोपा ग्रंथ आहे. यावर आत्तापर्यंत अनेक विद्वानांनी आपले विचार प्रकट केले आहेत. जगात अनेकविध सार्वकालिक ग्रंथांचा उहापोह आणि उल्लेख नेहमीच होत आला असून त्या सार्वकालिक ग्रंथांपैकी संत तुकोबांची गाथा ही अनमोल कलाकृती आहे यात तिळमात्र शंका नाही! गाथ्यातील एक एक अभंग म्हणजे एक एक रत्न असून त्यातून प्रत्येकवेळी नवा विचार समोर येतांना दिसतो. गाथ्यातील अभंगांचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे प्रत्येक अभंग नव्याने वाचला की; त्यातून नवीनच अर्थ उलगडत जातो. तुकोबांच्या जीवनातील एकएक प्रसंग आणि त्यांचा एकएक अभंग वाचल्यास वाचकांची-चिंतकांची बऱ्यापैकी अंतर्बाह्य स्वच्छता होते. तुकोबांच्या जीवनात एकीकडे संकटांची मालिका संपता संपत नसतांना दुसरीकडे त्यांचे अविरत भजन-कीर्तन-अभंग लेखन चालूच आहे. घरी वडिलोपार्जित असलेली श्रीमंती आणि त्या नंतर बदललेला काळ तुकोबांना चांगलाच लक्षात आहे.**

असे असले तरी युवा तुकोबा आपले मूळ कार्य अखंडपणे करताहेत. हे कशाचे द्योतक आहे? हे खरे विवेक, ज्ञान, भक्ती, शांती, आनंद याचे द्योतक आहे. लोकांनी लोकांची कामे केली आणि तुकोबा तुकोबांचे काम करत राहतात. लोक त्यांना त्रास देतात आणि तुकोबा सर्व जगाचा त्रास कमी होण्यासाठी भजन, कीर्तन, लेखन, प्रार्थना करतात! हाच सामान्य आणि असामान्य लोकांमध्ये फरक आहे. याच कारणाने तुकोबा सामान्य असतांना असामान्य विभूतींच्या पंगतीत देदीप्यमान होतांना दिसतात. या अवस्थेतून तुकोबाराय

अग्न तापलिया काया चि होमे ।तापत्रयें संतप्त होती ।संचित क्रियमाण प्रारब्ध तेथें।
न चुके संसारस्थिती ।राहाट घटिका जैसी फिरतां चि राहिली ।
भरली जाती एके रिती।
साधी हा प्रपंच पंचाय अग्न ।तेणें पावसील निजशांती रे ॥१॥
नारायणनाम नारायणनाम ।नित्य करी काम जिव्हामुखें।
जन्मजराव्याधि पापपुण्य तेथें ।नासती सकळ ही दुःखें ॥ ध्रु॥
शीत उष्ण वन सेवितां कपाट ।आसन समाधी साधी ।तप तीर्थ दान व्रत आचरण।
यज्ञ नाना मन बुद्धी ।भोगाभोग तेथें न चुकती प्रकार ।जनमजरादुःखव्याधि।
साहोनी काम क्रोध अहंकार ।आश्रमी अविनाश साधी ॥२॥
घोकितां अक्षर अभिमानविधी ।निषेध लागला पाठी ।वाद करितां निंदा घडती दोष।
होय वज्रलेपो भविष्यती ।दुषनाचे मूळ भूषण तुका म्हणे ।सांडी मिथ्या खंती।
रिघोनी संतां शरण सर्वभावें ।राहें भलतिया स्थिती ॥३॥
(शा.अ.गाथा अ.क्र. १२१०)

असे अलौकिक, जीवनमार्गी, अजरामरवाङ्मय लिहितात. एका वाचनात हा अभंग कळत नाही. त्यासाठी पुन्हा पुन्हा वाचावे लागते. खरंच तूकोबांनी जीवनाचे किती खोलवर चिंतन केले आहे? माणसाला पटकन राग-संताप येतो. एखाद्या परिस्थिती किंवा जीवनात आलेल्या प्रसंगावर माणूस लगेच संतप्त होतो. यामुळे त्याचे शरीर अक्षरशः तापत्रयाग्नीत जळते. इथे माणसाचे दुहेरी नुकसान होते. एकतर संकट आणि त्याचा मुकाबला करण्याऐवजी माणूस रागाने अंतर्बाह्य जळत जातो. पण इथे प्रत्येक जीवाचे काहीतरी संचित, क्रियमाण आणि प्रारब्ध असतेच हे तो विसरून जातो. त्याच्या हे तीन शब्द लक्षात आले, जीवन म्हणजे सरळ रस्ता नसून त्यात अनेक वळणे, चढ-उतार आणि खड्डे येणारच! हे विसरून कसे चालेल? असे होणे म्हणजेच संसार आणि तो कुणालाच चुकवता येत नाही. जन्माला येऊन मरेपर्यंत जगणे म्हणजे संसार! तो कुणालाच सुटत नाही. घर-दार सोडले तरी पोटासाठी काहीतरी करावेच लागेल. मग काय करणार? संसार म्हणजे समुद्र भरती-ओहोटी! भल्याभल्यांना ओहोटीने सोडले नाही, तेंव्हा आपल्या पंच ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रियावर नियंत्रण ठेवून आलेल्या प्रसंगातसुद्धा नित्य शांत-संयमी राहून आनंदाने जीवन जगणे यातच आपले खरे सौख्य सामावले आहे. इथे संसारात राहूनच प्रत्येकाला शांती लाभणार आहे. यामुळेच तुकोबाराय संसाराविषयी बोलतांना लिहितांना

मुनि मुक्त झाले भेणें गर्भवासा ।आम्हां विष्णुदासां सुलभ तो ॥१॥
अवघाचि संसार केला ब्रम्हरूप ।विठ्ठलस्वरूप म्हणोनियां ॥ध्रु.॥

इथे आपली भूमिका स्पष्ट करतांना दिसतात. सर्व सोडून मुक्त होणे हा आम्हा वारकरी लोकांचा विषय नाही. त्यासाठी इथे लोकात राहून आपला संसार आणि जीवन ब्रह्मरूप केले आहे.

## तुकारामनीती
भाग -७३

सर्वत्र श्री विठ्ठल पाहायला आपण शिकले पाहिजे. त्यासाठी माणसाने नित्य आनंदी, आत्मचिंतनात मग्न राहून आपले जीवन व्यतीत करतांना जन्म, मृत्यु, रोग आणि वृद्धपण हे सर्वांनाच अनिवार्य आहेत हे लक्षात घेऊन मोठ्या आनंदाने त्याचा ईश्वरी प्रसाद म्हणून स्वीकार करायला हवा. असे झाल्यास जीवनात कोणतेही आणि कितीही दुःख झाल्यास आपल्याला त्याचा म्हणावा तेवढा प्रभाव जाणवणार नाही. अनेक महान विभूतींच्या जीवनात विविध खडतर प्रसंग आले परंतु ते त्या प्रसंगासमोर डगमगले नाहीत. त्याचा आपल्या कार्यावर परिणाम होऊ दिला नाही. स्वतः तुकोबांना अनेकविध खडतर प्रसंगांना सामोरे जावे लागले, परंतु त्याची कुणाकडेही तक्रार न करता त्यांनी सरळ ईश्वरासोबत संवाद साधला.

प्रस्तुत अभंगांत तुकोबाराय माणसाने काहीही साधने केली तरी जीवनात येणाऱ्या बाबी अनिवार्य आहेत याचा पुनःपुन्हा उल्लेख केला आहे. तुम्हीं कोणत्याही परिस्थितीत जगा, योगा-प्राणायाम-आसन-ध्यान धारणा करा, तप करा, तीर्थाटन करा, दान करा, व्रत वैकल्ये, यज्ञ करा तरीही आपल्या जीवनात अनेक बरे-वाईट प्रसंग, दुःखे येतातच. मग वरील साधनांचा काय उपयोग? याचे एक उत्तर म्हणजे "संचित, क्रियमाण, प्रारब्ध" आणि दुसरे म्हणजे झालेल्या दुःखाला ज्ञान-भक्ती- शांतीच्या



मार्गाने हे सहन करण्याची शक्ती अंगी येणे होय. वरील साधनांनी जर माणसामध्ये सहनशीलता आली तरच त्या साधनांचा काही तरी उपयोग झाला असे म्हणावे, अन्यथा तो केवळ देखावा! त्यासाठी आपण सर्वांनी आपल्या दैनंदिन जीवनात "काम-क्रोध" या दोन मोठ्या शत्रूवर सतत विजय मिळवण्याचा प्रयत्न करायला हवा. असे करत करत आपला गृहस्थ आश्रम धर्म आनंदी करण्याचे चिंतन करत राहावे.

अभंग लिहितांना तुकोबांच्या नजरेतून समाजाचा एकही घटक निसटत नाही. जपी-तपी-योगी लोकांना सुद्धा संसार कसा सुटला नाही हे सांगतांना ज्ञानी लोकही त्यांच्या नजरेतून सुटत नाहीत. ज्यांना अक्षर ज्ञान आहे त्यांनाही संसार विळखा घालून बसला आहे. अभिमान, अहंकार, विधिनिषेध, वाद-विवाद-वितंडवाद इत्यादी दोष ज्ञानी माणसाला सोडत नाहीत. परनिंदा हा एक महत्वपूर्ण दोष त्यांना चिकटतो आणि मग ते ही मनाने दुःखी-कष्टी होतात. या सर्वच भयंकर दोषातून जर मुक्त व्हायचे असेल तर तुकोबा आपल्याला काही महत्वाचे उपाय सांगतात. एवढी अनंत आव्हाने समोर असतांना माणसाने स्वतः सर्वार्थाने वज्रलेपी व्हायला हवे. लोक लोकधर्म सोडायला तयार नसतांना आपण आपला नेकधर्म सोडू नये. भूत-भविष्य यावर व्यर्थ चिंतन न करता केवळ वर्तमानात आनंदी राहण्याचे वृत्त अंगी बाळगावे. त्यासाठी माणसाने कोणतेही भूषण म्हणजेच पदवी, नामाभिधान घेऊन मिरवू नये. मी विद्वान आहे हे सांगायची गरज पडू नये. आपले आचार-विचार-बोलणे यावरूनच आपण कोण-काय आहोत? हे सर्वांना लक्षात यायला हवे. बऱ्याच वेळा आपले भूषणच आपले दुषण ठरते. आजकाल माणसांची नावे, पदव्या आणि आणखी बरेच काही दर्शनी पाहायला, वाचायला मिळते; परंतु प्रत्यक्षात भेटल्यानंतर त्यांच्यात त्या पदवी थवा नावाचा लवलेश अनुभवाला येत नाही. त्यासाठी शेवटी तुकोबाराय आपल्याला व्यर्थ खंत म्हणजेच अनावश्यक चिंता सोडून ईश्वर-आत्मकल्याण चिंतन करण्याचे सांगतात. याशिवाय खऱ्या, निरपेक्ष, सरळ वृत्ती असणाऱ्या माणसांच्या सहवासात राहावे, संतांना शरण जावे. आहे त्या स्थितीत आपण शांत राहून आज आपण जिवंत आहोत याबद्दल सृष्टीचे आभार व्यक्त करावेत.

तुकाराम नीती ही वर्तमानात सर्वश्रेष्ठ नीती ठरत आहे. आज लोकांकडे सर्वच बाबींची रेलचेल आहे, मात्र लोक दररोज दवाखान्यात आहेत. जेवढा पैसा जास्त तेवढे रोग जास्त असे जणू समीकरणच झाले आहे! गरीब, शेतकरी, दररोज कष्ट करून खाणारे शांत झोपतात तर दुसरीकडे श्रीमंत शांत-निवांत झोपण्यासाठी गोळ्या घेतात. एकीकडे माणसांना दोन वेळचे भोजन मिळवण्यासाठी प्रचंड धडपड करावी लागते तर दुसरीकडे खाल्लेले पचविण्यासाठी औषध घ्यावे लागते. हे थांबायचे असेल तर सर्वांनाच आपले दैनंदिन जीवन जगतांना सर्वच घटकांची काळजी करावी लागेल. माणसांची भूषणे दुषणे होता कामा नये. त्यासाठी प्रत्येक माणसाच्या हृदयात दया, क्षमा, शांती, संयम, संपूर्ण विश्व कल्याण वसलेले असल्यास इथला प्रत्येकजण निरोगी, आनंदी, समाधानी राहील. असे होणे म्हणजेच संपूर्ण जगाचे कल्याण होणे होय! संपूर्ण जग सुखी तर इथला प्रत्येकजण सुखी या तत्वाप्रमाणे संपूर्ण जग आनंदी होईल! असे होणे म्हणजेच तुकोबांचे अभंग वर्तमानात आणि त्यावरील ही तुकाराम नीती फलित झाली असे म्हणणे संयुक्तिक होईल! जय तुकोबाराय!

# शेतकऱ्याचे खरे शत्रू जंगली प्राणी



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**कृषी उद्योग हा खऱ्या अर्थाने देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा म्हणुन ओळखल्या जात असला तरी वेगवेगळ्या संकटामुळे खऱ्या अर्थाने शेतकरीच उद्ध्वस्त होताना दिसतोय. निसर्गाचा लहरीपणाचा फटका शेती व्यवसायाला अधुनमधुन बसत असल्याने कितीही खस्ता खाल्या तरी सुधरायची बात नाही. उत्पादन आले तर भाव नाही आणि भाव आला तर उत्पादन कमी, हे दुष्टचक्र पाठ काही सोडत नाही. राज्य आणि केंद्र सरकार त्यांच्या उन्नतीसाठी वेगवेगळे प्रयोग आणत असले तरी निसर्गाला कोण आडवणार? स्वातंत्र्यानंतर शेतकऱ्यांना पगार सुरू करणारा पहिला पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणुन ज्यांच्याकडे पाहिल्या जाते.**

शेतीमालाच्या हमी भावात वाढ केल्याने बाजारात स्पर्धा वाढली ज्याचा फायदा होत असला तरी खरं संकट शेतकऱ्यांवर वन्य प्राण्यापासून अर्थात रानडुक्कर, हरिण, ससे त्यामुळे पुन्हा एकदा शेतकरी कचाट्यात सापडला. ऊसासारखं उत्पादन रानडुक्कर एकरी वर्षभरात पंधरा टनाच्या जास्त खावुन फस्त करतात. नेमकं करावं काय? सरकारने आता काही योजना बंद केल्या हरकत नाही पण किमान अल्पभुधारक शेतकऱ्यांना अनुदानातून शेतीला तारेचे कुंपन करून दिलं तरच शेतकरी जगेल अन्यथा नाही. वर्तमानकाळात शेती व्यवसायाला चांगले दिवस आले म्हणता येईल पण दुसऱ्या बाजुने नवीन पिढी शेती व्यवसायाकडे वळायला तयार नाही. गाव पातळीवर कष्टकरी मजुर ज्याला काम सद्या नकोसे झाले. म्हणून अनेक प्रश्न पुढे येताना शेती कामासाठी रोजकऱ्यांचे आवाहन पुढे आलं आहे. कापुस वेचणी, सोयाबीन कापणी, ऊस तोडणी, भात लागवड, गहु कापणी आणि सर्व पिकांची खुरपणी करण्यासाठी मजुर उपलब्ध होईनात, जर मिळाले तर मजुरीत चारपट वाढ झाली. नवनवे तंत्रज्ञान शेती व्यवसायात आले असले तरी कष्टकऱ्यांची क्रयशक्तीच नष्ट झाल्यासारखी परिस्थिती समोर येते. वर्तमान शेतकऱ्यांची पिढी आजही काळ्या आईची सेवा करताना दिसते. मात्र नव्या पिढीत विशेषतः शेतकऱ्यांचेच लेकरं शिक्षणासाठी बाहेर जावु लागले. नौकऱ्या मिळेनात. पण शेतीत मात्र पाऊल टाकेनात. खंर पाहता पाच-दहा एकर शेती असेल तर धंदा करणारा तरूण त्याने जर वेगवेगळे उत्पादन शेतीत घेतले तर नौकरीपेक्षा पाच एकर जमिन पाचपट परवडल्याशिवाय रहात नाही. पण तरूण मुलं शेती व्यवसायाची माहितीसुद्धा करून घ्यायला तयार होत नाहीत. पुर्वी शेतकऱ्यांच्या जातीची लेकरं लहानपणापासूनच कोळपं हातात घ्यायची, जनावरे पाणी पाजायची, खळे करायची त्यामुळे उत्साहाने शेतात राबायची. आता पोरगं चौथी-पाचवीलाच तालुका जिल्हा पुणे, मुंबई शिक्षणासाठी गेल्यानंतर पुन्हा ते शेतात पाय ठेवीना. भांडवलदारांच्या लेकराला तर आपली शेती कुठे आहे? कुणाचा बांध कोण शेजारी?याचा देखील पत्ता नसतो. बाप म्हणणारा बिचारा रात्रंदिवस शेतात राबतो. लेकरांच्या शिक्षणासाठी घाम गाळत पैसा पाठवतो. पण तेच लेकरं चंगळवादाच्या भोगवादाने समुद्रात बुडाल्यासारखं बुडुन जातात तो भाग वेगळा. पुर्वी शेती उद्योग परवडायचा नाही. पण सद्या नवतंत्रज्ञानाचा क्रांती या शेती व्यवसायात जास्तीची आली. उदा.वेगवेगळ्या फळांचे उत्पादन, सिंचन शेती, भाज्या, कडधान्य किंवा इतर पिक उत्पादन अगदी अत्याधुनिक पद्धतीने घेतले तर मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होवु शकते. स्ट्रॉबेरी, कलिंगड, सफरचंद, यासारखी पिके महाराष्ट्रातील शेतकरी घेताना दिसतो. भाजीपाला उद्योग केला तरी पाच एकरात नाही म्हटलं तरी वर्षाला पाच-सहा लाखाच्या वर उत्पादन झाल्याशिवाय रहात नाही. सिंचन असणारांची शेती आर्थिकदृष्ट्या परवडते. पण कोरडवाहू शेती पुर्णतः निसर्गावर अवलंबुन आहे. निसर्गाचा लहरीपणा शेतकऱ्यांची पाठ सोडत नाही. दोन वर्षे पाऊस चांगला पडला. पुन्हा तिसऱ्या वर्षी दुष्काळ राशीला. हे दुष्टचक्र दर तीन वर्षाने फिरतं. मग शेतकऱ्यांचं मागचं पुढचं एक होऊन सारंच काही बिघडून जाते. शेतीला प्रोत्साहित करण्यासाठी वर्तमान राजकिय व्यवस्था केंद्रात अर्थात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आमुलाग्र बदल करताना शेताच्या खतावरील सबसिडी चालु ठेवली तर कधी नव्हे ते शेतकऱ्यांना मासिक पगारासारखं पंतप्रधान सन्मान निधीद्वारा अनुदान चालु केले. निसर्गाचं दुष्टचक्र ज्याला सरकारही काही करू शकत नाही. अनेकदा दुष्काळ पडला, अनुदानाची मागणी होती. अतिवृष्टी झाली तर पिके वाया जातात अनुदान मागितल्या जाते. एक रूपायात विमा



योजना शेतकऱ्यांच्या फायद्याची. पण अनेक तांत्रिक अडचणी ज्याचा लाभ मिळतोच असा नव्हे. वर्तमान स्थितीत भयानक संकटाचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत असुन खरा शत्रु आता जंगली प्राणी ज्याचा उल्लेख अगोदर केला. रानडुक्कर जे प्राणी गहु, हरभरा, इथपासून ऊस देखील येवु देत नाहीत. ज्वारी पेरली तर खातात. कुठलंही पीक ज्याला त्यांचा धोका पोहोचत आहे. ऊसासारख्या पिकात रानडुक्कर धुमाकुळ घालतात. परिणाम एकरी दहा ते पंधरा टनाचं नुकसान वर्षभरात होतं. बिचारा शेतकरी बंदोबस्त करू लागला तर अनेकांचे बळी गेले. रानडुक्करांनी कितीतरी शेतकऱ्यांना लचके तोडून जखमी केले. हरिण, मोर, ससे किंवा इतर अन्य प्राणी उभ्या पिकाची नासधुस करून टाकतात. केंद्र असो कि राज्य सरकार यांनी खऱ्या अर्थाने एक निर्णय घेतला तरी चालेल एक वेळ शेतकऱ्यांना आर्थिक मदत नाही दिली तरी चालेल पण किमान अल्पभुधारक शेतकऱ्यांना तारेचे कुंपन घालुन देण्याची सद्या तात्काळ गरज आहे. दोन एकर, तीन एकर, पाच एकरापर्यंत जे शेतकरी अल्पभुधारक आहेत यांना खऱ्या अर्थाने शेती कुंपन करून दिले किंवा त्यासाठी अनुदान दिले तर शेतकरी वाचु शकेल. ठिबकसाठी अनुदान मिळतं. स्प्रिंकलरला अनुदान मिळतं. त्याच धर्तीवर आता शेतकऱ्यांना कुंपन घेण्यासाठी शासनाने अनुदान देणे ही काळाची गरज वाटते. तारेचं कुंपन घातलं तरच जंगली प्राण्यापासुन शेती पिकाचा बचाव होवु शकतो. शेतकरी रानडुक्कर मारण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च देखील करतो. पण ते उभ्या पिकाची नासधुस करून कधी जातात? अंगावर येतात म्हणुन त्याची दहशत देखील वाढलेली आहे. कृषी खात्याने या साऱ्या गोष्टीवर मात म्हणून शेतकऱ्यांच्या कुंपनासाठी धोरणात्मक निर्णय घ्यायला हवा. महादेव पवार चतुरवाडीचे प्रगत शेतकरी, अशोक थोरात माजलगावचे शेतकरी, बालाप्रसाद जाजु, कल्याण माने, नरेंद्र जोशी, माधवराव दहिफळे, धोंडीराम कोपले या शेतकऱ्यांच्या सोबत चर्चा करताना एकच माहिती त्यांनी दिली की, रानडुक्कर हा खऱ्या अर्थाने आता शेतकऱ्यांच्या साठी शत्रु ठरला आहे.सरकारने मदत करायची असेल तर अगोदर कुंपन करण्यासाठी अनुदान 100टक्के देण्याची गरज वाटते. छोटे छोटे शेतकरी खऱ्या अर्थाने संकटात आलेले आहेत. भांडवलदार शेतकऱ्यांना एकवेळ काही नाही दिले तरी चालेल पण ज्यांची एकर दोन एकर अल्पभुधारक अशी परिस्थिती आहे अशांना मात्र सरकारने सरसकट कुंपन घालण्यासाठी मदत देण्याची गरज नक्कीच आहे.

आधुनिक केसरी



## लय भारी सुगरण

सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.
संपर्क क्र. 9503434424



# मधुर हनी आवळा कँडी

आवळ्याचा मौसम सुरु झाला की आवळ्याचे वर्षभर राहणारे मुरांबे, सुपाऱ्या ओल्या.. वाळवलेल्या, दामट्या, सांडगे, कँडी असे तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ घरोघरी बनवले जातात.कारण आवळा आहेच तितका गुणकारी. यात अनेक औषधीतत्वे आहेतच शिवाय फॉस्फरस, आयर्न, व्हिटॅमिन बी,सी, कॅरोटीन, कॅल्शियम अशा अगणित शरीरासाठी उपयुक्त पोषकद्रव्यांचा विपुल साठा आहे . त्यामुळे दररोज 1 आवला खाल्ला तर अगदी केस ,दात ,डोळे ,नखें ,त्वचा यांच्या बरोबरच पाचक असल्यामुळे पोटाचे आरोग्यही उत्तम राखले जाते . म्हणूनच आयुर्वेदात याला प्रथम स्थान आहे .अगदी च्यवनप्राश पासुन असंख्य औषधांत याचा वापर केला जातो .म्हणूनच आज पित्तावर अत्यंत खात्रीचा असा पाचक गोडाचा पदार्थ 'आवळा कँडी ' बनवणार आहोत .

**साहित्य :** अर्धा किलो आवळे , 300 ग्रॅम मध, 1 चमचा वेलची पूड, पाव वाटी पिठीसाखर.

**कृती :** उकडायचे..15 मिनिट ..मध घालून 3 दिवस ..4 त्या दिवशी पाणी गाळून सुकवायचे 4 ते 6 दिवस घरात किंवा 2..3 दिवस उन्हात.मग वेळचीपूड व पिठीसाखर घालून भरून ठेवायचे प्रथम आवळे स्वच्छ धुवून घ्यावेत. मग मोठ्या कढईत पाणी घालून ते उकळायला ठेवावे .त्यात मध्ये रिंग किंवा वाटी ठेवून त्यावर चाळणी ठेवून त्यात आवळे उकडायला ठेवावेत . साधारण 15 मिनिटे आवळे व्यवस्थित उकडून झाले की गॅस बंद करून आवळे काढून थंड होऊ द्यावेत . थोडे थंड झाले की ते नरम झालेले असतातच, त्यांचे सुरीने पाकळ्यावर कापुन मधली बी काढून टाकून पाकळ्या काढून घ्याव्यात . मग या पाकळ्या मोठ्या बाऊल मध्ये काढून त्यावर ३०० ग्रॅम मध घालावा व वेलचीपुड घालुन व्यवस्थित हलवून झाकून ठेवावे . हे 3 दिवस झाकून ठेवावे म्हणजे मध व वेलची पावडर यांचा स्वाद व गोडी छान येते . मात्र दिवसातून 2..3 वेळा वर खाली करून हलवत रहावे . चौथ्या दिवशी हे गाळणीतून गाळून घ्यावे . आवळ्यातील पाणी आणि वेलचीच्या स्वादाचे मध यांचे घट्ट सर पाणी निघते .त्यात किंचित मीठ घालून लागेल तसे थंडगार पाणी घातले की आवळ्याचा तुरटपणा ,मधाची गोडी ,वेलचीचा सुगंधी स्वाद आणि किंचित मिठामुळे आलेला खारटपणा यामुळे अतिशय टेस्टी सरबत तयार होते .हे कोमट पाण्यात किंचित आले घालुन प्यायले तर कफ ,वात दूर होतो शिवाय फ्रेशनेस येऊन स्किन छान होते , मध व आवला यांच्या औषधी गुणामुळे पाचकता वाढते .
थंड पाण्यात घालून प्यायले तर उष्णतेचे विकार दूर होऊन शरीरासाठी उत्तम असे टेस्टी सरबत बनते .
आता आवळ्याच्या पाकळ्या सुट्या सुट्या पसराव्यात व ऊन असेल तर खूपच छान..मग उन्हात 2..3 दिवस मधून मधून उलट सुलट करून व्यवस्थित वाळवून घ्याव्यात. वरून जरी सुकल्या तरी या आतून पेठ्या प्रमाणे नरम असतात. त्यामुळे खूप स्वादिष्ट लागतात .मग या पिठीसाखरेत घोळवून घट्ट झाकणाच्या बाटलीत भरून ठेवाव्यात. जर ऊन नसेल तर मात्र पंख्याखाली 5 ते 7 दिवस व्यवस्थित सुकवून घ्याव्यात आणि पिठीसाखरेत घोळवून बाटलीत भरून ठेवाव्यात .

**वैशिष्ट्य :** अशा प्रकारे बनवलेली कँडी वर्षभर छान टिकते आणि गोडसर असल्यामुळे पित्त शामक, टेस्टी, औषधी असल्यामुळे गुणकारी आहे. कँडी बरोबरच सरबत सुद्धा तब्येतीसाठी गुणकारी आहे.



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

# भ्रष्टाचारमुक्तीचे स्वप्न-एक आभास

आधुनिक केसरी

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भ्रष्टाचार मुक्त भारत बनवायचा आहे ते त्यांचे स्वप्न आहे. त्यामुळे त्यांनी त्यांची भूमिका याआधी जाहीर केली आहे "ना खाऊंगा ना खाने दूंगा". अर्थात भ्रष्टाचार करणार नाही आणि करुही देणार नाही. परंतु ना खाने दूंगा म्हणजे भ्रष्टाचार करू देणार नाही हा भाग मात्र जवळपास जैसे थे आहे. आज आपण जर वर्तमानपत्र उघडले तर जशा शेतकऱ्यांच्या आत्महत्याच्या बातम्या वाचायला मिळतात तसेच पानोपानी भ्रष्टाचाराच्या अनेक बातम्या वाचायला मिळतात. अर्थातच हा भ्रष्टाचार अनेक प्रकारांचा असतो तो अगदी खाली तलाठ्यापासून तर उच्च प्रशासकीय अधिकाऱ्यापर्यंत असतो, आमदार, खासदार, राजकीय पदाधिकारी, आता त्यात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद हे सर्व कार्यालय येतात.**

कितीही म्हटले तरी तो यामधील भ्रष्टाचार अद्याप पर्यंत थोपवता आलेला नाही. त्याचीही अनेक करणे आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मनात जरी भ्रष्टाचार मुक्त भारत ही संकल्पना असली तरीपण आज आपण बघत आहोत, तसे वातावरण नाही. ज्या त्या क्षेत्रात भ्रष्टाचार माजलेला आहे. अगदी गाव पातळीपासून भ्रष्टाचाराची मूळ आहेत आणि वरती तर मग त्याचा वृक्ष झालेला आहे .आज मितीला जर बघितले तर सहकार खाते, सार्वजनिक बांधकाम,परिवहन, अन्न पुरवठा, महसूल,कृषी, गृह, उर्जा, वन, ग्राम विकास, आदिवासी विकास, ग्राहक विभाग , शिक्षण विभाग,सर्व खाते भ्रष्टाचाराचे कुरणे आहेत. पंतप्रधानांनी कठोर पावले उचलण्याचा निर्धार केलेला आहे. पण भ्रष्टाचाराची प्रकरणे वाढताना दिसत आहेत. अनेक विकासाच्या योजना राबविण्यात येतात. त्यात मोठे प्रमाणावर भ्रष्टाचार होतो. तो थोपवण्याचे आव्हान आहे. सातबारा उतारावरील पक्की नोंद करण्यासाठी पैशाची मागणी केली जाते, शेतात वीज कनेक्शन घेताना पैशाची मागणी केली जाते, जिल्हा परिषद मधून शिक्षण विभागातून पगार काढण्यासाठी पैशाची मागणी केली जाते, वनविभागात वृक्ष लागवडीमध्ये भ्रष्टाचार होतो, सरकारी धान्य गोडाऊन मधून माल बाहेर विकला जातो. शेतकऱ्याला शेडनेट मंजुरीसाठी पैसे द्यावे लागतात, तसेच बऱ्याच वेळा निरनिराळे कर्ज मंजुरीसाठी पैसे द्यावे लागतात.

मंत्रालयापासून जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालयापर्यंत कुठेही सर्वसामान्य माणसाचे काम सहजरीत्या होत नाहीत. ही साखळी अनेक वर्षांपासून तशीच आहे. लाखाच्यावर पगार असणाऱ्या शासकीय सेवेतील कर्मचारी लाच घेताना कचरत नाही आणि त्यांनाही काही वाटत नाही. लाखाच्या वर पगार घेणारा कर्मचारी शेतकऱ्याकडून सुद्धा पैशाची मागणी करतो,आणि घेतो, ही अतिशय शरमेची गोष्ट आहे. या सगळ्या गोष्टींना कुठेतरी लगाम घालणे आवश्यक आहे. भूमी अभिलेख कार्यालयात अनेक दलालांचा वावर असतो. नाव लावण्यासाठी या ठिकाणी दर ठरलेले आहेत आणि यातील वाटा साहेबांना द्यावा लागतो असे सांगून दलाला कडून सर्वसामान्यांची लूट करण्यात येते. अलीकडेच पुण्यास ट्रस्टच्या जागेचे एन.ए. प्रस्ताव मंजूर करण्यासाठी 42 लाख लाच मागीतली.तहसीलदार महसूल सहाय्यक, तलाठी आणि खाजगी व्यक्ती अशा पाच जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. मनरेगा अंतर्गत गोठा, सिंचन, विहिरी तसेच इतर योजनांच्या फाइल्स 25% रक्कम घेतल्याशिवाय पुढे सरकत नाहीत. यामध्ये कर्मचारी अधिकारी नेत्यापर्यंतची साखळी असल्याचा स्फोट ग्राम विकास मंत्री गिरीश महाजन यांनी जळगावच्या बैठकीत केला होता . जर असेच सुरू राहिले तर पंतप्रधानांचे भ्रष्टाचार मुक्त भारताचे स्वप्न कसे पूर्ण होईल ? असेही म्हटले होते. बोगस बी बियाण्यामुळे शेतकऱ्यांना खूप मोठा फटका बसतो परंतु कंपन्यांवर कडक कारवाई होत नसल्यामुळे आणि त्यातही भ्रष्टाचार असल्यामुळे ते शक्य होत नाही .जालना जिल्ह्यातील परतुर येथील उपविभागीय कृषी अधिकारी यांना एक लाख रुपयाची लाच घेताना रंग हात पकडले. कृषी संजीवनी योजनेतून घेतलेल्या शेडनेटचे बिल काढण्यासाठी पैशाची मागणी केली होती. तर भूसंपादन अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाला पाठवण्यासाठी लाच स्वीकारतांना उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात आली.पुणे, नासिक, येथेही अलीकडच्या काळात वरिष्ठ अधिकाऱ्यांची भ्रष्टाचाराची मोठी प्रकरणे निघाली. नाशिकला तर महसूल सप्ताहातच तहसीलदार पंधरा लाख रुपयाची लाच घेताना पकडला गेला. तर पुण्यामध्ये महानगरपालिकेत निवृत्त झालेल्यांना दहा हजार रुपये पासून ते एक लाख रुपये पर्यंतचे मागणी (लाच )पेन्शन सुरू होण्यासाठी केली जाते. मुंबईत आय आर एस अधिकारी इडी कडून ताब्यात घेतला जातो, असे एक ना अनेक भ्रष्टाचारी प्रकरणे आपल्याला



पाहायला मिळतात.किती सांगावी,पानेची पानं भरतील. लाच लुचपत विभागामार्फत सापळे रचले जातात भ्रष्टाचारींना पकडण्यात येते परंतु त्याचे पुढे काय होते ? हे मात्र समजत नसते. ते प्रश्न अनुत्तरीतच राहतात. त्या दृष्टीने अशा केलेल्या कार्यवाहीचा आणि कारवाईचा अहवाल वेळोवेळी प्रसिद्ध व्हायला हवा जेणेकरून जनतेमध्ये जागृती निर्माण होईल. भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्व सामान्य नागरिकांना सामील करून घेण्याच्या गरजेवर पंतप्रधानांनी भर दिला आहे. त्यामुळे भ्रष्टाचारी किती शक्तिशाली असला तरी त्यांना वाचवायचे नाही ही जबाबदारी अनेक संस्थांची आहे तसेच त्या व्यक्तीला राजकीय, सामाजिक पाठबळ मिळायला नको. अशा वातावरण निर्मितीची गरज आहे. एका कार्यक्रमात नाना पाटेकर यांनी मुख्यमंत्र्यांना प्रश्न विचारला होता, मंत्री तर जाऊ द्या,पण साधा आपला नगरसेवक यावर्षी निवडून आला की पुढच्या वर्षी मालामाल होतो.कोट्याधीश होतो. मला कळतं सगळ्यांनाच कळत, तुम्हालाही कळत, पण आपण बोलत नाही. त्याची चौकशी व्हायला नको का ? एकनाथराव ? आपण का बोलत नाही ? परंतु त्याचे उत्तर मुख्यमंत्रीनी न देता,देवेंद्र फडणवीस यांनी दिले. आपण म्हणतात ते बरोबर आहे. पण परिस्थितीच अशी आहे की आज भ्रष्टाचाराच्या आरोपातून बाहेर आलेल्या,अनेक चौकशात,घोटाळ्यात अडकलेल्या लोकांची पसंती असते. तो मोठ्या मताने निवडून येतो आमचा नाईलाज असतो.

जनतेने खरं खोटं चांगलं वाईट हे ओळखायला पाहिजे त्याची गरज आहे. परंतु हे उत्तर ना नाना पाटेकर यांनी ऐकून घेतले त्यावर नंतर चर्चा केली नाही. परंतु फडणीसांची हे उत्तर फारसे संयुक्तिक वाटत नाही. आजची परिस्थिती आपण बघितली का राष्ट्रीय पक्षांना कुठली तत्व राहिले नाही अनेक भ्रष्टाचाराची आरोप असताना त्यांना सत्ताधारी पक्ष जवळ करतो मग हे कसे साध्य होणार?

आपण स्वतः इतके स्वच्छ असताना मग अशा भ्रष्ट लोकांना का सामावून घेतात ? मग भ्रष्टाचार मुक्त भारत हे स्वप्न पंतप्रधान उराशी बाळगून आहेत ते कसे पूर्ण होणार. सरकार कोणाची असो पक्ष कोणताही असो पण अशा लोकांना राजकारणापासून त्यांची जागा त्यांना दाखवली पाहिजे, त्यांना निवडणुकीत तिकीट नको तरच हे शक्य आहे . अधिकाऱ्यांच्या बाबतीतही कडक धोरण ठेवायला हवे, नाहीतर अशा लोकांना उदो उदो सुरू राहिला तर ही भ्रष्टाची कीड अशीच वाढत जाणार आहे आणि म्हणून जो प्रश्न नाना पाटेकर यांनी एकनाथ शिंदे यांना विचारला तोच प्रश्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही आहे असे समजण्यास काही हरकत नाही.पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ह्याचे विषयी बोलायलाच हवे.

नगरसेवक असो पंचायत समिती सदस्य अध्यक्ष जिल्हा परिषद अध्यक्ष सदस्य जिल्हा बँक अध्यक्ष संचालक, दूध संघ मार्केट कमिटी महामंडळ अध्यक्ष सदस्य मंत्री आमदार खासदार त्यांचे अगदी जवळचे कार्यकर्ते सहाय्यक ही मंडळी थोड्या दिवसातच मालामाल होत असते हे काही लपून राहत नाही. परंतु हा प्रश्न जे स्वतःला प्रधान सेवक समजतात त्यांना कोण विचारणार ?

ही परिस्थिती न बदलण्यास जनताही तेवढीच कारणीभूत आहे . आपले काम पैसे देऊन करून घ्यायचे आणि भ्रष्टाचारावर गप्पा करायच्या. खरतर सर्वसामान्य जनतेने आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवायला हवा आहे .त्यासाठी सरकारने अनेक उपाय योजना केल्या आहेत, त्याचा उपयोग करून घ्यायला हवा. तक्रार करण्यासाठी टोल फ्री नंबर दिलेले आहेत आपण त्याच्या माध्यमातून तक्रार करू शकतो. परंतु आपली तशी मानसिकता नसते. होईल त्या मार्गाने काम करून घेणे हेच आपण जास्त पसंद करतो. 1064 नंबर महाराष्ट्र सरकारने त्यासाठी उपलब्ध करून दिलेला आहे.

ज्याच्यांवर गुन्हे दाखल आहेत,तुरुंगवास भोगून आले आहे, असे आमदार खासदार मंत्री यांचे पेन्शन आणि इतर सवलती तसेच प्रशासकीय अधिकारी कर्मचारी अशा प्रकरणात असतील, भ्रष्टाचारात असतील त्यांचे सुध्दा पेन्शन ग्रॅच्युइटी गोठवायला हवे. तरच अशा कडक कारवाईमुळे "ना खाऊंगा ना खाने दूंगा" याला काही अर्थ प्राप्त होईल.आणि भ्रष्टाचार विरोधी चळवळ अधिक व्यापक होईल.

# केंद्र सरकारची उसापासून इथेनॉल निर्मितीवर बंदी

आधुनिक केसरी

नुकताच केंद्र सरकारने ऊसापासून इथेनॉल निर्मितीवर बंदी घातली आहे त्यामुळे संपूर्ण साखर उद्योगासह शेतकऱ्यांवर या निर्णयाचा थेट परिणाम होणारं आहे देशात साखर कमी पडून साखरेचे दर वाढतील या भितीपोटी केंद्राने इथेनॉल निर्मितीवर बंदी घातली आहे केंद्र सरकारने साखर उद्योगातील खासगी आणि सहकारी साखर कारखान्यांना प्रोत्साहन, सबसिडी, व व्याजामध्ये सवलत देवून इथेनॉल प्रकल्प निर्मितीवर मोठा भर देवून साखर उद्योगाला अच्छे दिन यावेत यासाठी उभारी दिली होती या प्रकल्पात कोट्यावधी रुपयांचे भागभांडवल साखर उद्योगाने गुंतवले आहेत असे असताना केंद्र सरकारने देशात साखर कमी पडते म्हणून असा अचानक इथेनॉल निर्मितीवर बंदी घालणे कितपत योग्य आहे ? साखर कारखान्यांनी इथेनॉलमध्ये अब्जावधी रुपये घातले आहेत त्याचे काय होणारं ? असा देखिल प्रश्न निर्माण होतो आहे ऊस क्षेत्र कमी का होत आहे ? याचा देखील सरकारने गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे वाढते रासायनिक खतांचे दर,उत्पादन खर्च, सातत्याने वातावरणातील होणारा बद्दल अशा परिस्थितीत ऊस उत्पादकांना सरकारने तातडीने आर्थिक सहाय्य करणे गरजेचे आहे तरचं देशातील ऊसाचे उत्पादन वाढून साखर उत्पादित होण्यास बळ मिळणारं आहे !

राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव



# लैंगिक समस्या निदान व उपचार

आधुनिक केसरी

**नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.**



**हनिमून भाग 2 पुढे सुरू...**

५. उत्तेजनात्मक वाचन किंवा श्रवण करणे कामसूत्र किंवा तत्सम मासिके किंवा पुस्तकं यांचं एकत्रित वाचन किंवा एकमेकाला वाचून दाखवणे, किंवा तशा पद्धतीच्या फिल्मस किंवा ऑडिओज ऐकणे याचाही एक वेगळा प्रभाव कामजीवनावर दिसून येतो.

६. सूर्योदय किंवा सूर्योस्ताचे निरीक्षण करणे हा एक एकाग्रतेसाठी असलेला उपाय आहे. यामध्ये नवविवाहित जोडपं एकत्र येऊन त्यांच्यामध्ये एक अनोखं भावनिक नात निर्माण होतं, ते एकमेकांमध्ये भावनांनी गुंतत जातं. एकमेकांबद्दल ओढ निर्माण होते. ७. फोटोग्राफी - प्रत्येकालाच फोटोची आवड असते. आपला आलेला सुंदर फोटो आणि दुसऱ्याने केलेली जत्याची प्रशंसा हा अगदी सगळ्यांच्याच आवडीचा भाग. 'सेल्फी' या आत्ताच्या आधुनिक प्रकारामुळे तर ही आवड अजून वाढली आहे. हनिमूनच्या या प्रवासात दररोज न चुकता वेगवेगळ्या ठिकाणी एकमेकांचे किंवा एकत्र असे फोटो काढून रात्री एकांतात ते पाहात पाहात एकरूप होण्याचा आनंद काही वेगळाच... ८. मसाज - मसाजमुळे पूर्ण स्ट्रेस किंवा टेन्शन कमी होते. SKIN TO SKIN TOUCH मुळे डोपामीन नावाचे एक हार्मोन तयार होतं. ज्याने उत्तेजना आणि जवळीक अधिक वाढते. मात्र मसाज हा जोडप्यानं एकमेकांचा करायचा आहे ९. रुम-सर्व्हिस - ज्या ठिकाणी आपण थांबलो आहोत त्याठिकाणच्या रुमवरच एकाद्यावेळचं जेवण मागवा आणि एकाच प्लेटमध्ये एकमेकांना भरवत मस्त जेवावं. हे करत असताना सोबत एखादं ड्रिंक म्हणजे मॉकटेल किंवा वाईन घेता आली तर त्या जेवणाची रंगत अजूनच वाढते. हनिमून पॅकिंग




हनिमूनला जाताना काय घ्यावे आणि काय घेऊ नये ?

हनिमूनला जात असताना फार जास्त कपडे घेण्याची आवश्यकता नसते. मोजकेच साधारणतः हॅण्डबॅगमध्ये राहतील एवढेच कपडे घ्यावेत. जेणेकरुन बॅगा गहाळ होण्यासारखा प्रकार होऊ नये, उदा. काय घ्यावे? दोन शूज, २-३ शॉर्ट्स, २ पेअर पॅन्ट, २ ते ३ स्कर्ट्स, ड्रेसेस, २-३ स्विमिंग सुटस्, कवर अपस, ४-५ टी शर्ट्स, २ ब्लाऊज, लिंगरी, हॅटस्, लाईट स्वेटर, नायटी आणि स्वतःचे किट इ. यामध्ये अजूनएक ॲडिशनल अशी हॅण्डबॅग घेता येईल ज्यात, बीचवर फिरायला जाताना, महत्त्वाच्या ज्वेलरीज ठेवल्या जाऊ शकतात किंवा एखादी छोटी पर्स जी खांद्यावर टाकता येऊ शकेल. ज्यामध्ये महत्त्वाचे पेपर्स, पासपोर्ट, आय.डी. प्रूफ व कॅश ठेवता येऊ शकेल जे की जास्त सुरक्षित असेल. स्कर्ट किंवा ड्रेसेस कसे असावेत ? सहजतेने घातला वा काढता येतील असे कपडे असावेत. ज्याला आपण नेटेड पॅटर्न (जाळीदार) तसेच तो चांगला आकर्षक असेल याची काळजी घ्यावी. पॅन्ट - कॉटन किंवा लिननच्या पॅन्ट्स किंवा लाईट वेट डेनिम वापरावे आणि त्याचा रंग सहसा पांढरा असावा. सहसा स्ट्रेचेबल फॅब्रिरीक असेच वॉश ॲण्ड वेअर असे असावेत. विनाकारण बॅगेचे वजन वाढेल अशा जीन्स पॅन्ट्स घेऊन जाऊ नये. शॉर्टस - २ ते ३ कॅज्युअल शॉर्टस असाव्यात, जर बीचवर जायचे असेल तर एक अतिरिक्त सेटसोबत असावा सहसा पाण्यात चप्पल, वेट प्रूफ जाड सोल असलेले वापरावेत. शर्ट - कॉटन टी शर्ट सोबत असावेत ज्याचे २-३ सेट असावेत. बीच बीअर - बिकिनी २ स्वीम सुट्स असावेत. सूर्य प्रकाशात फिरायचे असेल तर हॅट आणि गॉगल्सही असावेत. लाँझरी किंवा स्लीप वेअर स्ट्रीप लेस ब्रा किंवा स्ट्रेंच टॉप आणि सॉक्स, लेगीज सोबत असावेत. स्वेटर - लाईट वेट स्वेटर असावे. शूज - ब्लॅक कलर व लो हिल असे असावेत. एखादा स्पोर्टस् शूजचा सेट देखील असावा. पाण्यात चालण्यासाठी स्पेशल जाड तळव्याचे व रफ सर्फेसचे स्लीपर असावेत.



डॉ. विजय दहिफळे
युरोलॉजिस्ट, अँड्रॉलॉजिस्ट अँड सेक्सॉलॉजिस्ट
9822326248

# “एक महल हो सपनों का...”

आधुनिक केसरी




प्रसिद्ध निर्माते-दिग्दर्शक देवेंद्र गोएल यांनी `वचन', `चिराग कहां रोशनी कहां', `प्यार का सागर', `दूर की आवाज', `दस लाख', `एक फूल दो माली', `धडकन', `एक महल हो सपनों का', `आदमी सडक का', `दो मुसाफिर', `दोस्त असावा तर असा' आदी उत्तमोत्तम चित्रपटांचे दिग्दर्शन केले. यापैकी १९७५ साली प्रदर्शित झालेल्या `एक महल हो सपनों का' या चित्रपटात त्यांनी अशोक कुमार, धर्मेंद्र, शर्मिला टागोर आणि लीना चंदावरकर (गांगुली) या नामवंत कलावंतांना प्रमुख भूमिकांमधे चमकविले होते. साथीला देवेन वर्मा, डेव्हिड अब्राहम, रमेश देव, अचला सचदेव, जगदीश राज, मोहन शेरी, आशा चंद्रा, संजना, ब्रह्मचारी, बिरबल आदी सहकलाकार होते. गीतकार साहिर लुधियानवी यांची अर्थपूर्ण गीते आणि संगीत दिग्दर्शक रवि यांचे सुश्राव्य व दर्जेदार संगीत या चित्रपटाच्या जमेच्या बाजू होत्या.

या चित्रपटात दाखविल्याप्रमाणे विशाल (धर्मेंद्र) हा मध्यमवर्गीय कवी आपल्या आईसोबत (अचला सचदेव) राहात असतो. त्याची आई व्हील-चेअरला खिळून असते. एका प्रकाशनसंस्थेत काम करणाऱ्या अरुणा (शर्मिला टागोर) या तरुणीवर त्याचे प्रेम बसते. विशालच्या स्पष्टवक्तेपणामुळे तो नोकरीत टिकू शकत नाही. त्याला आपल्या संस्थेत नोकरी मिळावी म्हणून अरुणा प्रयत्न करते पण ते व्यर्थ ठरतात. मग अरुणा विशालला भेटणेच बंद करते. काही दिवसांनी विशालला एका विवाहाची निमंत्रणपत्रिका येते. अरुणा आणि तिच्या कंपनीचे मालक आनंद कुमार (अशोक कुमार) यांच्या विवाहाचे ते निमंत्रण असते. विशाल मानसिकदृष्ट्या पूर्णपणे उद्ध्वस्त होऊन मद्याच्या आहारी जातो. इतकेच नव्हे तर वारांगनांकडेही त्याची पावले वळतात. तो जुगारी बनतो. तो सगळ्याच स्त्रियांचा कमालीचा द्वेष करू लागतो. रामू मखिचंदानी (देवेन वर्मा) नामक गृहस्थाला तो आपल्या कविता विकतो त्यामुळे त्याला प्रसिद्धी मिळते ; पण त्याच्या जीवनराहणीत तिळमात्र बदल होत नाही. आता सोनिया (लीना चंदावरकर) ही सुंदर तरुणी त्याच्या जीवनात येते. ते एकमेकांच्या प्रेमात पडतात. विशाल तिला लग्नाबद्दल विचारतो आणि ती त्याला होकार देते. पण नियतीच्या मनात काही वेगळेच असते. सोनिया ही अरुणाची सावत्र मुलगी असते. त्यामुळे हे लग्न व्हावे असे विशाल आणि अरुणा या दोघांनाही वाटत नाही. आनंद कुमार यांच्याशी विवाह करण्याचा निर्णय अरुणा का घेते ? विशाल आणि सोनिया यांचे काय होते, या प्रश्नांची उत्तरे अखेरीस मिळतात.



या चित्रपटातील “एक महल हो सपनों का” हे अतिशय सुमधुर शीर्षकगीत लता मंगेशकर आणि मोहम्मद रफी यांनी गायिले असून ते अरुणा (शर्मिला टागोर) आणि विशाल (धर्मेंद्र) यांच्यावर चित्रित झाले आहे. हे युगुल स्वप्नविश्वात रममाण झाले आहे. स्वप्नांचा महाल असावा, त्यात फुलांनी भरून गेलेले अंगण असावे आणि आपल्या माणसांची साथ असावी, असे ते एकमेकांना बोलून दाखवीत आहेत. ढगांची फरशी व्हावी, धुक्याच्या भिंती व्हाव्यात आणि आकाशातील चमचमणाऱ्या ताऱ्यानी तुझे माझे नाव घ्यावे, असे स्वप्न दोघे पाहात आहेत. साहिर लुधियानवी यांनी स्वप्नरंजन फारच सुरेख रेखाटले आहे. दिग्दर्शक देवेंद्र गोएल यांनी संपूर्ण गीताचे चित्रीकरण स्वप्नाच्या आकर्षक महालात करण्याची कल्पकता दाखविली आहे. संगीतकार रवि यांनी गीताच्या चालीवर व गायनावर अधिक भर दिला आहे. या गीताच्या ओळी पुढीलप्रमाणे :



**एक महल हो सपनों का**
**फूलों भरा आंगन हो**
**और साथ हो अपनों का**
**उडते बादल फर्श बने**
**और धुंद की हो दीवारे**
**छत के झिलमिल तारे**
**तेरा मेरा नाम पुकारे**
**सपनों के इस महल में**
**बिखरे मुस्कानों के मोती**
**मेरे प्यार की खुशबू**
**पहिले तेरे रूप की ज्योति**
**मैं तेरे नैनों पर कर दू**
**अपना सब कुछ वारी**
**मैं तेरी बाहों में छुप कर**
**भूलूं दुनिया सारी**

अनिल रा. तोरणे
९२२६१६०६५४

# चला , एक राष्ट्र म्हणून आपण उभे राहू या ...



शाम हेडाऊ
संपर्क क्र. 9834301568

आधुनिक केसरी

**हा देश स्वतंत्र होऊन आज ७५ वर्ष झालीत. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आपण सगळे सर्वत्र साजरा करत आहोत. या स्वातंत्र्यासाठी कित्येकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली तर कित्येकांचं अवघं कुटुंब च्या कुटुंबच स्वातंत्र्याच्या धगधगत्या यज्ञकुंडात समीधासम समर्पित झालं. हे सगळं फक्त नी फक्त ही मातृभूमी, ही भारतमाता स्वतंत्र व्हावी नी ईथे मोकळा श्वास घेता यावा यासाठी हे सारं काही घडत गेलं. हसत हसत फासावर चढण्यासाठी , स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात समर्थनासाठी, भर कोर्टात बॉम्ब टाकण्यासाठी तेव्हा कोणीच कुणाची जात, पात , धर्म, पंथ विचारत नव्हते. माझी मातृभूमी, माझी भारत माता स्वतंत्र व्हावी हेच तेवढे काय ते सगळ्यांचे एक समान ध्येय होते.**

आज मात्र हा देश एक विकसित राष्ट्र म्हणून समोर येत असताना, आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वतःचा दबदबा निर्माण करत असतांना दुसऱ्या बाजूला आपण जात, पात, धर्म, पंथ, पक्षाचे भेदाभेद घेऊन आपसातच एकमेकांच्या विरोधात लढण्यासाठी सज्ज होत आहोत. जो तो आज फक्त नी फक्त स्वतःच्या जाती च्या नी धर्माच्या संकुचित विचारात इतका गुरफटतोय की त्याला या राष्ट्राप्रती आपलं काही कर्तव्य आहे. हे राष्ट्र टिकून राहावं म्हणून माझी वैयक्तिक काही जबाबदारी आहे याचाच विसर पडलेला दिसतो आहे.

भारतातलं राजकारण आज जात आणि धर्म यात पूर्णतः गुरफटून गेलंय असच चित्र दिसायला लागलंय. राजकारणाचा पोत आज दिवसेंदिवस खालावत चालला असून इंग्रजांचेच धोरण राबवून आपल्या पक्षाची सत्ता हस्तगत करावी यासाठी जाती जातीत तोडा ,फोडा आणि राज्य करा हेच धोरण आता राष्ट्रीय धोरण म्हणून समोर येताना दिसत आहे. आणि हीच या राष्ट्रासमोरील येणाऱ्या काळातील सगळ्यात मोठी समस्या म्हणून उभी राहणार आहे अस दिसतंय. तरुणाई चा वापर करून त्यांना एकमेकांच्या विरोधात उभे करणे आणि आपल्या पक्षाची सत्ता यावी म्हणून त्यानांच आपआपसात लढवणे हे काम आज राजकीय पक्ष करत आहेत. संपूर्ण विश्वात सगळ्यात जास्त असलेली तरुणाई आज राजकारण्यांच्या जाळ्यात पुरती अडकत चालली असून ही शक्ती राष्ट्राच्या निर्मिती मधे, राष्ट्राच्या पुनर्बांधणीत आपलं योगदान देण्याऐवजी राजकीय पक्षांचे धरणे , आंदोलन, उपोषण यात आपली मौल्यवान शक्ती वाया घालवत आहेत. देश विकासाच्या दिशेने वाटचाल करत असतांना आम्ही कसे मागास आहोत आणि आम्हाला आरक्षणाची किती गरज आहे यासाठी आजचा तरूण राजकीय पक्षांच्या माध्यमातून भरकटत चाललेला दिसतो आहे.



दुसऱ्या बाजूला राजकीय पक्षांची ध्येय धोरणे ही या राष्ट्राला विश्वात अग्रेसर म्हणून ओळख निर्माण करण्यास सहकार्य व्हावे या ऐवजी जाती जातीत भांडण लावणे , आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्याच देशाची प्रतिमा मलीन करणे , धार्मिक तेढ निर्माण होईल असे वातावरण तयार करणे , लोकांची दिशाभूल करणे , आजच्या परिस्थितीत ज्याचा काहीच उपयोग नाही असे जुने मुद्दे उकरून काढणे, देशाचं वातावरण गढूळ करणे असा प्रकार आज आपण सगळेच अनुभवतो आहोत. जे या देशासाठी खूप घातक आहे. माझी आजच्या तरुणाई ला एक कळकळीची विनंती आहे. मित्र मैत्रीणिंनो हे राष्ट्र एक समृद्ध राष्ट्र म्हणून, एक विकसित राष्ट्र म्हणून समोर यावं अस जर तुम्हाला वाटत असेल तर आपली बुद्धी , आपली शक्ती , आपला वेळ , आपलं कौशल्य हे राष्ट्राच्या पुनर्बांधणीत कसं देता येईल याचा विचार करा. जातीजातीत भांडत राहण्यापेक्षा एक राष्ट्र म्हणून आपण सगळे उभे राहू शकू का याचा विचार करा. राजकीय क्षेत्रात जायचं असेल तर आपण आपल्या राष्ट्रापती काय चांगल करू शकतो याचा विचार करा. राष्ट्र निर्माण कार्यात सहभागी होण्यासाठी आपल्याला देशाच्या सीमेवर जायची गरज नाहीय मित्रांनो. तर ,जिथे आहोत तिथे आणि जे काम आपण करत आहोत ते काम प्रामाणिकपणे करणे , आपल्या दिवसभरातील एक तास मी या राष्ट्राचा एक सजग नागरिक म्हणून या समाजासाठी देणे , जस जमेल तस माझ्या समाज बांधवांना मी काय सहकार्य करू शकतो याचा विचार करणे , या देशाच्या मातृशक्तीला मी काय सहकार्य करू शकतो याचा विचार करणे, या राष्ट्राच्या पुनर्बांधणीत माझं काय योगदान देता येईल याचा करणे आज खूप आवश्यक आहे मित्रांनो. या देशाचे राष्ट्रपती डॉक्टर ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी या देशाच्या तरुणाई च्या शक्तीवर विश्वास व्यक्त करत हा देश येणाऱ्या काळात विश्वाचं नेतृत्व करेल हे स्वप्न बघितलं होतं. तर श्रद्धेय बाबा आमटे यांनी जात पात के बंधन तोडा , जोडो जोडो भारत जोडो असा नारा दिला होता. चला आपण कलामांच्या स्वप्नातला भारत उभा करू या. या भारत मातेला विश्वगुरु पदी आसनस्थ करू या. बाबा आमटेंच्या आवाहनाला प्रतिसाद देत एक राष्ट्र म्हणून आपण सगळे उभे राहू या.

# विद्यार्थ्यांसाठी आयआयबी इन्स्पायर व्याख्यानाचे आयोजन

## प्रेरणादायी वक्ते प्रबोधनकार प्रा. नितीन बानुगडे पाटील करणार विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर / नांदेड :** मेडकील व इंजिनीयर प्रवेशासाठी अग्रगण्य संस्था असलेल्या आयआयबीच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी आयआयबी इन्स्पायर व्याख्यानाचे आयोजन येत्या 12 डिसेंबर रोजी नांदेड व लातूर या दोन्ही ठिकाणी करण्यात आले असून विद्यार्थी कसा असावा व त्याने स्पर्धेला कसे सामोरं जावे यासह विद्यार्थ्यांशी निगडीत अशा अनेक विषयावर व समस्यांवर प्रा. बानुगडे पाटील मार्गर्शन करणार असल्याची माहीती आयआयबीचे संचालक दशरथ पाटील यांच्या वतीने देण्यात आली आहे . आयआयबी च्या वतीने नांदेड येथे मंगळवार दि 12 रोजी सकाळी साडेदहा वाजता डी मार्ट जवळील कॅनॉल रोडवरील चांदोजी पावडे मंगलकार्यालयात तर लातूर येथे सावेवाडी येथील दिवाणजी मंगल कार्यालयात सायंकाळी साडेपाच वाजता, या




व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. आजच्या अटीतटीच्या वेगवान स्पर्धेच्या काळात आपला विद्यार्थी टिकावा तसेच त्याच्यावर समाजशिल संस्कार व्हावेत या हेतूने इन्स्टिट्यूट कडून सातत्याने विविध उपक्रम राबवले जातात त्याचाच एक हा भाग म्हणून मागील दोन दशकापेक्षा जास्त काळापासून आयआयबीच्या वतीने विद्यार्थ्यांच्या मनावर आणि करीअर वर संस्कार घडवणाऱ्या मार्गदर्शन व प्रोत्साहनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थी हाच केंद्रबिंदू मानत सुरू असलेल्या आयआयबीच्या वाटचालीतील हा एक महत्वपूर्ण असा मार्गदर्शनपर कार्यक्रम असून ,12 वी बोर्ड ची परीक्षा येऊ घातले आहे. त्यानंतर लगेच नीट ,जेईई च्या परीक्षेला विद्यार्थ्यांना याच वातावरणात सामोरे जावे लागनार आहे. अभ्यासाचा ताण तणाव, व नीट, जेईई परीक्षेत उत्तम गुण मिळविण्याचे दडपण, यामुळे विध्यार्थ्यांसह पालकांवर दडपण असते, अशा परिस्थितीत ताणतणावावर मात करून या स्पर्धेच्या युगात कसे सामोरे जायचे याबाबत बानुगडे पाटील आपल्या व्याख्यानातून विध्यार्थी व पालकांशी संवाद साधणार आहेत. यात बानुगडे पाटील हे विध्यार्थी त्यांच्याशी निगडीत अशा विविध विषयावर मार्गदर्शन करणार असून या कार्यक्रमाचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी व पालकांनी लाभ घ्यावा असे आवाहन टिम आयआयबीच्या वतीने करण्यात आले आहे .

> नीट आणि जेईई चा प्रवास सोपा नाही, दरवर्षी लाखोंच्या संख्येने विध्यार्थी या परीक्षेला बसतात , त्यामुळे या स्पर्धेमुळे विध्यार्थ्यांमध्ये तणाव असतो विध्यार्थ्यांना तणावमुक्त ठेवण्यासाठी टीम आय आय बी कडून वर्षभर विध्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात . असे असले तरी विद्यार्थ्यांचे अतिरिक्त मनोबल वाढविण्यासाठी आय आय बी च्या वतीने दरवर्षी इंस्पायर प्रोग्राम घेतला जातो जेणेकरून विध्यार्थ्यांमध्ये नवी ऊर्जा निर्माण होईल व नव्या ऊर्जेने विध्यार्थी नीट आणि जेईईच्या परीक्षेला सामोरे जाऊ शकतात .
> **प्रा . चिराग सेनमा, डायरेक्टर, आय आय बी करिअर सेंटर**

# आग्रा रोड ते पाच कंदील परिसरात वाहतूक शाखेच्या पोलिसांकडून कारवाई

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** गेल्या अनेक वर्षापासून आग्रा रोड संपूर्ण पाच कंदील परिसरात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण करून व्यावसायिकांनी वाहनचालकांसाठी व इतरांसाठी त्रासदायक ठरेल असा मनमानी कारभार सुरू होता त्यांच्यावर आतापर्यंत कुठलीही ठोस कारवाई करण्यात आली नव्हती. त्यामुळे नागरिकांचा रोष वाढत होता.

अशा गोष्टी लक्षात घेता वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक भूषण कोते यांनी मोठी भूमिका बजावली आहे आग्रा रोड ते संपूर्ण पाच कंदील परिसरात वाहतुकीला अडथळा आणणारे व्यवसायकांवर कारवाई करण्यात आली आहे त्या ठिकाणी नागरिकांनी भूषण कोते यांचे आभार व्यक्त केले आहे.

# पहूर येथील बालकवी विद्यार्थीनीचा आयशरच्या धडकेत जागीच मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** ता.जामनेर येथे आयशरच्या धडकेत विद्यार्थिनीचा जागीच मृत्यू झाल्याची घटना दि.८/१२/२३ शुक्रवारी सकाळी पावणे आठ वाजेच्या दरम्यान घडली.

पहूर येथील शिक्षक तथा पत्रकार शंकर भामरे सायकलने मुलगी ज्ञानेश्वरी भामेरे हिच्यासह बस स्टॅन्ड वर येत असतांना पाठीमागून मागून येणाऱ्या आयशर क्रमांक एम. एच. २३ ऐ.यु ५५८२ या गाडीने जोरदार धडक दिली त्यात शंकर भामरे व मुलगी ज्ञानेश्वरी रस्त्यावर फेकले गेले यात सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी वय (११ ) हिचा जागीच मृत्यू आयशरच्या धडकेत विद्यार्थिनीचा मृत्यू झाला. तर शंकर भामेरे हे जखमी झाले.नेमकीच कु.ज्ञानेश्वरी शंकर भामेरे यामुलीची बाल शिवबा हि कविता दि.६/१२/२३ बुधवार रोजी दैनिक अजिंक्य केसरीरा छापून आली होती.ज्ञानेश्वरी ही आज जळगाव येथे स्वतः लिहिलेल्या कविता सादर करण्यासाठी कवी संमेलनाला जात



होती. तीला सोडण्यासाठी वडील शंकर भामरे बस स्थानकावर येत असतानाच हा अपघात झाला. दुपारी एक वाजता शोकाकुल वातावरणात ज्ञानेश्वरी भामरे यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान आयशर चालक सुनिल ग्यानदेव सोनवणे राहणार अंजनवटी तालुका जिल्हा बीड यास पहूर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. बसस्थानक परिसरात रास्ता रोको सध्या सर्वत्र रस्त्याचे काम सुरू असून काम अपूर्ण अवस्थेत असल्याने रहदारीस अडथळा निर्माण होत आहे . त्याचाच बळी ज्ञानेश्वरी भामेरे बालकवी ठरली आहे जळगाव - संभाजीनगर महामार्गालगत असलेल्या वाघूर नदीवरील पुलाचे काम सध्या सुरू आहे रस्त्याची अवस्था अतिशय गंभीर असून येणाऱ्या जाणाऱ्यांना त्याचा भयंकर त्रास होत आहे. या ठिकाणी अनेक छोटे-मोठे अपघातही दररोज होत आहे या रस्त्याचे काम त्वरित व्हावे यासाठी या मुलीचे अंत्यसंस्कार आटोपताच पहूर येथील सर्वपक्षीय नेत्यांनी व नागरिकांनी पहर बस स्थानक परिसरात रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी माजी जि.प सदस्य राजधर पांढरे, माजी जि.प कृषी सभापती प्रदीप लोढा, रामेश्वर पाटील, महेश पाटील, आदींनी संतप्त भावना व्यक्त करून पहूर पेठ व पहूर कसबे या दोन्ही गावात जाण्यासाठी रस्ता नसल्याने नागरिकांना आपला जीव मुठीत घेऊन हायवे ओलांडून गावात जावे लागत आहे व बस स्थानक परिसरातील अतिक्रमण काढण्याची मागणी ही यावेळी रास्ता रोको आंदोलनावेळी करण्यात आली. रस्त्याचे काम त्वरित करावे दरम्यान रस्त्याचे काम त्वरित न झाल्यास पुन्हा रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा तसेच आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला.

# जळगाव जामोद येथे धम्म परिषदेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने जळगाव जामोद येथील श्रीपाद कृष्ण कोल्हटकर महाविद्यालयाच्या प्रांगणात १० डिसेंबर रोजी भव्य बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. धम्म परिषदेसाठी प्रमुख मार्गदर्शक तथा उदघाटक म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आदरणीय डॉ. भिमराव यशवंत आंबेडकर, पुज्य भंते ए.सुमेधबोधी राहणार आहेत. सकाळी ध्वजारोहण उदघाटन व समता सैनिक दलाची मानवंदना होईल तसेच ठिक १२ वाजता भिमनगर जळगाव जामोद येथून मिरवणूक सुद्धा निघणार आहे. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष आद. एस.एस. वले सर, जिल्हाध्यक्ष अखिल भारतीय बौद्ध महासभा बुलढाणा उत्तर, मुख्य अतिथी म्हणून आदरणीय जयसिंग बौद्ध, जगदीश गवई (राष्ट्रीय उपाध्यक्ष) आद. भिकाजी कांबळे अध्यक्ष महाराष्ट्र राज्य, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.के. हिवराडे, जिल्हा सरचिटणीस, प्रस्ताविक के.के शेगोकार जिल्हा कोषाध्यक्ष, तर आभार प्रदर्शन सुरेश गव्हांदे जिल्हा उपाध्यक्ष (संस्कार विभाग) करतील. धम्म परिषदेसाठी मोठ्या प्रमाणावर बौद्ध बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष जगदीश हातेकर यांनी केले.

# वरदानसिंग चव्हाण जिल्हा सरचिटणीसपदी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** नांदा तांडा येथील नवयुवक सरपंच वरदानसिंग



ठाकुरसिंग चव्हाण यांच्या कार्याची दखल घेत भारतीय जनता युवा मोर्चा छत्रपती संभाजीनगर ग्रामीण उत्तर जिल्हा सरचिटणीस म्हणून निवड करण्यात आली आहे. गोरे गरिब लोकाच्या अडीअडचणी सोडवतात या सर्व कार्याची दखल घेत नवयुवक सरपंच वरदानसिंग ठाकुरसिंग चव्हाण यांच्या कार्याची दखल घेत छत्रपती संभाजीनगर ग्रामीण उत्तर जिल्हा सरचिटणीस म्हणून निवड करण्यात आली आहे. आता ही पुन्हा एक महत्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविल्या मुळे ,त्यांनी आत्तापर्यंत केलेल्या पक्षासाठी आणि समाजकार्याची दखल घेत पक्षाच्या - नेतृत्वाने यांच्या कार्य कुशलतेवर आणि कर्तृत्वार एक प्रकारे कौतुकाची थाप दिल्याचे मानले जाते. भाजपा अल्पसंख्याक प्रदेश अध्यक्ष इंद्रीसभाऊ मुलतानी, भाजपा प्रदेश सचिव सुरेशभाऊ बनकर, प्रदेश सचिव किरण पाटील, जालना लोकसभा प्रमुख विजय औताडे ,जिल्हाअद्यक्ष सुहासजी शिरसाठ, जिल्हाअद्यक्ष संजयजी खंबीयते, मा.उपमहापौर प्रमोद भैय्या राठोड,जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर भाऊ मोठे,जिल्हाउपाद्यक्ष सुनिलभाऊ मिरकर ,महीला आघाडी जिल्हाअद्यक्ष पुष्पाताई काळे, बद्रीभाऊ राठोड, जयप्रकाश भाऊ चव्हाण यासह पदाधिकार्यांनी अभिनंदन केले.

# राष्ट्रीय ओबीसी महिला महासंघाच्या प्रदेश अध्यक्षपदी अॅड. ज्योतीताई ढोकणे

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव (जामोद) :** दि.८ बुलढाणा जिल्हा महिला



काँग्रेसच्या अध्यक्ष तथा काँग्रेसच्या प्रदेश प्रतिनिधी ,माजी जिल्हा परिषद सदस्य ऍड.ज्योतीताई ढोकणे यांची राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या महिला प्रदेश अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष बबनराव तायवाडे, राष्ट्रीय महिला महासंघाच्या अध्यक्षा सुषमाताई भड यांनी दिनांक ३ डिसेंबर रोजी नागपूर येथे राष्ट्रीय महिला अधिवेशनामध्ये ऍड.ज्योतिताई ढोकणे यांच्या नावाची घोषणा केली. ह्यापूर्वी प्रदेश अध्यक्ष असलेल्या सौ.कल्पनाताई मानकर यांची राष्ट्रीय सरचिटणीस पदी निवड करण्यात आली. ऍड.ज्योतीताई ढोकणे ह्या गत तीन दशकापासून सामाजिक आणि राजकीय कार्यात सक्रिय आहेत. तालुक्यातील अग्रगण्य अशा क्रांतीज्योती महिला पतसंस्थेच्या त्या बऱ्याच काळापासून अध्यक्ष सुद्धा आहेत. राष्ट्रीय ओबीसी महासंघामध्ये सुद्धा गेल्या पाच वर्षापासून सक्रिय आहेत. त्यांच्या नियुक्तीमुळे राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या महिला विभागाचे संघटन अधिक मजबूत होईल, असा आशावाद यावेळी राष्ट्रीय ओबीसी महिला महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्षा सुषमाताई भड यांनी व्यक्त केला. त्यांच्या नियुक्ती बद्दल त्यांचे विविध ओबीसी संघटनांनी अभिनंदन केले आहे.

# चंद्रकांत अण्णा बाविस्कर यांचा जाहीर सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** येथील सुप्रसिद्ध व्यापारी व सामाजिक कार्यकर्ते शेतकरी संघाचे विद्यमान सभापती चंद्रकांत आण्णा बाविस्कर यांचा समाजाशी असलेला निष्पक्षपातीपणा व राजकारण बाजूला ठेवून समाजकारणाच्या माध्यमातून सर्वांशी जवळीक करून नामदार गिरीष महाजन यांचें खंदे व एकनिष्ठ समर्थक चंद्रकांत अण्णा बाविस्कर यांची सलग जामनेर तालुकावर तिसऱ्यांदा भारतीय जनता पार्टी तालुकाध्यक्ष व जामनेर विधानसभा प्रमुख कधी बिनविरोध निवड करण्यात आली त्यांच्या या निवडीबद्दल सर्व सामाजिक राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदनचा वर्षाव करण्यात आला त्याचेच उचित साधून शैक्षणिक क्षेत्रातून जाहीर सत्कार करण्याचे भाग्य आम्हाला लाभले तेव्हा छत्रपती संभाजी नगर जिल्हा व जळगाव जिल्हा खाजगी संस्थाचालक आघाडीच्या वतीने जीवन कोलते जय कालिंका देवी शिक्षण संस्था सावळदबारा सर्व संचालक मंडळ यांच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम
परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# गिरिजा नदीच्या पात्रातून वाळूची अवैध वाहतूक सुरूच

आधुनिक केसरी न्यूज

**रमेश दणके**

**वडोदबाजार :** पोलीस ठाणे अंतर्गत असलेल्या गिरजा नदीच्या पात्रातून अवैध्य वाळू वाहतूक जोरात सुरू असून शासनाचे लाखो रुपयांचे महसूल दुखत आहे फुलंब्री तालुक्यातील सर्वात मोठी असलेल्या गिरजा नदीच्या पात्रालगत असलेल्या वडोद बाजार भालगाव शेवता खुर्द शेवता बुद्रुक बोरगाव अर्ज निमखेडा आदी परिसरातून दररोज रात्री शेकडो ट्रॅक्टरच्या माध्यमातून वाळूची चोरटी वाहतूक केली जाते गिरजा नदीच्या पात्रात मोठमोठे खड्डे पडले असून दररोज रात्री शेकडो ट्रॅक्टरच्या माध्यमातून वाळूची वाहतूक केली जाते या चोरटी वाळूच्या वाहतुकीतून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे तर या वाळूच्या चोरट्या वाहतुकीकडे महसूल विभाग दुर्लक्ष करत असून पोलीस प्रशासनही गप्प दिसत आहे यामुळे या वाळूच्या चोरीच्या व्यवसायातून वाळू तस्कर चा व्यवसाय जोरात फोफावला आहे परिसरात अवैध्य वाळूची वाहतूक करणाऱ्यांचे मोठे रॅकेट असून शेकडो ट्रॅक्टरच्या माध्यमातून दररोज रात्री वाळूची मोठ्या प्रमाणात वाहतूक होते यात लाखो रुपयांचा शासनाचा महसूल बोलत असून पोलीस प्रशासनही या अवैध्य वाळूच्या वाहतुकीकडे दुर्लक्ष करीत आहे वा रात्री आठ वाजेपासून सकाळी सहा वाजेपर्यंत दररोज रात्री ट्रॅक्टरच्या माध्यमातून वाळूची वाहतूक केली जाते यावे ते वाळू वाहतूक करणाऱ्यांनी परिसरातील रस्ते खराब झाले असून गिरजा नदी पात्रात असलेल्या शेतकऱ्यांच्या पाईपलाईन वाळूची वाहतूक करणाऱ्यांनी फोडले आहे यामुळे शेतकऱ्याचे नुकसान होत आहे हे हवे ते वाळूची



वाहतूक करणाऱ्याचे मोठे रॅकेट असून सर्वसामान्य नागरिक या हवे ते वाळूच्या वाहतुकीबाबत बोलत नाही वाळूच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण-घेवाण होत असल्याने सरकारी बाबू ही या वाळूच्या वाहतुकीकडे हेतू पुरस्कार दुर्लक्ष करतात एखाद्या वरिष्ठ अधिकाऱ्याला अवैध वाळू बाबत माहिती मिळाल्यानंतर पथक परिसरात येणार असल्याची माहिती या वाळू तस्करांना मिळते यात महसूल विभागाचे काही कर्मचारी अवैध वाळूची वाहतूक करणाऱ्यांच्या संपर्कात असतात त्यामुळे या अवैध वाळूची वाहतूक करणाऱ्या वर मोठी कारवाई होताना दिसत नाही रात्रीच्या वेळी वाळूची वाहतूक करणाऱ्यांचे मोठे खबरे रात्रभर जागे असतात पोलीस प्रशासनाने मनावर घेतले तर ही अवैध्य वाळू वाहतूक काही क्षणात बंद होऊ शकते मात्र पोलीस हे यावेद्य वाळू वाहतुकीकडे दुर्लक्ष करीत असल्यामुळे नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त केले जात आहे. फुलंब्री तालुक्याच्या महसूल विभागाच्या नाकावर टिचून दररोज रात्री वाळूची वाहतूक सुरज शासनाचा लाखो रुपयांचा महसूल दुखत आहे.

## ग्रु.ग्रा.पं सरपंचपदी फरजाना पटेल बिनविरोध

आधुनिक केसरी न्यूज



**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे बोडखा/गंधेश्वर ग्रुप ग्रामपंचायत सरपंचपदाच्या निवडणुकीत सरपंच पदी फरजाना रफिक पटेल यांची बिनविरोध निवड करण्यात आली.
अविश्वास ठराव नंतर नव्याने दि.७ गुरुवार रोजी निवड करण्यात आली यात एकमेव सरपंच पदासाठी अर्ज आल्याने फरजाना रफिक पटेल यांची निवड करण्यात आली.या निवड प्रक्रिया साठी ग्रामपंचायत सदस्या शबाना अक्रम पटेल, वैशाली शेळके,आश्विनी काटकर, द्वारका बाई जाधव सदस्य, डॉ जाकीर शहा, अरुण गायकवाड आदिची उपस्थिती होती. निर्वाचनधिकारी म्हणून मंडळाधिकारी किशोर वाघ तलाठी उज्वला वाघमारे,ग्रामसेवक आदमवाड यांनी यावेळी काम बघितले. सरपंचपदाची निवड होताच आक्रम पटेल, आरफतशाह, इमाम शहा, बाळकृष्ण लोंढे, काकासाहेब लोंढे, गुलाब नाके, वाहेद पटेल सह ग्रामस्थांनी एकच जल्लोष केला. तर निवडी नंतर पदाधिकारी व चाहते यांचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. निवड प्रक्रिय शांततेत पार पडली.

## वीजचोरी : आठ महिन्यांत 522 जणांवर गुन्हे

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** वीजचोरीविरोधात जालना जिल्ह्यात महावितरणने कारवाईचा धडाका सुरू केला आहे. गेल्या आठ महिन्यांत आकडे टाकून तसेच मीटरमध्ये फेरफार करून वीजचोरी करणाऱ्या तब्बल 522 जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. महावितरणच्या या कारवाईमुळे वीजचोरांचे धाबे दणाणले आहे.
मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांनी परिमंडलातील छत्रपती संभाजीनगर व जालना या दोन्ही जिल्ह्यांत वीजचोरीविरोधात नियमित कारवायांबरोबरच प्रत्येक महिन्यात विशेष मोहीम राबवण्याचे आदेश सर्व क्षेत्रीय अभियंते व कर्मचाऱ्यांना दिलेले आहेत. ज्या विद्युत वाहिनीवर वीजगळतीचे प्रमाण अधिक आहे, त्या भागात इतर भागातील कर्मचाऱ्यांनीही भाग घेऊन एकाचवेळी कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. त्यानुसार परिमंडलातील प्रत्येक शाखेत प्रत्येक महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात सलग काही दिवस केवळ वीजचोरीविरोधातील धडक मोहीम राबवण्यात येते. जालना जिल्ह्यातही मुख्य अभियंता डॉ.केळे यांच्या मार्गदर्शनाखाली व अधीक्षक अभियंता संजय सरग यांच्या नेतृत्वाखाली राबवलेल्या मोहिमांत वीजचोरांवर धडक कारवाई करण्यात आली आहे.

एप्रिल ते नोव्हेंबर 2023 या आठ महिन्यांत जालना जिल्ह्यात तब्बल 522 जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या वीजचोरांनी 3 लाख 87 हजार 376 युनिट विजेची चोरी केली आहे, ज्याची रक्कम 71 लाख 56 हजार 495 रुपये एवढी आहे. जालना शहर उपविभागात 42 जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांनी 9 लाख 71 हजार 165 रुपयांची 53406 युनिट वीजचोरी केली.

## वय वर्ष हे अठरा झालं, मतदानाचं हे वय आलं : पथनाट्यातून राष्ट्रीय मतदार जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज



**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो! नवे वारे नवी दिशा, मतदान आहे उद्याची आशा ! वृद्ध असो किंवा जवान, सर्वजण करा अवश्य मतदान !आद्य कर्तव्य भारतीयांचे, पवित्र कार्य मतदानाचे!जना मनाची पुकार आहे, मतदान आमचा अधिकार आहे ! अशा घोषणांचे पोस्टर हातात घेऊन नायगाव ता.खंडाळा येथे राष्ट्रीय मतदार जनजागृती करण्यासाठी प्रभात फेरी काढण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सहभागाने राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव राष्ट्रीय मतदार जागृतीतून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांकडून देण्यात आलेल्या मतदार जागृतीच्या घोषणाबाजीने नायगावकरांचे लक्ष वेधले. हा राष्ट्रीय मतदार जनजागृती कार्यशाळा व प्रभात फेरी कार्यक्रम नायगाव येथील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात संपन्न करण्यात आला. तहसिलदार कार्यालय खंडाळा, ग्रामपंचायत नायगांव, भैरवनाथ शिक्षण संस्था नायगाव यांच्या संयुक्त विद्यमानाने राष्ट्रीय मतदार जन जागृती फेरीचे आयोजन करण्यात आले होते. पटनाट्यातून विद्यार्थ्यांनी मतदान जागृती केली. मतदान नोंदणी नोंदवा, राष्ट्रभुमीची शान वाढवा,चला हो मतदान करायला हो,निवडणूक आली तुमच्या दारी,पाच वर्षाची आहे वारी असे म्हणत मतदार जागृती करण्याचा प्रयत्न इयत्ता १२ वी च्या विद्यार्थीनींनीकडून पथ नाट्याद्वारे करण्यात आला.१८ वर्षाची झाली सगुणा या गाण्याचा आधार घेत असताना खरच पोरगी अठरा वर्षाची झाली तिचं लग्न केलं पाहिजे. हा संवाद पथनाट्यात दिसून आला. वय १८ वर्षे झालं की जबाबदार नागरीक बनवायाचं असतं. जबाबदारी नागरिक म्हणजे जी व्यक्ती जिला १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर तिला मतदान करण्याच अधिकार असतो. हे सांगत असताना वय वर्ष हे अठरा झालं, मतदानाचं हे वय आलं असा सूर सगळ्यानी टाळ्या वाजवित गायनाने पुढे आणला 'हॅप्पी बर्थडे काजल' हा संवाद सुद्धा ऐकायला मिळाला. काजलचे वय हे १८ वर्ष पूर्ण झालेले असून तिला मतदान कार्ड काढण्याचा सल्ला या पथ नाट्यात देण्यात आलेला दिसून आला. लोकांना सहजपणे समजेल अशी उदाहरणे सादरीकरणातून पुढे आणली. मतदानासाठी वेळ काढा,आपली जबाबदारी पार पाडा, असे सुद्धा पथनाट्यातून सांगण्यात आले. प्रभात फेरी मध्ये सर्व विदयार्थ्यांनी मतदार नोंदणी व मतदान या विषयी घोषणा दिल्या.पथनाट्य व प्रभात फेरीतून खऱ्या अर्थाने ग्रामस्थांना मतदानाचे महत्व व तसेच कर्तव्यांची जाणीव करून दिली. कार्यशाळेच्या निमित्ताने विद्यालयात रांगोळी स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले होते. आपले मत,आपले भविष्य! वोट फॉर बेटर इंडिया!सोडा सर्व काम,चला करूया मतदान! मतदार राजा जागा हो,लोकशाहीचा धागा हो! नवे वीर नवी दिशा, मतदानच आहे उद्याची आशा! युवर वोट,युवर व्हॉइस!आपले मताचे दान, आहे लोकशाहीची शान! वंचित ना राहो कोणी मतदार! कर्तव्य आपले बजावायचे आहे. वोट आपले द्यायचे आहे! आदी संदेश हे विद्यार्थ्यांनी रेखाटलेल्या रांगोळीच्या माध्यमातून सुद्धा देण्यात आले होते. राष्ट्रीय मतदार जागृतीसाठी या कामी तहसील कार्यालयाच्या अधिकारी वर्गांचे बहुमूल्य असे सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील नोडल अधिकारी विजयकुमार पिसाळ तसेच विद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार कोकरे आणि शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमास ग्रामपंचायत नायगावचे सरपंच, उपसरपंच, सदस्य तसेच संस्थेचे अध्यक्ष, सचिव व ग्रामस्थ उपस्थित होते. शालेय स्तरावरूनशालेय विद्यार्थ्यांना अशा उपक्रमातून मतदार जागृती करता आल्याने विद्यार्थ्यांमध्ये सुद्धा एका वेगळा उत्साह पाहायला मिळाला.



## किरण मनोहर साकारकार यांना डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आदर्श शिक्षक राज्यस्तरीय पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** ISO जिल्हा परिषद उच्चं प्रा. शाळा मल्हारा येथील शिक्षिका किरण मनोहर साकारकार यांना शासन मान्य मदत सामाजिक संस्था नागपूर, यांच्या वतीने अतिशय उत्कृष्ट शैक्षणिक कार्याकरिता त्यांना 2023 चा राज्यस्तरीय .डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन आदर्श शिक्षक पुरस्कार डॉ. प्रा. प्रकाश सोनक,मा. दिनेश बाबू वाघमारे, तसेच उपस्थित मान्यवरच्या हस्ते नागपूर येथे मोठ्या जनसमुदायासमोर उत्साह पुर्ण वातावरणात त्यांचा शैक्षणिक तथा सामाजिक कार्यकारित देण्यात आला. या बद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन, शुभेच्छाचा वर्षाव होत आहे. त्यांचा कार्यकारिता त्यांना गावचे प्रथम नागरिक सरपंच नारायणराव बोरेकार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उत्तमराव शेळके, उपाध्यक्ष दीपकराव तायडे, शाळेच्या मुख्यध्यापिका कु. शीला सोळंके, केंद्रप्रमुख श्रीकृष्ण उघडे, आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षक बबलू कराळे, कल्पना चौधरी यांनी शुभेच्छा दिल्या.





# जुन्याच रस्त्यावर नवीन रस्ता

## बोरवाडी येथील प्रकार : ग्रा.पं. सदस्यांची तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शासनाने आदिवासी भागातील भौतिक सुविधा पूर्ण करून होणारी गैरसोय दूर करण्यासाठी विविध योजनांची अंमलबजावणी केली आहे.बोरवाडी (ता. भोकर) येथे ठक्कर बाप्पा आदिवासी योजने अंतर्गत गावात सिमेंट रस्ता मंजूर झाला पण जून्याच रस्त्यावर नविन रस्ता करून शासनाची दिशाभूल करण्यात आल्याची तक्रार ग्रामपंचायत सदस्यानी केली आहे.

किनवट येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प विभास दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की,बोरवाडी हे गाव तालुक्यातील आदिवासी क्षेत्रात असून तेथील भौतिक सूविधाचा विकिस करण्यासाठी शासनाने एकात्मिक बालविकास प्रकल्प विभागाकडून विशेष निधीची तरतूद केली आहे.पण स्थानिक ग्रामपंचायत कार्यालयाने विकिसाच्या नावावर निधीचा गैरवापर करून शासनाची दिशाभूल केली आहे.गावातील जून्या रस्त्यावर नवीन रस्ता तयार करण्यात आला आहे.याशिवाय रस्त्याच्या दुतर्फा सांडपाण्याचे घाण पाणी वाहून जाण्यासाठी नाली करण्यात आली नाही परिणामी ते पाणी रस्त्यावर येऊन ग्रामस्थाचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.अंदाज पत्रकाला बगल देऊन कामे केली जात आहेत. संबधीत वरिष्ठांनी या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करून होणा-या कामात सूधारणा करावी व दोषीवर योग्य ती कारवाई करण्यात यावी अन्यथा आपल्या कार्यालया समोर अमरण उपोषण करण्याचा इशारा ग्रामपंचायत सदस्य महादू मारोती वाकदकर, भगीरथाबाई यशवंत वानोळे यांनी केली आहे.

# यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज रथयात्रेचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्या रथयात्रेचे यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने यंग चांदा ब्रिगेडच्या कार्यालया जवळ स्वागत करण्यात आले आहे. यावेळी रथयात्रेत सहभागी झालेल्या तैलिक समाज बांधवांसाठी यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने फळ व शितपेयाची व्यवस्था करण्यात आली होती.

या प्रसंगी यंग चांदा ब्रिगेडच्या महिला शहर संघटिका वंदना हातगावकर, बंगाली समाज महिला शहर प्रमुख सविता दंढारे, सायली येरणे, युवती प्रमुख भाग्यश्री हांडे, अल्पसंख्यांक विभागाच्या महिला शहर प्रमूख कौसर खान, आशा देशमूख, वैशाली मेश्राम, वैशाली मद्दीवार, प्रसिद्धी प्रमुख नकुल वासमवार, हेरमन जोसेफ, शहर संघटक देवा कुंटा, ताहिर हुसेन, चंद्रशेखर देशमूख, विनोद अनंतवार, कार्तिक बोरेवार, जय मिश्रा, प्रतीक हजारे आदींची उपस्थिती होती.

तैलिक समाज घडविणारे तेली समाजाचे आराध्यदैवत, समाज सुधारक संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्या रथयात्रेचे आज तैलिक समाज बांधवांच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. सदर शोभायात्रेचे स्वागत करण्यासाठी यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने जैन भवन जवळील कार्यालया जवळ स्वागत मंच उभारला होता. ही रथयात्रा यंग चांदा ब्रिगेडच्या स्वागत मंचाजवळ पोहचताच यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिका-यांनी शोभायात्रेचे स्वागत केले. यावेळी श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेला पूष्पहार अर्पण करत त्यांना नमन केले. सदर रथयात्रेत सहभागी झालेल्या समाज बांधवांसाठी येथे शितपेयाची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी यंग चांदा ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

तेली समाज बांधवांच्या वतीने जोडदेऊळ येथे श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन नमन केले. यावेळी यंग चांदा ब्रिगेडचे युवा नेते अमोल शेंडे, राशिद हुसेन, प्रतिक शिवणकर, विश्वजीत शाहा, करणसिंह बैस आदींची उपस्थिती होती आदींची उपस्थिती होती.



# ४७ विद्यार्थिनींना जेवणातून विषबाधा

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** नर्सिंग महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या जवळपास ४७ विद्यार्थिनींना काल रात्री जेवणातून विषबाधा झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली. यात काही विद्यार्थिनींची प्रकृती गंभीर असल्याचे वृत्त आहे. भंडारा येथील शासकीय नर्सिंग महाविद्यालयात २०० विद्यार्थिनी एएनएम आणि जीएनएमचे शिक्षण घेत आहेत. काल रात्री जेवण आटोपल्यावर काही विद्यार्थिनींना अचानक उलट्या, मळमळ, डोकेदुखी, ताप येण्यास सुरुवात झाली. त्यानंतर प्रशासनाने त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारकरिता दाखल केले. रात्रीपासून या विद्यार्थिनींवर उपचार सुरू असून ७ विद्यार्थिनींची प्रकृती गंभीर तर एक विद्यार्थिनीची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याचे सांगितले जात आहे.

# पहूरला फुले विद्यालयात महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज



**पहूर :** ता. जामनेर (ता. ६) येथील महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका व्ही. व्ही. घोंगडे अध्यक्षस्थानी होत्या. प्रारंभी त्यांच्या हस्ते डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात. यावेळी मोहिनी राऊत, गायत्री जवखेडे, हर्षाली जाधव, स्नेहल सपकाळ, गायत्री घोंगडे, प्राणिता क्षीरसागर, गायत्री पवार, वर्षा राऊत, भावेश निकम, ममता तडवी आदी विद्यार्थ्यांनी भाषणे दिली. सुरुवातीला मधुरा सटाले, वैष्णवी कोळी, श्रद्धा बनकर, इशा पाटील, श्रध्दा लोहार, श्रावणी लोहार, अभिमन्यू घोंगडे, राहुल न्हावी विद्यार्थ्यांनी बालसभा आयोजित केली. याप्रसंगी सलोनी तडवी हीने प्रेरणा गीत सादर केले. हरीभाऊ राऊत, राजेंद्र सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले. उप मुख्याध्यापिका के . ए . बनकर, एम. एच. बारी सह सर्व शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शंकर भामेरे यांनी सुत्रसंचलन केले. बी. एन. जाधव यांनी आभार मानले.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)


डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर